
# माणूस

शनिवार । ६ डिसेंबर १९७५ । एक रुपया


राजमेंहेंद्री मध्यवर्ती कारागृहात तुमच्या शासनाने दिलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेची वाट पाहात असलेला मी कैदी नंबर आठसोबयालिस वीरभूषण पटनाईक पुन्हा एकदा अभिमानाने जाहीर करतो की,.... ( पृष्ठ १७ )

# थँक्यू मिस्टर ग्लाड

अनिल बर्वे



साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : सव्विसावा

६ डिसेंबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤

# मुक्काम पुणे

प्रकाश जोशी

## एकदा ससूनला भेट द्याच

☐ ससून हॉस्पिटल आपल्याला माहीत असेलच.

–अख्ख्या महाराष्ट्राला ते परिचित आहे. कारणे अनेक असतील.

आपले सुप्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर यांच्या मतेही एक कारण आहे. मागे एकदा त्यांनी ते जाहीरपणे सांगून टाकले. ससून हॉस्पिटलचे बी. जे. मेडिकल कॉलेजने महाराष्ट्राला काय दिले ? कानेटकर यांच्या मते अनेक चांगले डॉक्टर्स, त्याचबरोबर अनेक वाईट डॉक्टर्स; परंतु रंगभूमीच्या दृष्टिकोनातून गुणी कलाकार दिले. ज्याला त्याला आपलं तेवढं दिसतं असं म्हणतात. कदाचित त्यामुळे कानेटकरांना ससून हॉस्पिटल एका नाट्यशाळेच्या रूपात दिसले असेल. त्याचप्रमाणे प्रत्येकाला वेगवेगळे अनुभव येणारच.

पण तुमचा ससूनशी जर जरा जवळून संबंध आला असेल, म्हणजे रुग्णाच्या रूपाने किंवा रुग्णाबरोबर आपण जर कधी ससूनला भेट दिली असेल तर एक गोष्ट आपल्या वाट्याला निश्चितपणे आली असेल, ती म्हणजे उर्मटपणा.

एखाद्या नुकत्याच जन्मलेल्या बालकाचा चेहरा पाहायला जायचं असो किंवा एखादं प्रेत ताब्यात घ्यायचं असो, या उर्मटपणाचा कुठं ना कुठं तरी अनुभव आल्याशिवाय राहात नाही.

राज्यातील एका मोठ्या हॉस्पिटलात ससूनची गणना होते. अनेक सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर्स येथे उपलब्ध आहेत. सर्वसामान्यांना त्याचा लाभही घेता येतो; परंतु हॉस्पिटलची एकंदर जी कारभारयंत्रणा आहे, तिच्याकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे.

हॉस्पिटलमधील अनेक उपयुक्त गोष्टींना पाय फुटतात. त्यात औषध, दूध, बँडेज व इतर किरकोळ वस्तूंचा समावेश आहे. ससूनमध्ये दरवर्षी चाळीस लाख रुपयांची औषधे खर्च होतात. त्याचा फायदा रुग्णांना कितपत मिळतो, त्यापैकी चोरीला किती जातात, अनाठायी खर्च किती होतात हा एक संशोधनाचाच विषय ठरावा. तीन वर्षांपूर्वी औषधावरील खर्च २२ लाख होता तो आता दुप्पट झाला आहे; पण रुग्णांची संख्या दुप्पट झाली आहे का ? त्याचे उत्तर नाही असे आहे.

मागच्याच आठवड्यात ससून हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी आणलेले दूध कॅन्समधून परस्पर चोरीला गेल्याचे उघडकीस आले. हा प्रकार नित्याचाच असावा असा जाणकारांचा संशय आहे. रुग्णांना नेमून दिलेल्या कोठ्याइतके अन्नधान्य मिळत नाही अशा अनेक तक्रारी असल्याचे समजते. मध्यंतरी मुंबईत चोरलेल्या औषधांचा व्यापार करणारी एक आंतरराष्ट्रीय टोळी पकडण्यात आली होती.

काही नोकरांच्या बेफिकीर व उर्मट वागणुकीस रुग्णांना तोंड द्यावे लागते.

राज्यकर्मचाऱ्यांच्या संपाच्या वेळचे उदाहरण बोलके आहे. त्या वेळी ससूनचा सर्व कारभार होमगार्डस् संघटनेच्या हाती देण्यात आला होता.

केसपेपर विंडो.

केसपेपर घेऊन एका रुग्णाने रुपया पुढे केला. होमगार्डने तो परत केल्यामुळे केसपेपर घेणाऱ्याला धक्काच बसला.

तर असे हे ससून हॉस्पिटल. हॉस्पिटलचे डीन, डॉक्टर्स रुग्णांच्या सेवेसाठी झटत आहेत, त्यांना सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य हवे. तक्रारींबाबत राज्यपातळीवरील सल्लागार समितीत त्याबाबत विचार व्हावा ही अपेक्षा.

¤

# त्यांचे काय चुकले ?

☐ एखादी गोष्ट सफल झाली नाही की उगाचच आरडाओरड करावयाची आपल्याला सवयच लागलेली आहे.

आता महानगरपालिकेच्या वाहतूक समितीचे उदाहरण घेऊ. पी. एम. टी. बाबत लोकांच्या किती तक्रारी आहेत, किती अपेक्षा आहेत हे सांगायचं म्हटलं तर एक लांबलचक जंत्रीच तयार होईल. आता पी. एम. टी. ची व्यवस्था सुधारावी, लोकांचा वाहतुकीचा प्रश्न सुटावा म्हणून या वाहतूक समितीने तळमळीने प्रयत्न केले, उपसमित्या नेमल्या, काही दौरे आयोजित केले तर बिघडलं कुठे ? बरं, एखाद वेळी ठरविलेल्या गोष्टी सफल होतीलच असं नाही. मग उगाचच टीकेची झोड का उठवावी ?

ही वाहतूक समिती नुकतीच दिल्लीची वारी करून आली. हेतू अनेक होते. संरक्षण-खात्याच्या जमिनी पी. एम. टी. बस स्टँड-साठी मिळवाव्यात, रेल्वेस्टेशनजवळची रेल्वेची जागा बसटर्मिनससाठी मिळावी, दिल्लीतील बसवाहतुकीचा अभ्यास करावा वगैरे वगैरे.

पण झालं काय, वाहतूक समितीचे आठ सदस्य दिल्लीत पोहोचले ते नेमके शनिवारी. तेही दुपारी तीननंतर; पण त्यात त्यांचं काय चुकलं ? शनिवारी सर्व ऑफिसेसला अर्धा दिवस सुटी असते हे कोणी तरी त्यांना सांगायला नको होते का ? एकानेही सांगितले नाही.

रविवारी सुटीच असते. नंतर गुरुनानक-जयंती, नंतर पंतप्रधानांचा वाढदिवस असं एकापाठोपाठ येईल, अशी त्यांना तरी काय कल्पना !

म्हणजे तीनचार दिवस दिल्लीतील थंडीत कुडकुडत बसावं लागणार होतं.

आता नुसतं बसून राहण्यापेक्षा दिल्लीपर्यंत आलोच आहोत तर दिल्लीपलीकडे जाऊन येऊ, काश्मीर पाहून येऊ असा विचार त्यांनी केला, त्यात काय चुकलं ? त्यामुळे दिल्ली ते जम्मू रेल्वे व तेथून पुढे ही मंडळी श्रीनगरला पोहोचली.

पण तिथे त्यांच्या वाटेला आली थंडी. इतकी थंडी असेल अशी त्यांना काय कल्पना? पुण्याच्या गुलाबी थंडीची सवय झालेली मंडळी श्रीनगरच्या कडाक्याच्या थंडीत गारठली. आता अशा गोठवणाऱ्या थंडीत सोनमर्ग, गुलमर्ग पाहणे शक्य होते काय ? सोनमर्ग–गुलमर्गसाठी आता उन्हाळ्यातील दिल्लीच्या वाहतुकीची पाहणी करण्यासाठी एक दौरा काढायचे मनातल्या मनात ठरवून सगळे नव्या दिल्लीला परतले. त्यातल्या काही जणांना थंडी इतकी बाधली की, ते विमानाने दिल्लीला परतले, तर काही आलेल्या मार्गाने परतले.

दिल्लीत या समितीने प्रयत्नांची शिकस्त केली. कडाक्याची थंडी असताना सुद्धा; पण फारसे हाती काही लागले नाही. थंडीचा अनुभव वगळता अक्षरशः हात हालवत परतावे लागले.

एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की या समितीने आपण जनतेच्या पैशावर दिल्ली-पर्यंत आलो आहोत याची पुरेपूर जाणीव ठेवली. दिल्लीच्या पुढील सर्व खर्च ज्याचा त्याने केला. त्यात सार्वजनिक पैशाचा एक पैचाही अपव्यय झालेला नाही. मग टीकेचा प्रश्न येतोच कोठे ?

बरं, फक्त वाहतूक समितीनेच दिल्लीवारी केली असे नव्हे. आरोग्य समिती, स्थायी समिती व वाहन व्यवहार समिती यांच्यात दिल्लीवारीबाबत एकमेकात स्पर्धा लागलेली असते. काही उपसमित्यांनीही 'मिनी-बस' वगैरे अनेक प्रकल्पांसाठी दहा-बारा दौरे केले आहेत.

आता या समित्या दौऱ्यातून काही निष्पन्न झाले आहे का हे मात्र विचारू नका.

पण एकदा कामासाठी बाहेर पडल्यावर पुढे आपल्या खर्चातून जर काश्मीर, दार्जिलिंग, उटी वगैरे ठिकाणी नगरसेवकांनी भेटी दिल्या तर बिघडले कोठे ? तेवढीच त्यांची सौंदर्य-दृष्टी वाढून झालाच तर 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे' या योजनेला काही हातभार लागेल.

आता महानगरपालिकेची आरोग्य समिती मद्रासला निघाली आहे. आता येता येता वाटेत जर ही मंडळी उटीला वगैरे जाऊन आली तर फारसे आश्चर्य वाटू नये.

☐

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

मोफत ! मोफत ! मोफत !

**पांढरे डाग**

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिव-सातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायल-करता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

जवाहर चिकित्सा केन्द्र १०५
पोष्ट : कतरीसराय ( गया )

# मौज । २५

'मौज प्रकाशन गृह' या संस्थेला पंचवीस वर्षे पूर्ण झाली म्हणून मुंबई व पुणे येथे मौजच्या भागवतबंधूंचे सत्कार मौजेच्या चहात्यांनी आयोजित केले होते.

मुंबईच्या सत्कारसमारंभाचे वैशिष्टच म्हणजे हा सत्कार एका समव्यावसायिकाने 'पॉप्युलर'चे रामदास भटकळ व बॉम्बे बुकडेपोचे श्री. कुमठा यांनी घडवून आणला होता. व्यवसाय म्हणजे केवळ स्पर्धा या नेहमीच्या समीकरणाला हा एक सुखद अपवाद होता.

रामदास भटकळ यांनी समारंभप्रसंगी केलेले हे प्रास्ताविक भाषण.

पुण्याचा समारंभ मुख्यत: प्रश्नोत्तर-स्वरूपाचा होता. रविवार दिनांक ३० नोव्हेंबरला पु. ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली तो पार पडला.

मौज प्रकाशन आणि भागवतबंधू यांच्या गेल्या पंचवीस वर्षांतील कर्तृत्वाचं कौतुक करण्यासाठी आणि त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेचा उच्चार करण्यासाठी आपण इथे जमलो आहोत. माझ्या बाळपणी वाचलेल्या एका क्रमिक पुस्तकात प्रकाशक ह्या शब्दाची व्याख्या जो लेखकांना उत्तेजन देतो तो अशी करण्यात आली होती. पुढे आमच्या घरी नेहमी येणारे एक प्रकाशक-स्नेही-नाव घ्यायलाही हरकत नाही-गजाननशेठ परचुरे-यांना विचारल्यावर ' ते म्हणाले, ''छे ! गोडाउनमधील पुस्तकांचे गठ्ठे सांभाळतो तो प्रकाशक.' पुढे स्वत: ह्या व्यवसायात आल्यावर लक्षात आलं, ह्या दोन्ही व्याख्या अंशत: खऱ्या असल्या तरी खरा प्रकाशक ह्याची व्याख्या म्हणजे 'मौज.' ज्याला आपण इंग्रजीत पब्लिशर इनटू इन्व्हर्टेड कॉमाज् म्हणू, असे प्रकाशक म्हणजे मौज आणि भागवतबंधू.

आपल्यातील बहुतेकांप्रमाणे माझेही वाचक या नात्याने पोषण मौजेच्या पुस्तकांवरच झाले आहे. इतकंच नव्हे, प्रकाशक म्हणूनही माझ्यावर झालेले बरेचसे संस्कार मौजेचेच. पॉप्युलरची सुरुवातीची काही पुस्तके भागवतांच्या मदतीनेच प्रसिद्ध झाली. पुढे मी त्यांचे न जुमानता बऱ्याचशा बऱ्यावाईट गोष्टी केल्या तरी मी स्वत:ला त्यांच्या परिवारातलाच एक समजतो. लोकही काहीसे स्तुतिपर आणि बरेचदा हिणवताना 'मौज-पॉप्युलर' असा एकत्रित उल्लेख करतात. ह्या दोन्ही बाबतीत मौजेचे अग्रजत्व आणि अग्रेसरत्व मान्य करण्यात मला मुळीच संकोच वाटत नाही. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजही एखाद्या प्रसंगात अर्जुनासारखी गत झाल्यास मी श्रीकृष्ण किंवा विष्णू यांच्याकडे धाव घेतो किंवा त्यांचा धावा करतो.

कोणीही प्रकाशक हा लेखक निर्माण करू शकत नाही असा भलता दावा कुणी करू नये. परंतु लेखकाला लिहिते करणे, त्याला उत्तेजन देणे, काही वेळा त्याला न लिहिते करणे किंवा पुन्हा लिहायला लावणे, त्याच्या प्रतिभेला शिस्तीची जोड देणे किंवा अडेलतट्टू लेखकाला डिवचून पळायला लावणे, अशा किती तरी प्रकारे प्रकाशक आपली कामगिरी बजावू शकतो. लेखकाला घडवण्याचे हे कार्य अलीकडच्या काळात मौजेइतके इतर कोणी केले असल्याचे माझ्या माहितीत नाही. एक हरिभाऊ मोटे यांचा अपवाद वगळता. मौजेचा साहित्यिक दृष्टिकोण, लेखकांवर संस्कार करण्याची त्यांची ताकद, पुस्तकांच्या निवडीबाबतचे त्यांचे धोरण याविषयी आज अधिक अधिकारी व्यक्ती बोलणार आहेत. परंतु मौज प्रकाशनची यादी ज्या वेळी मी पाहतो त्या वेळी माझ्या मनात येणाऱ्या एक-दोन विचारांचा उच्चार इथे केला पाहिजे.

मौजेची प्रकाशनं एकत्रित पाहताना माझ्या डोळ्यांसमोर चित्र उभे राहते एक ऑर्केस्ट्राचं. वाद्य-वृंदाचं. श्रीपु समोर कंडक्टरच्या थाटात उभे. प्रत्येक कलाकार हा आपल्या कलाकृतीसह उभा आणि त्या सर्व कलाकृतींतून जणू एक नवीन कलाकृती तयार करणारा कंडक्टर किंवा आपल्याला अधिक जवळची वाटणारी उपमा द्यायची असल्यास तो दिग्दर्शकाची-लेखक, नट, संगीतकार इत्यादी अनेक कलाकारांच्या साहाय्याने तो एक नवीन एकसंध कलाकृती निर्माण करीत असतो. मौजेच्या प्रकाशनांतून एक वाङमयाभिरुचीचे असेच नवीन चित्र निर्माण होते. तसं पाहिलं तर प्रत्येक पुस्तकाच्या निर्मितीत प्रकाशक हा दिग्दर्शकाची भूमिका घेत असतोच. परंतु श्रेष्ठ लेखकांच्या बाबतीत त्यांची प्रत्येक निर्मिती-कथा, कविता, कादंबरी किंवा नाटक-ही कलाकृती असूनही पुन्हा त्यांच्या सर्व लेखनातून एक वेगळा कलात्मक आलेख दिसतो. त्याचप्रमाणे मौजेच्या ह्या गेल्या पंचवीस वर्षांच्या प्रकाशनकार्यातूनही एक सुंदर चित्र तयार होते.

कोणाही प्रकाशकाची यादी पाहताना माझा मनाशी एक छंद चालू असतो. ह्या यादीतील किती पुस्तके मला माझ्या यादीत आवडली असती आणि आपल्याला सांगायची आवश्यकता नाहीच की मौजेची ही एकच अशी यादी आहे की ज्यात जवळजवळ नव्वद टक्के पुस्तके ही मला हवीहवीशी वाटतात. इतक्या कसोशीने त्यांनी विवादी सूर लागू दिलेला नाही.

ह्या इतक्या काटेकोर आणि चोखंदळ निवडीमुळे निर्माण झालेल्या एका प्रश्नाकडे मात्र लक्ष वेधले पाहिजे. आज श्री. पु.

भागवत आणि राम पटवर्धन यांची आवड-निवड म्हणजे मौज प्रकाशनगृहाचे संपादकीय धोरण हे जे समीकरण झाले आहे त्यामुळे पुढील पिढीचे काम कठीण झाले आहे. एखाद्या संस्थेचे धोरण हे इतके व्यक्तिनिष्ठ किंवा Subjective असून चालत नाही. त्यासाठी जाणीवपूर्वक broadbased objective वस्तुनिष्ठ असे धोरण आखावे लागेल.

पुस्तकांच्या निर्मितीच्या क्षेत्रात मुद्रण, मांडणी, copy editing इत्यादी क्षेत्रांत मौजेने जे आदर्श निर्माण केले आहेत त्यांचा आज आवर्जून उल्लेख केला पाहिजे. पुस्तकाच्या मुखपृष्ठापासून तो मलपृष्ठापर्यंत, पहिल्या पानापासून तो शेवटच्या पानापर्यंत शुद्धलेखन, मांडणी, टाइपांची निवड, पुस्तकाचा आकार इत्यादी लहान-सहान बाबतीतही मौज जितके लक्ष देते तितके आणि तेही सातत्याने, इतर प्रकाशक देतात असे मला वाटत नाही. क्वचित एखादे पुस्तक ढवळचांचे किंवा देशमुखांचे मौजेहून सुंदर निघाले असेल; परंतु 'मौज टाइप आणि मौज मुद्रण' यांना नवीन प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य मुख्यतः मौज प्रकाशनाने केले आहे. या संदर्भात मला भागवतांना एक विनंती करावीशी वाटते ती अशी की इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने आणि अमेरिकेत शिकागो युनिव्हर्सिटी प्रेसने style books तयार केली आहेत त्याप्रमाणे–आपल्याकडे युनिव्हर्सिटी प्रेस हे याबाबतीत उदासीन असल्याने–मराठीसाठी style book मौजेने तयार करावे.

मराठीत निव्वळ ललित वाङ्मयाचे प्रकाशन करणाऱ्या संस्था फारच थोड्या. ज्या आहेत त्यांना मॅजेस्टिकसारखा मूलतः विक्रीकेंद्राचा आधार असतो किंवा मौजेसारखा मुद्रणालय आणि मासिक यांचा. साहजिकच पहिल्या गटातील प्रकाशनसंस्था ह्या विक्रीप्रधान असतात तर मौजेची विक्रीची यंत्रणा ही त्या मानाने कच्ची राहिलेली असते. आज मौजेचे मनःपूर्वक कौतुक करत असतानाही त्यांनी sales promotion आणि sales किंवा प्रसिद्धी आणि विक्री याबाबतीत जो conservatism उदासीनता –काहीसा भित्रेपणा म्हटलं तरी चालेल– दाखविलेला आहे तो जाणवल्याशिवाय राहात नाही. लेखकांची निवड आणि पुस्तकांची छपाई यात जी प्रयोगशीलता, जे धाडस, जो आत्मविश्वास मौजेने दाखविला आहे त्यापैकी आत्मविश्वासच त्यांच्या विक्रीव्यवस्थेत आढळून येतो. अर्थात ह्या वृत्तीने काही चांगल्या गोष्टीही साधलेल्या आहेत आणि त्यांचा उल्लेख होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, स्वस्त पुस्तकयोजना ही गेल्या काही वर्षांत इतर प्रकाशकांकडे इतकी राबविण्यात आली आहे की त्यावरील ग्राहकांचा विश्वास जवळजवळ उडाला आहे. सोन्याचे अंडे देणारी ही कोंबडी आम्ही कापून खाल्ली आहे म्हणा ना. भागवत शाकाहारी असल्याने ह्या कोंबडीच्या वाटेने कधी गेले नाहीत. पुस्तकविक्रेत्यांकडील व्यवहारातदेखील त्यांनी आपला दरारा किंवा आपल्यावरील विश्वास ढळेल असं काही केलेलं नाही. विक्रीसाठी कोणत्याही 'गिमिक्स'चा आधार घ्यायचे त्यांनी जसे टाळले आहे त्याचप्रमाणे त्यांनी निव्वळ तात्पुरत्या व्यावहारिक मोहासाठी हिणकस पुस्तकांचे प्रकाशनही टाळले आहे. प्रकाशकाच्या आयुष्यात अनेक मोहाचे क्षण येतात, अनेक दडपणे येतात, अनेक मंडळी शब्द टाकतात, प्रलोभने दाखवितात; परंतु अशा प्रसंगी फारसे बळी पडल्याचा पुरावा मौजेच्या यादीत सापडत नाही. Also they have not allowed their salesman to be their editor. या दृष्टीने त्यांनी जे केले नाही याची नोंद घेणे, त्यांनी जे केले आहे याची नोंद घेण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

आज आपण कोणत्याही व्यावसायिक संस्थेविषयी बोलताना एका गोष्टीकडे जाणून-बुजून काणाडोळा करतो. ती महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यावसायिक नीतिमत्ता. आज आपला दृष्टिकोण हा इतका व्यवहारनिष्ठ झाला आहे आणि यशापयशाचे किंवा कर्तृत्वाचे मोजमाप करताना आपण रुपये आणे पैचीच फूटपट्टी लावतो की व्यावसायिक नीतिमत्ता ही चीज आहे की नाही याचाच संभ्रम निर्माण होतो. माझा मौजेविषयीचा आदर हा इतर कोणत्याही कारणांपेक्षा ह्या त्यांच्या व्यावसायिक नीतिनिष्ठेमुळे आहे. मौजेचे आणि लेखकांचे, समव्यावसायिकांचे, पुस्तकविक्रेत्यांचे किंबहुना सरकारी अधिकारी, जिल्हा परिषदांसारखी मोठी गिऱ्हाइके यांसारख्या सर्वांशी मौजेचे संबंध हे सचोटीवरच आधारलेले आहेत याबद्दल माझ्या मनात शंका नाही. हे सारे किती कठीण आहे याची मला पूर्ण कल्पना आहे आणि म्हणूनच ते फार महत्त्वाचे आहे. ह्या कलियुगातही जगण्याला काही अर्थ आहे असं ज्या थोड्या लोकांकडे पाहून वाटतं त्यात भागवतबंधूंचा समावेश होतो.

आता एक शेवटचा मुद्दा. मौजेने आपल्याला दिलेल्या गोष्टींपैकी सर्वांत महत्त्वाची म्हणजे Sense of excellence आपण बहुतेक गोष्टींकडे 'उरकणे' 'पार पाडणे' असे काहीसे utilitarian दृष्टीने पाहतो; पण आपण अंगिकारलेलं कोणतंही कार्य हे 'सुंदर' असले पाहिजे, हा दृष्टिकोण फारच कमी आढळतो. मौजेने गेल्या पंचवीस वर्षांत जे जे काही केले आहे, त्यामागे एक सौंदर्यवादी दृष्टिकोण आहे, एक perfectionist जिद्द आहे. त्यांनी मला मिळवून दिलेल्या ह्या Sense of excellence चे यथार्थ वर्णन करण्याला सुंदर शब्द माझ्याजवळ नाहीत याचा खेद वाटतो.

मित्रहो, 'मौज' ह्या शब्दावर आजवर कमी विनोद झाले नाहीत; परंतु हौस-मौज हा प्रकार भागवतांकडे काही बाबतीत नाही याचा मला अनुभव आला. ह्या रौप्यमहोत्सवानिमित्त हा कार्यक्रम घडवून आणावा असे आम्हा सर्वांना वाटले; परंतु भागवतांनी खूप आढेवेढे घेतले. शेवटी आमच्या हट्टाला त्यांनी मान दिला. आमचा हट्ट त्यांच्याकडे चालतो हे कळल्याने मी आपल्या सर्वांच्या वतीने आणखी एक हट्ट धरणार आहे. तो म्हणजे आज ना उद्या श्री. पु. आणि विष्णुपंत ह्या दोघांनीही ह्या क्षेत्रातले आपले अनुभव लिहून काढले पाहिजेत, नाही तर त्यांचे कार्य अपुरेच राहील.

# सोलकढी

## □ दसलाखाची गोष्ट सांगतो

पंधरावीस वर्षांपूर्वी मी बेदम इंग्रजी चित्रपट पाहायचो. त्यात मोठ्या मस्तमस्त, गोऱ्यागोऱ्या, मधाळ डोळयांच्या नटचा असायच्या. चित्रपट पाहिल्यानंतरसुद्धा खूप काळ त्या डोळयांतल्या भावल्या होऊन राहायच्या. रिटा हेवर्थ, ॲवा गार्डनर, ग्रेस केली, इस्थेर विल्यम्स, हेडी लामार, ऑलिव्हिया डी हॅवेलॅण्ड, लाना टर्नर, सुसान हेवर्ड, किम नोव्हॅक, जिना लोलोब्रिजिडा, सोफिया लॉरेन, मेरिलिन मन्रो, डेबोरा केर, ऑड्रे हेपबर्न (ही तशी हडकुळी वगैरेच होती; पण अशी जिवलग हसायची की आम्ही कायम घायाळ असायचो.), एलिझबेथ टेलर, मॉरिन ओ'हारा...अशी त्या नटचांची बिलोरी नावे सदा आमच्या जिभेवर असायची.

यातल्या बहुतेक नटचा आता मावळून गेल्या. त्यांची नावे जिभेवरून हळूच उठून गेली. एलिझबेथ टेलर एखादीच. नाव घेण्यासारखे काहीबाही ती सारखे करत राहते. रिचर्ड बर्टनशी लग्न करून गेली कित्येक वर्षे ती सुखात राहिली होती. अलीकडे तिने ते लग्न मोडले होते आणि ती सुखात राहू लागली होती आणि अगदी अलीकडच्या अलीकडे तिने पुन्हा एकदा जुन्याजाणत्या, एक वेळ अनुभव घेऊन खात्री केलेल्या, रिचर्ड बर्टनशी लग्न लावले असून ती सुखात राहणार आहे.

एलिझबेथसारख्या टेलरशी, एकदा विस्कटलेले लग्न पुन्हा जुळल्यामुळे रिचर्ड बर्टनचे विमान बेटे आकाशाला निळ्या टिचक्या मारत होते. त्याचे लिझीवर केवढे भव्य, केवढे उदात्त, केवढे अतोनातच्या फतोनात प्रेम होते. आता हे असले प्रेम शाबित करायचे म्हणजे लिझीला काही तरी घसघशीत द्यायला हवे. आपणसुद्धा आपल्या लिझींना–उपलिझींना काही ना काही देऊन राहतो : एखादे चॉकलेट, एखादे चित्र, एखादी कविता, एखादे पुस्तक, एखादा भल्या, थोर आकाराचा दगडसुद्धा. तशी रिचर्ड बर्टनने एलिझीला एक हिऱ्याची अंगठी नजर केली. नग दहा लाख डॉलर्सचा होता. (पुणेकर मंडळींनी दहा लाख डॉलर्सचे रुपये नेमके किती होतात याचा बारीक हिशेब केलेला असेल; तो अपुणेकरांनी लक्षात घ्यावा.) दहा लाख डॉलर्सची अंगठी पाहून लिझीचा मूळचाच उजळ चेहरा अधिक उजळला असेल, तिचे डोळे आनंदाने आणि खऱ्याखुऱ्या पाण्यानेसुद्धा चमकू लागले असतील, तिचे आरक्त ओठ ईषत् कंप पावले असतील आणि ती रिचर्ड बर्टनला घट्ट मिठी मारून (काही मराठी लेखक या अखेरच्या प्रक्रियेचे, 'आलिंगन देऊन' असेही वर्णन करतात, असे मी पाहून ठेवले आहे.), 'माझ्या रिचर्डराजा, तू कित्ती कित्ती चांगला आहेस रे!' असे (इंग्रजीत) म्हणाली असेल, असेच आम्हाला आणि तुम्हाला वाटले; पण झाले ते भलतेच. वर म्हटले त्यातले काहीच झाले नाही. तिने ती अंगठी नाकारली. कशी कुणास ठाऊक, तिला एकदम अडल्या-नडलेल्या, जीवन सह्य करायला आवश्यक असलेल्या गोष्टी न लाभलेल्या अभाग्यांची आठवण झाली. त्याच क्षणी, अंगठीच्या रकमेतून एक इस्पितळ उभारण्याचा संकल्प तिने जाहीर करून टाकला. ('राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान'ला अशी एखादी अंगठी मिळाली असती तर बाबासाहेब पुरंदऱ्यांना शिवचरित्रकथनाचे प्रयोग लावत इतकी वणवण करावी लागली नसती आणि 'महाराष्ट्र टाइम्स'च्या गोविंदरामशास्त्री तळवलकरांनी फर्मावलेली शिक्षासुद्धा ऐकावी लागली नसती. असो.) आफ्रिकेतल्या बोट्स्वानामधल्या अभयारण्याच्या सीमेवर असलेल्या एका छोटचा शहरात लिझीचे हे इस्पितळ उभे राहणार आहे. याच शहरात तिने बर्टनशी नव्याने लग्न लावले होते.

कु. एलिझबेथ टेलरचे असेच पुन्हापुन्हा वारंवार त्या रिचर्ड बर्टनशी लग्न व्हावे, अशी जी सकलांची सदिच्छा आहे ती अनंतराव आपल्या मुखाने प्रकट करत आहे. तथास्तु.

— अनंतराव



# काँग्रेसचा अस्पृश्योद्धार

## ६ डिसेंबर : आंबेडकर निर्वाणदिनानिमित्त लेख

—प्रा. देवदत्त तुंगार

आधुनिक भारताचे एक थोर शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर ओझरता दृष्टिक्षेप टाकला तरी त्यांचे सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य जाणवते ते म्हणजे त्यांचा दांडगा व प्रचंड विद्याव्यासंग ! दत्तोपंत ठेंगडीसारख्या अनेक अभ्यासकांनी डॉ. बाबासाहेबांच्या संशोधनविषयक कार्याबद्दल मुक्तकंठाने स्तुती केली आहे. समकालीन नेत्यांमध्ये बाबासाहेबांसारखा व्यासंगी विद्वान दुर्मिळच ! प्रत्येक प्रश्नाचे विश्लेषण करताना सर्व कागदपत्रे, पुरावे आणि तत्सम सामुग्री एकत्रित करून त्यावर सखोल विवेचन करणे या बाबतीत त्यांचा हातखंडा होता. काँग्रेसच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याबद्दल बाबासाहेबांना मुळीच आत्मीयता वाटत नव्हती. काँग्रेसच्या (स्वातंत्र्यपूर्व) या विधायक उपक्रमाबद्दल बाबासाहेबांना का नाराजी होती असे त्यांचे एक सहकारी दलितमित्र श्री. बी. एस. मोरे यांना मी विचारले असता त्यांनी डॉ. आंबेडकरांचा एक भला मोठा ग्रंथच वाचायला दिला. 'What Congress and Gandhi have done to the untouchables' हे ग्रंथाचे नाव असून स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यासंबंधी त्यांना नापसंती का वाटत होती व तो केवळ एक देखावा (shaby show) त्यांना का वाटत होता याचे त्यांनी केलेले विश्लेषण लक्षात येते. ते येथे थोडक्यात निवेदन करतो.

महात्मा गांधींनी भारतीय राजकारणात १९१९ साली प्रवेश केल्यावर काँग्रेसचे स्वरूप झपाट्याने पालटत गेले. फेब्रुवारी १९२२ मध्ये बार्डोली येथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली व त्यात सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. दलित समाजाच्या लोकांची स्थिती सुधारावी हेही बार्डोली कार्यक्रमात निश्चित झाले. लखनौ येथे १९२२ च्या कार्यकारिणीच्या बैठकीत बार्डोलीच्या ठरावास मूर्त रूप देण्यासाठी पुन्हा दुसरा ठराव झाला व त्यानुसार स्वामी श्रद्धानंद, सरोजिनी नायडू, आय. के. याज्ञिक व गंगाधरराव देशपांडे यांची एक समिती नेमण्याचे व समितीने प्रत्यक्ष कार्यक्रम आखण्याचे ठरविण्यात आले. दोन लाख रुपयांची त्यासाठी तरतूद करण्यात आली. वस्तुत: स्वामी श्रद्धानंद हेच या समितीचे संयोजक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते स्वामी श्रद्धानंद हे अस्पृश्यांचे कळकळीचे व श्रेष्ठ नेते होते. (Swamy was the greatest and the most sincere champion of the untouchables) त्यांनी समितीचा राजीनामा द्यावा अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली. स्वामीजींनी तातडीने उपाययोजना करण्याचे ठरविताच काँग्रेसश्रेष्ठींनी त्यात मोडता घातला ! नंतर समितीची पुनर्रचना, पुन्हा ठराव, पुन्हा त्यात संशोधन असा घोळ घालीत घालीत १९२३ सालच्या मे महिन्यात मुंबई येथे काँग्रेसच्या कार्यकारिणीने ठराव करून, अस्पृश्योद्धाराचे कार्य अ. भा. हिंदुमहासभेने करावे अशी विनंती केली ! काँग्रेसच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा प्रश्न असा बासनात गुंडाळण्यात आला ! काँग्रेसच्या या ठरावाचे जे पर्यवसान झाले त्याबद्दल डॉ. आंबेडकर यांनी भाष्य केले आहे की, 'This is the sad tale of the resolution, how it began and how it ended. What shameful close to a blazing start !'

स्वामी श्रद्धानंद आणि काँग्रेसचे चिटणीस पंडित मोतीलाल नेहरू यांचा अस्पृश्योद्धाराच्या कार्याबाबत झालेला पत्रव्यवहार या ग्रंथात डॉ. बाबासाहेबांनी दिला आहे. काँग्रेसच्या या कार्यासाठी नेमलेल्या समितीवर स्वामीजी राहिले असते तर त्यांनी महत्त्वाकांक्षी मोठा कार्यक्रम हाती घेतला असता व त्यासाठी काँग्रेसचा बराच मोठा फंड उपयोगात आणावा लागला असता या भीतीनेच स्वामीजींनी त्या समितीवर राहू नये असा सनातनी काँग्रेसवाल्यांनी प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी झाले. टिळक स्वराज्यफंडासाठी सव्वा कोटी रु. जमले असताना त्यातून अस्पृश्योद्धारासाठी पैसा देणे अवघड नव्हते. या फंडाची विल्हेवाट कशी लागली (लावली ?) हेही बाबासाहेबांनी काही आकडेवारी देऊन दाखविले आहे.

सुमारे ५० वर्षांपूर्वी काँग्रेसने अंगिकारलेल्या दलितवर्गाच्या विकासाचे कार्य फसव्या स्वरूपाचे होते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विवेचन अनेकांना पटेल असे आहे; पण नंतरच्या काळात, गांधीजी व बाबासाहेब दोघेहि दिवंगत झाल्यानंतरच्याहि आजच्या काळी समाजसुधारक दलितांच्या समस्यांशी कितपत समरस झाले आहेत ? महात्माजींचे मानवतेच्या व सहानुभूतीच्या दृष्टिकोणातून दलितोद्धाराचे कार्य चाललेले दिसत नाही. तसेच दलित समाजात अस्मितेची ज्योत पेटवून स्वत:च्या पायावर स्वाभिमानाने उभे रहाण्यास समर्थ करण्याचे बाबासाहेबांचे कार्यहि विशेष वेगाने चाललेले आढळत नाही. सामाजिक सुधारणेचे कार्य जवळजवळ थांबलेलेच आहे. सर्वांचाच भर दिसतो राजकारणावर ! राजकीय कार्याला चकाकी, लकाकी असते. परिणाम ताबडतोब 'दृश्यमान' असतो. सामाजिक सुधारणेची, आमूलाग्र समाजपरिवर्तन घडविण्याची प्रक्रिया दीर्घकालीन असते, ताबडतोब परिणाम दिसणारी नसते. ह्या मूलभूत सामाजिक कार्याची 'जाण' आज हरवली आहे ! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकारण केले; धर्मकारण, अर्थकारण यांतहि लक्ष घातले; पण सामाजिक कार्याचे, मूलभूत समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचे भान कधी सुटू दिले नाही. 'सामाजिक क्रांति' हे मूलभूत ध्येय निश्चित करून त्यास उपकारक ठरणारे, पोषक होणारे असे राजकीय व आर्थिक लढे दिले. जातीयता-निर्मूलनाखेरीज समताधिष्ठित नवसमाज निर्माण होणार नाही याची त्यांनी पक्की खूणगाठ बांधली होती. जातीयतानिर्मूलनासाठी आता हरिजनवाड्यात (बौद्धवाड्यात) सत्यनारायण करणे, सहभोजनाचे कार्यक्रम पार पाडणे हे पुरेसे नाही. समान सांस्कृतिक पातळी असलेल्या पण जातीने भिन्न असलेल्या कुटुंबात आंतरजातीय विवाह घडविणे हा जातीयतानिर्मूलनाचा व जातिनिरपेक्ष समाजनिर्मितीचा खरा मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहूमहाराज, स्वामी दयानंद, स्वामी श्रद्धानंद यांनी हा मार्ग पुरस्कारला आहे. या दिशेने कार्य करण्यासाठी समविचारी सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येणे अगत्याचे आहे, मग त्या कार्यकर्त्यांची राजकीय मते कोणती का असेनात.

सर्वंकष व समग्र सामाजिक क्रांतीचा रथ पुढे नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे हीच डॉ. बाबाहेब आंबेडकर यांना खरी श्रद्धांजली ठरेल ! □

# गुजरात

## सत्तेचा गड दूरच राहिला

वा. दा. रानडे

हितेंद्रभाईंना काँग्रेसमध्ये आणले की संघटना काँग्रेसमध्ये मोठी फाटाफूट होईल आणि गुजरातेत सत्तेचा गड आपल्याला पुनः सर करता येईल असा सत्तारूढ काँग्रेसच्या नेत्यांचा आडाखा होता; पण महापालिका निवडणुकांचे निकाल लक्षात घेता तो साध्य होण्याची शक्यता सध्या तरी कमी दिसते. राजकोट, सुरत आणि बडोदा या तीन महापालिकांच्या निवडणुका जनता आघाडीने मोठ्या बहुमताने जिंकल्या. सुरत व बडोद्याच्या निवडणुका म्हणजे आपल्या सरकारवरील विश्वासाचाच कौल आहे असे आपण मानतो, असे मुख्य मंत्री बाबूभाई पटेल यांनी म्हटले होते. या दोन्ही निवडणुका आपण जिंकू याबद्दल सत्तारूढ काँग्रेसच्या नेत्यांना एवढा विश्वास वाटत होता की, मुख्य मंत्री बाबूभाई पटेल यांनी राजीनाम्याची तयारी ठेवावी असे उद्‌गार काही नेत्यांनी काढले होते; पण त्यांची निराशा झाली. राजकोटप्रमाणेच सुरत व बडोद्यात सत्तारूढ काँग्रेसचा दणदणीत पराभव झाला. तिन्ही ठिकाणी जनता आघाडी व काँग्रेस या पक्षांना पुढीलप्रमाणे जागा मिळाल्या.

महापालिका निवडणुका

| शहर | जागा | जनता आघाडी | काँग्रेस | अपक्ष |
|---|---|---|---|---|
| राजकोट | ५१ | ३९ | १२ | – |
| सुरत | ६५ | ४२ | २३ | – |
| बडोदा | ६० | ४६ | १३ | १ |

या निकालांवरून असे दिसते की, बहुमताच्या आसपाससुद्धा काँग्रेस कोठे येऊ शकलेली नाही. विधानसभा निवडणुकांत या तिन्ही शहरांत आम्ही सर्व जागा हरलो होतो, तेथे काही थोड्या जागा आम्ही मिळवू शकलो ही आमची प्रगतीच आहे, असे काँग्रेस नेते आता म्हणत आहेत; पण त्यांनी कितीही सारवासारव केली तरी अपयश झाकले जात नाही. हितेंद्रभाईंनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यापासून रोज निरनिराळ्या ठिकाणचे संघटना काँग्रेस व किसान मजदूर लोकपक्षाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात काँग्रेसला मिळाल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या. काँग्रेसप्रवेशाची लाट सुरू झाली, आता या लाटेपुढे जनता आघाडीच्या सरकारचा टिकाव लागणार नाही, असे वातावरण तयार करण्यात येत होते. काही कार्यकर्ते काँग्रेसला मिळाले हे खरे; पण वस्तुस्थितीपेक्षा त्यांचा आकडा फुगवून सांगितला जात होता. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संघटना काँग्रेसचा एकही आमदार फुटला नव्हता व विधानसभेतील आघाडीच्या बहुमतास कोणताही धक्का लागला नव्हता. जनता आघाडीतील घटक पक्ष आणि किमलोप (किसान मजदूर लोकपक्ष) यांच्यातील भांडणांचा आपणास फायदा मिळेल हा काँग्रेस-नेत्यांचा होरा चुकला. जनता आघाडीतील पक्षांनी आपसातले मतभेद सांधले, एवढेच नव्हे तर किमलोपशीही युती केली, त्यामुळेच आघाडीला एवढे यश मिळू शकले.

तीन शहरांच्या महापालिका निवडणुकांत जनता आघाडीने मोठे यश मिळविले असले तरी त्या यशाच्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. साधारणपणे देशातील बहुतेक मोठ्या शहरांतील महापालिका निवडणुकांचे निकाल पाहिले तर त्यात काँग्रेसविरोधीच कौल दिसून येतो; पण विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना फारसे महत्त्व देता येणार नाही. स्थानिक निवडणुकांत स्थानिक प्रश्नांना प्राधान्य असते. त्यांच्या निकालावरून विधानसभा व लोकसभा निवडणुकांतील मतदानाचे बांधलेले अंदाज बरोबर ठरतीलच असे नाही. पण बदलत्या मतप्रवाहाची काहीशी कल्पना स्थानिक निवडणुकांवरून येऊ शकते. गुजरातेत मोठ्या शहरांतील सर्वसाधारण जनमत अजून काँग्रेसविरोधी आहे एवढाच मर्यादित निष्कर्ष या निकालांवरून काढणे वस्तुनिष्ठपणाचे होईल.

तीन महापालिका निवडणुकांत जनता आघाडीने विजय मिळविला, पण काही पालिका निवडणुकांत आघाडीचा पराभव करून काँग्रेसने विजय मिळविला, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नवसारी, पालनपूर, उमई, जेटपूर, वाकनेर बेरावळ, सोमनाथ, मेहसाणा, कादी, उंझा या नगरपालिकांत काँग्रेसने किंवा काँग्रेस नेतृत्वाखालील नागरिक समितीने बहुमत मिळविले. यांपैकी पहिल्या सात पालिकांचे निकाल तेरा ऑक्टोबरला जाहीर झाले. या निकालांनी जनता आघाडीच्या नेत्यांना एवढा धक्का बसला की, यापुढे फक्त राजकोट, सुरत, बडोदा व अहमदाबाद या चार महापालिकांच्याच निवडणुका लढवावयाच्या असे आघाडीने ठरविले. आघाडीने आपले मर्यादित सामर्थ्य ओळखण्याचीच ही खूण होती. पंचायतीचे निकाल अजून जाहीर व्हावयाचे आहेत. ग्रामीण मतदारांचा कौल कोणीकडे आहे याची कल्पना या निकालांवरून येईल. अहमदाबाद महापालिकेची निवडणूक २८ डिसेंबरला आहे. हे सर्व निकाल जाहीर झाल्यानंतरच गुजरातमधील जनमत जूनमधील विधानसभा निवडणुकीनंतर गेल्या पाच-सहा महिन्यांत बदलले आहे काय, याची समग्र कल्पना येईल. पण राज्याची सत्ता पुनः हाती मिळविणे काँग्रेस नेत्यांना वाटले होते तितके सोपे नाही, एवढे आतापर्यंतच्या निवडणूक-निकालांवरून निश्चित म्हणता येईल. स्वतःच्या पक्षातील केवळ गटबाजी थांबवून ती बळकट करण्यापेक्षा प्रतिस्पर्धी पक्षात फाटाफूट घडवून आणून त्याचा फायदा घेण्यावर काँग्रेस नेत्यांचा भर होता. तीन महापालिकांच्या निवडणुकांत तर या धोरणाला यश आले नाहीच, पण काही ठिकाणी यश आले तरी ते तात्पुरते असते, टिकाऊ नसते. त्यातून पक्ष वाढत नाही.

जनता आघाडीच्या संदर्भात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आघाडीने किमलोपशी युती केली हे कितपत योग्य झाले ? ज्यांचे सरकार खाली ओढण्यासाठी गुजरातेत मोठे आंदोलन झाले त्याच चिमणभाईंच्या पक्षाशी आघाडीने युती करावी, हे तिच्या मूळ भूमिकेशी विसंगत नाही काय ? जनता आघाडीस विधानसभेत निर्णायक बहुमत नाही. किमलोपच्या पाठिंब्यानेच हे सरकार टिकून आहे आणि या परिस्थितीचा बरोबर फायदा तो पक्ष घेत आहे. स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत आम्हाला पाहिजे तेवढ्या जागा देऊन आमच्याशी युती

पृष्ठ ३१ वर

एका नक्षलवादी क्रांतिकारकाच्या जीवनावर आधारलेली छोटी कादंबरी

# थँक्यू मिस्टर ग्लाड

## अनिल बर्वे

गेटवरल्या सेंट्रीने खडबडून भानावर येत सॅल्यूट ठोकला.

पण ग्लाडसाहेबाच्या करड्या नजरेने त्याची दादसुद्धा घेतली नाही. ग्लाडसाहेब रस्त्यावर आला नि त्याची पावले काळचाशार डांबरी रस्त्यावर खाड खाड वाजू लागली, तशी आसपासच्या झाडांवरल्या पाखरांची किलबिलही शांत झाली......

—ग्लाडसाहेबाचा दराराच तसा मोठा !

ग्लाडसाहेब मेनगेटशी आला की, राजमहेंद्री सेंट्रल जेलच्या भिंतीच तेवढ्या वाकत नसत. बाकी सारे कसे अगदी कमरेपासून लवत. बारा जेलचे पाणी प्यालेला, 'काला टोपी' असो, नाही तर छप्पन जेल फोडून पळालेला 'लाल टोपी' असो, ग्लाडसाहेबासमोर सारे कैदी कसे अगदी चळाचळा कापत. पंटर, कोरंटी नि चिंध्याचोर तर ग्लाडसाहेबाच्या एकाच थोबडीने चड्डीत मुतत. ग्लाडसाहेबाची दहशतच तशी मोठी. रोज एक तरी दंडा कोणाच्या तरी पाठीवर मोडल्याशिवाय ग्लाडसाहेब टिफिनला हात लावीत नसे !

खरे तर अंधारू लागल्यावर ग्लाडसाहेब आपल्या बंगल्याच्या व्हरांड्यात त्याच्या लाडक्या बुलडॉगचे कौतुक करीत असतानाच साऱ्यांना दिसे. रोजचा रिवाजच होता त्यान्ना तो. पण आजची दिवेलागणी मोठी विचित्र होती खरी—

'श्रीकाकुलमच्या सेशनने पोलीस चौकी उडवून सात पोलिसांना नि एका सबइन्स्पेक्टरला ठार मारल्याच्या आरोपावरून एका नक्षलवाद्याला फाशीची सजा देऊन पाठवला होता.'

फाशीचा कोणी कैदी तुरुंगात आला की ग्लाडसाहेबाला कोणी काफरच तावडीत सापडल्याचा आनंद होई. कोणाला फाशी द्यायचे म्हटले की इतर जेलचे सुपरिंटेंडेंट नर्व्हस होत, उदास होत; पण ग्लाडसाहेबाचा खाक्याच निराळा. एकेकाला फाशी चढवताना एखादे धार्मिक कृत्य केल्याचे सात्त्विक तेज ग्लाडसाहेबाच्या नजरेवर ओसंडे. नाही म्हटले तरी अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये दीड—दोनशेंना तरी ग्लाडसाहेबाने 'हँग' केले होते आणि आता तर 'राजनिष्ठ' ग्लाडसाहेबाच्या तावडीत राजद्रोही नक्षलवादीच सापडला होता.

—काही झाले तरी ग्लाडसाहेबाची राजनिष्ठा मोठी कडवी होती हे खरे. प्राण गेला तरी साहेब खाल्ल्या मिठाला जागल्याशिवाय राहिला नसता. बेचाळीसच्या चळवळीत हाती सापडलेल्या सत्याग्रह्यांना कारणे शोधून शोधून ग्लाडसाहेबाने गुरासारखे बडवून काढले होते; पण युनियन जॅक उतरून तिरंगा वर चढला तेव्हा ग्लाडसाहेबाने दुःख आवरून एक कडकडीत सॅल्यूट ठोकला नि आपली सेवा तिरंग्याला रुजू केली. ग्लाडसाहेबाची जेवढी निष्ठा फिरंग्याला होती तेवढीच आता तिरंग्याला होती. बुटाचा सोल फाटून निघेपर्यंत त्या हरामखोर नक्षलवाद्याला तुडवून काढल्याशिवाय ग्लाडसाहेबाला झोपच आली नसती आणि असा 'महत्त्वाचा' कैदी आला की चेकिंगला स्वतः जातीने उभे राहण्याचा साहेबाचा रिवाजही होताच.

बडा नक्षलवादी डेथसेंटेन्स लागून आला आहे हे आतापर्यंत साऱ्या बराकींना 'वायरलेसने' माहीत झाले होते. कैद्यांची कम्युनिकेशन आतूनच तशी मोठी परफेक्ट नि ग्रेट होती. एवढ्या कडेकोट पहाऱ्यातून नि कडक बंदोबस्तातूनही अगदी किरकोळ बातमीही, मग ती कोणाला दंडाबेडी पडल्याची असो वा कुणाला चार—आठ दिवसांची माफी मिळल्याची असो वा कुणाचे अपील फेटाळ्याची असो, प्रत्येक यार्डात—प्रत्येक बराकीत—प्रत्येक कैद्याला क्षणार्धात समजे. आज बडा नक्षलवादी आला आहे नि त्याच्या चेकिंगला स्वतः ग्लाडसाहेब येतो आहे, हे समजल्यावर सर्व खावखुजाव एकदम थांबून सर्वांचे कान मेनगेटला लागले. थोड्याच वेळाने साहेबाच्या शिव्यागाळीने, दंडाबुटाच्या तुडविण्याने आणि कैद्याच्या किंकाळ्याने जेलचा टॉवरही थरथरू लागणार होता. बडे बडे 'श्याने कावळेही' जीव मुठीत घेऊन मेनगेटला कान लावून बसले.

अंधारातून माणसाची आकृती येताना दिसताच सवयीने गार्डड्यूटीवरल्या जमादाराने टॉर्चचा झोत टाकला. ग्लाडसाहेबाला पाहताच खाडकन् बूट आपटीत सर्वांनी पाय जुळविले. ग्लाडसाहेबाच्या नजरेला तेवढ्यात एकाचे पोक खुपले. ग्लाडसाहेबाची जळजळीत नजर आपल्याकडे पाहताच पोक जाऊन खांदे ताठ झाले. ग्लाडसाहेबाने एकवार मात्र तिरस्काराने रिटायर व्हायला आलेल्या त्या हवालदाराकडे पाहिले......

नि मेनगेटचे दरवाजे करकरले. दरवाजापाशी उभ्या असलेल्या पोलीसव्हॅनला हातातल्या दंडचाने फटकावीत साहेब मेनगेटमध्ये शिरला. ग्लाडसाहेबाचे पाऊल मेनगेटमध्ये पडले, तत्क्षणी सारे जेलर नि सबइन्स्पेक्टर अटेंशनमध्ये उभे राहिले.

'कुठाय तो हरामखोर?'

—सातव्यावर आठवा सूर लावीत ग्लाडसाहेब गरजला.

सीनियर जेलर आदबीने पुढे येत उत्तरला,

'इन चेकिंगरूम, सर.'

गर्रकन् राईटला वळून तडातडा चेकिंगरूमच्या पायऱ्या चढता चढता ग्लाडसाहेब ओरडला,

'व्हेअर इज दॅट बास्टर्ड नक्सलाईट?'

'आय डोंट नो हू इज बास्टर्ड. बट दॅट नक्सलाईट इज मायसेल्फ!'

डाव्या कोपऱ्यातून आवाज आला. ग्लाडसाहेबाची करडी नजर तिकडे वळली मात्र, नि निमिषमात्र कोरडीच पडली. क्षणभर ग्लाडसाहेब पाहतच राहिला—

खादीच्या कुर्त्या-पायजम्यात जेमतेम तिशीचा, धारदार नाकाचा, टपोऱ्या डोळ्यांचा एक सावळासा तरुण एका हातात मायकोव्हस्कीच्या पोएमस् नि दुसऱ्या हातात सिगारेट घेऊन आरामात सीटिंगरूममध्ये बसल्याप्रमाणे बसला होता.

क्षणभरच, नि लगेच ग्लाडसाहेब भानावर आला. दातओठ खात एका झटक्यात नक्षलवाद्याच्या हातातून त्याने सिगारेट हिसकावून घेतली, तोच नक्षलवाद्याचा बळकट हात ग्लाडसाहेबाच्या मनगटावर पडला आणि शांतपणे सिगारेट परत काढून घेऊन एक झुरका मारीत नक्षलवादी म्हणाला,

'स्मगल्ड नाहीय. जेलमधलीच आहे. चारमिनार ! घेणार ?'

हातातले पाकीट पुढे करीत साक्षात ग्लाडसाहेबालाच नक्षलवाद्याने सिगारेट ऑफर केली. आता मात्र साहेबाचा तोल गेला नि साहेब कडाडला,

'भडव्या, फाशी, तरी अजून गांडमस्ती जिरली नाही का तुझी ?'

नक्षलवाद्याने एकवार रोखून ग्लाडसाहेबाकडे पाहिले नि तिरसट पण शांतपणे रोखठोक तो उत्तरला,

'फाशीच्या किरकोळ दोरखंडानं जिरणारी मस्ती आम्ही करीत नाही मिस्टर ग्लाड. आमची मस्ती फार मोठीय. तुमच्यासारखी खाकी कपड्यानं आली नाहीय ती !'

कैद्याच्या या अनपेक्षित उत्तराने नि वागण्याने सारी चेकिंगरूम एकदम गंभीर झाली. सोल फाटेपर्यंत कैद्याला बुटाने तुडवून काढण्याचे ग्लाडसाहेबाचे अवसानही ओसरले. तरी पण उसने अवसान आणीत साहेबाने सीनियर जेलरला फर्मावले,

'चेकिंग उरकून दंडाबेडी ठोका साल्याला. मग चांगला हात दाखवतो !'

'मिस्टर ग्लाड,'—चढत्या नि धारदार आवाजात नक्षलवादी ओरडला, 'बिहेव लाइक अ जंटलमन ऑर ए वॉरिअर. हातच दाखवायचा असेल तर दंडाबेडी न ठोकता पटांगणात या. बघू या तुमच्या मनगटात जास्त जोरय की माझ्या छातीत जास्त दमय !'

ग्लाडसाहेबाच्या रक्ताचे अगदी पाणी पाणी झाले. अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये हायर ॲथॉरिटीजनी सुद्धा ग्लाडसाहेबाचा असा पाणउतारा कधी केला नव्हता आणि आज फाशी झालेल्या एका कैद्याने असा अपमान हवालदार नि जेलरसमोर करावा ? तिरीमिरीसरशी टेबलावरचा रूळ उचलून साहेब नक्षलवाद्यावर धावला. तोच पोलीससबइन्स्पेक्टर धावत आला नि त्याने ग्लाडसाहेबाचा हात वरचेवर धरला...

'सर, स्टिल ही इज इन् माय पझेशन. यू कांट बीट हिम !'

ग्लाडसाहेबाने खाऊ की गिळू या नजरेने पी. एस. आय. कडे पाहिले आणि निमूट हात खाली घेतला. खालच्या रँकचा झाला तरी पी. एस. आय. त्याच्या डिपार्टमेंटमध्ये मोडत नव्हता आणि कायद्याची भाषा त्याच्या बाजूला होती. चेकिंग पूर्ण होऊन कागदपत्र संपेपर्यंत कैदी पोलीसच्या ताब्यात होता. दातओठ खात साहेब अस्वस्थपणे खुर्चीत बसला. बराच वेळ चेकिंगरूम निःस्तब्ध राहिली नि मग धीर करून सीनियर जेलरने नक्षलवाद्याच्या चेकिंगला सुरुवात केली—कैदी नंबर आठसोबयालीस.

डेथसेंटेन्स.

नाम वीरभूषण पटनाईक.

उमर वर्षे अदमासे तीस.

मग नक्षलवाद्याने शांतपणे कपडे काढले. जमादाराने पुढे होऊन खाणाखुणा पाहायला सुरुवात केली—

'बाये खांदेपे काला मोल, दाहीने हातपे काला मोल ऽ'

आणि शिपाई थबकलाच. 'साऽऽब,' चिरक्या आवाजात तो ओरडला. रजिस्टरमधले डोके सीनियर जेलरने वर उचलले नि त्याचे डोळे विस्फारले. एव्हाना ग्लाडसाहेबाचे लक्षही तिकडे गेले, —नक्षलवाद्याच्या पोटावर जखमेची भली मोठी खूण होती, 'इथे काय झालंय ?' —सिनियर जेलरने विचारले.

'थ्री नॉट थ्रीची गोळी घुसली होती चार इंच आत.'

—नक्षलवाद्याने उत्तर दिले. ग्लाडसाहेबाने एकवार कपाळावर आठ्या चढवल्या नि आपले लक्ष नक्षलवाद्याच्या बोलण्याकडे एकाग्र केले.

'खम्ममच्या जंगलात एस. आर. पी. बरोबरच्या चकमकीत लागली.'

'ऑपरेशन कोणत्या हॉस्पिटलमध्ये झालं ?'—

सीनियर जेलरने माहिती विचारली.

'हॉस्पिटलमध्ये कसलं आलंय ? माझं मीच केलं.'

'क्काय ?' ......

नाकावरून घसरणारा चष्मा सावरीत सीनियर जेलर किंचाळला.

'इक्विपमेंटस होती माझ्याजवळ. गॅसबत्त्या आणल्या गोविंदपेठहून. स्वतः सर्जन आहे मी.'

नक्षलवाद्याने अगदी सहजपणे माहिती पुरवली.

ग्लाडसाहेब वगळता इतरांकडे कधीही रिस्पेक्टफुली न पाहणाऱ्या सीनियर जेलरने तेवीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये प्रथमच एका कैद्याकडे रिस्पेक्टफुली पाहिले आणि आपले डोके पुन्हा रजिस्टरमध्ये खुपसले.

चेकिंग पूर्ण झाले.

सबइन्स्पेक्टरने टाचा जुळवून ग्लाडसाहेबाला सॅल्युट ठोकला. 'नाऊ कनव्हिक्ट इज इन् युवर पझेशन सर.' पी. एस. आय. म्हणाला.

'कनव्हिक्ट इज थरो जंटलमन. धाकात ठेवण्याची गरज नाही... सर, इफ यू काईंडली अलौ मी—कवितांची पुस्तकं द्यायचीत त्याला.'

'गीव्ह इट टू हिम,'—कशी काय कुणास ठाऊक; पण ग्लाडसाहेबाने उदार परवानगी दिली.

पी. एस. आय. ने नक्षलवाद्याच्या हातात पुस्तके देताना हळुवारपणे त्याचे हात थोपटत, शेवटचा निरोप घेतला आणि पुन्हा एकदा ग्लाडसाहेबाला सॅल्यूट ठोकून बरोबरच्या कॉन्स्टेबलसना घेऊन तो मेनगेटमधून बाहेर पडला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तुच्छतेने बघत ग्लाडसाहेब सीनियर जेलरला म्हणाला,

'या भडव्याला शाळाखात्यात भरती करण्याऐवजी पोलिसांत कुणा गाढवानं भरती केलं ?'

नक्षलवाद्याने आपला थालीपॉट आणि बिस्तरा उचलला नि फाशीगेटच्या जेलरबरोबर तो फाशीगेटकडे जाऊ लागला. एव्हाना ग्लाडसाहेबाचा 'सोल फाटेपर्यंत बुटानं तुडवण्याचा' नूर उडून गेला होता. तरी पण दरारा, धाक कायम राहावा म्हणून ग्लाडसाहेब तांडताड करीत मागोमाग गेला आणि त्याने नक्षलवाद्याला गचांडी धरून आपल्याकडे वळवले. पण ग्लाडसाहेबाने हात उचलायच्या आधीच दोस्ताचा थोपटावा तसा नक्षलवाद्याने ग्लाडसाहेबाचा खांदा थोपटला नि तो म्हणाला—

'आय ॲम टू मच टायर्ड. मिस्टर ग्लाड. उद्याच काय कोणी मला फाशी देत नाहीय. वर्षभर गाठीभेटी चालायच्यात आपल्या. काय रागलोभ असतील ते नंतर पाहून घेऊ. आत्ताच काय घाईय? नाऊ यू आल्सो रिलॅक्स. गुड नाईट!'

जेलरबरोबर नक्षलवादी फाशी गेटला निघून गेला. ग्लाड साहेबांची पावले मात्र जमिनीलाच खिळली. असा कैदी अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये त्याला प्रथमच भेटत होता. वस्तुतः फाशीच्या शिक्षेपेक्षा ग्लाडसाहेबालाच कैदी अधिक भिई; पण हा तर सुऱ्यांवर वरताण निघाला.

—अपमानाच्या शल्याने सारी रात्र साहेबाला झोप आली नाही.

ठण ऽ ठण ऽ ऽ ठण ऽ ठण ऽ ऽ

सकाळचे सहा वाजले.

वघ्यांची काळजे कुरतडत आणखी एक नवा दिवस उजाडला. बराकींचे ताळे खुलू लागले. आदल्या रात्री दस्तुर खुद्द ग्लाडसाहेब जातीने चेकिंगला हजर राहूनही कैद्याच्या किंकाळ्या ऐकू न आल्याने बेचैन झालेले कैदी जमादाराला—हवालदाराला बिडी काडी चायपाणी देत... मस्का लावत खबर घेऊ लागले. नळावर हौदावर इतकेच काय हग्यारीतही नक्षलवाद्याची चर्चा सुरू झाली. वॉर्डर येऊन कांजी वाटू लागला. कँटिनची गाडी चहा घेऊन आली; पण चर्चा संपेना. फर्स्ट वॉर्डर सर्वांना कामाला हाकलू लागला. मग सुतार खात्यात, लोहार खात्यात गप्पा सुरू झाल्या. ग्लाडसाहेबालाही गार करून टाकणाऱ्या नक्षलवाद्याविषयी सर्वांनाच प्रेमाचे भरते आले. एवढ्या दमदार तरुणाला फाशी दिल्याबद्दल जो तो सेशन जज्जची आयमाय उद्धरू लागला. काही ना काही चालबाजी करून फाशीगेटमध्ये जाऊन नक्षलवाद्याला पाहून येण्यासाठी, जमले तर त्याच्याशी चार शब्द बोलण्यासाठी जो तो काही तरकीब सुचते का ते पाहू लागला. स्वतःच्या पोरीवर रेप करणारा बंडलबाज वाऱ्या वॉर्डर मात्र नक्षलवाद्याबरोबर चहा पिऊन आल्याचे जेलभर सांगत हिंडत होता.

•

पाखरांची किलबिल एकदम शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. काळचाशार डांबरी रस्त्यावर पावले खाड् खाड् वाजू लागली. गार्ड-ड्युटीवरल्या शिपायांनी सलामी दिली. मेनगेट करकरत उघडले, आणि ग्लाडसाहेबानी जेलमध्ये पाऊल टाकले. ग्लाडसाहेबाची चाहूल लागताच जेलमधली वडापिंपळाची झाडंही अंग चोरून उभी राहिली. पाठीमागे कुजबूज चालू झाली असली तरी ग्लाडसाहेबाच्या करड्या नजरेसमोर अजून सारे लवूनच होते. मग ग्लाडसाहेब खटल्याला बसला.

'ए' क्लासमधल्या स्मगलरला जेलमध्ये चोरून रम–बिअरच्या बाटल्या आणल्याबद्दल उभे केले गेले.

ग्लाडसाहेबाने स्मरणशक्तीला ताण दिला. या महिन्याचा हप्ता गेल्या आठवड्यातच हाती पडल्याचे लक्षात येताच, स्मगलरला सक्त ताकीद देऊन सोडण्यात आले. 'ए' क्लासच्या जेलरला बाटल्या परत कैद्याला देण्याविषयी तोंडी कानहुकूम देण्यात आला. मग एका म्हाताऱ्या गावढळ खेडूत कैद्याला ग्लाडसाहेबासमोर उभे करण्यात आले. तीन नवर यार्डमध्ये सहा नंबरच्या बराकीत तिरुपतीची पूजा करून चोरून आणलेले पेढे वाटल्याचा त्याच्यावर आरोप होता. ग्लाडसाहेबाने म्हाताऱ्याला समोर बोलावले. म्हातारा हाताच्या अंतरावर येताच उजव्या आणि डाव्या दोन्ही हाताने लागोपाठ दोन कचकचीत थोबाडात भडकावत ग्लाडसाहेब गरजला—

'क्यो बे खोचड, बाहेर गू खातोस नि जेलमध्ये देव देव करतोस?' साक्षात ग्लाडसाहेबानेच दोन थोबाडात भडकवलेल्या पाहून हवालदाराने म्हाताऱ्याच्या पाठीवर तडाख्यात एक दंडा मोडून काढला. म्हातारा तोंडाला फेस येऊन खाली पडताच दोघा फर्स्ट वार्डरांनी तंगड फरफटवीत त्याला हॉस्पिटलात नेऊन टाकले.

आणि अशा रीतीने दिवसभर पुरल एवढा दरारा निर्माण केल्यावर इतर कैद्यांना तोंड, हात न चालवता केवळ लेखणीने ग्लाडसाहेबाने सजा फर्मावल्या. कोणाला दंडाबेडी ठोकली, कोणाची माफी कापली, कोणाला सेप्रेट बंद केले. नि मग ग्लाडसाहेब राऊंडला निघाला.

रोजचा सोपस्कार म्हणून जेलभर ग्लाडसाहेब राऊंड मारीत होता एवढेच. खरे तर त्याला प्रथम फाशी गेटमध्ये जायची इच्छा होती. काही तरी निमित्त काढून रात्रीचे उट्टे साहेबाला काढायचे होते. त्या देशद्रोही नक्षलवाद्याला सोल फाटेपर्यंत बुटाने तुडवून काढल्याशिवाय ग्लाडसाहेबाला चैन पडणार नव्हते. ग्लाडसाहेब भिशीमध्ये नुसता आला नि गेला, डाळ-साखर बंगल्यावर पोचवायची ऑर्डरही दिली नाही हे पाहून भिशीचा जेलरही आश्चर्यचकित झाला!

ग्लाडसाहेब फाशीगेटमध्ये शिरला नि हवालदार-वॉर्डरांनी त्याच्याभोवती कडे केले. फाशीचा कैदी— डेस्परेट झालेला, साहेबाच्या अंगावरही जायचा. ग्लाडसाहेब एक नंबरच्या कोठडीपाशी थबकला...

'मैंने खून किया नही, मैंने खून किया नही'. असे अहोरात्र ओरडणारा पागल कैदी रडूनभाकून, ओरडून ओरडून थकला होता. अंगाचा मुटकुळं करून वळचणीला पडला होता. त्याला झोपलेला पाहताच ग्लाडसाहेबाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली आणि ग्लाडसाहेब हवालदारांवर ओरडला...

'डोळे फुटलेत काय? बादल्या बादल्या पाणी मारा आत.' मग हवालदारांनी दहाबारा बादल्या पाणी दणादणा कस्टडीत मारले. थंडीने काकडत वेडा कैदी जागा झाला. ग्लाडसाहेबाला पाहताच हीव भरल्यासारखा थडथडत दाराशी आला. गजातून हात बाहेर काढीत साहेबाचे पाय पकडू लागला; पण आतापर्यंत ग्लाडसाहेबातला लांडगा पुरता जागा झाला होता. भेसूर हासत ग्लाडसाहेबाने आपल्या नालबंद लठ्ठ बुटाच्या टाचेखाली वेड्या कैद्याचे पाय चिरडले. वेड्या कैद्याची बोटे, पंजे रक्ताने माखले तसा हातातला दंडा फेकून कोठडीतला कुंडा ग्लाडसाहेबाने फोडला. कुंड्यातले गुमूत्र कोठडीभर पसरले. तसा ग्लाडसाहेब पुन्हा भेसूर गडगडला आणि ओरडला, 'मादरचोत, झोप लागते काय तुला? पागलकुत्ते, झोप आता. झोप झोप!'

आणि ग्लाडसाहेब नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर येऊन उभा ठाकला. ग्लाडसाहेबाला आलेला पाहताच नक्षलवाद्याने 'हॅलो मिस्टर ग्लाड, हाऊ आर यू!' विचारीत मंदस्मित केले नि मग ग्लाडसाहेबाच्या अस्तित्वाचीही दखल न घेता शांतपणे बिछाना पसरून त्यावर अंग ताणून दिले.

नक्षलवाद्याच्या या वागण्याने ग्लाडसाहेब लालीलाल झाला.

संतापाने त्याच्या तोंडून शब्दही फुटेना. तेव्हा मग नक्षलवादीच ओरडला...

'हवालदार, बघता काय ? दहा–बारा बादल्या पाणी मारा आत. आणि मिस्टर ग्लाड, तुम्ही जरा साबण फेका. आंघोळ आटोपून घेतो मी.'

अपमानित ग्लाडसाहेब गरकन् वळला नि ताडताड फाशीगेटमधून चालता झाला. संतापाने त्याच्या नाकपुड्या बारा मोटा खेचलेल्या बैलाप्रमाणे फुरफुरत होत्या.

'पोलिसांबरोबर उडालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार !'

–टाइम्समधील हेडलाइन वाचून ग्लाडसाहेब भलताच खूष झाला आणि त्याने ब्रेकफास्टसाठी चार अंड्यांचे आम्लेट करण्याचा हुकूम सोडला. टाइम्समधली ती बातमी ग्लाडसाहेब पुन:पुन्हा चवीने वाचू लागला.

वस्तुतः ग्लाडसाहेबाचा नि राजकारणाचा दुरान्वयेही संबंध नव्हता. युनियन जॅकच्या जागी तिरंगा आला या पलीकडे स्वातंत्र्याचाही अर्थ फारसा त्याला कधी जाणवला नाही. स्वातंत्र्यानंतर तुरुंगाविषयीही नवे नवे कायदे झाले; पण करप्शनची संधी असलेले कायदे वगळता इतर सारे कायदे साहेबाने पायदळीच तुडवले आणि आपला जुनाच अंमल चालू ठेवला ! तरी पण तुरुंगात 'नक्षलवादी' आल्यापासून आणि त्याच्याशी स्वत:हून उभे वैर मांडल्यापासून नक्षलवादाविषयी ग्लाडसाहेबाला फारच मोठी उत्सुकता लागून राहिली होती. या देशद्रोही पंचमस्तंभियांचे तत्त्वज्ञान तरी काय आहे हे समजून घेण्यासाठी दोन महिन्यांपूर्वी ग्लाडसाहेबाने गलेलठ्ठ आठ-दहा पुस्तकेही आणली होती; पण मार्क्स-लेनिन आणि माओच्या ग्रंथातील चार पाने काय एकरकमी ग्लाडसाहेब वाचू शकला नाही. खरे तर हा त्याचा प्रांतच नव्हता. साहेबाने वाचलेला सर्वांत मोठा ग्रंथ म्हणजे 'जेल मॅन्युमल.'

तरी पण, नक्षलवादी मारले गेले म्हणजे ग्लाडसाहेबाला आनंद होई आणि नक्षलवादी चळवळीचा वाढता जोर पाहून साहेबाच्या उरात धडकी भरे. भारतात खरेच 'कम्युनिस्ट रेव्होल्युशन' होणार असे त्याला वाटू लागे. अर्थात जरी भारतात कम्युनिस्ट रेव्होल्युशन झाली असती तरी फारसे काही बिघडले नसते. तिरंगा उतरून लाल बावटा वर चढल्यावर ग्लाडसाहेबाने दु:ख आवरून एक कडकडीत सॅल्युट ठोकला असता नि आपली सेवा लाल बावट्यालाही रुजू केली असती.

मात्र एक गोष्ट खरी की, तीन महिने लोटले तरी नक्षलवाद्याला आपण अजून तुडवून काढू शकलो नाही या गोष्टीने साहेब मोठा चिंताग्रस्त झाला होता. आपला दरारा तर संपला नाही ना ? की आपण म्हातारे झालो ? अशा नाना शंका अहोरात्र साहेबाच्या डोक्यात पिंगा घालीत होत्या. रोज सकाळी ड्युटीवर निघताना वाट्टेल ती कुरापत काढून सोल फाटेपर्यंत नक्षलवाद्याला बुटाने तुडवायचे अशी प्रतिज्ञा करून साहेब बाहेर पडे; पण मेनगेटमध्ये शिरताच त्याचे अर्धे अवसान गळे नि नक्षलवाद्याला समोर पाहताच त्याचा सारा नूरच उतरून जाई आणि संतापाने फणफणत साहेब घरी परते.

हा नक्षलवादी तुरुंगात आल्यापासून खुद्द ग्लाडसाहेबालाच तुरुंग म्हणजे शिक्षा झाल्यासारखे वाटत होते. प्रत्येक भेटीत आधी कधी काही झालेच नाही इतक्या शांतपणे हसून नक्षलवादी बोले आणि बोलताना नक्षलवादी अगदी बरोबरीच्या नात्याने बोले. प्रत्येकाला तो नावानेच हाक मारी. कोणाला साहेब म्हणणे हे त्याच्या शब्दकोषातच नव्हते आणि खरे तर ग्लाडसाहेबाला याचाच मोठा राग होता. हायर ॲथॉरिटीज वगळता खुद्द मेमसाबही त्याला 'साहेब' म्हणूनच हाक मारीत असे आणि असे असता एक कैदी आपल्याला नावाने हाक मारतो म्हणजे काय ?–नुसत्या विचारानेच ग्लाडसाहेब अस्वस्थ झाला.

पण त्या नक्षलवाद्यावर संतापण्यात फारसा अर्थ नव्हता. साहेब जेवढा तिरका वागे त्याच्या दसपट तो तिरका वागे. साहेबाच्या आवाजाने यार्ड दुमदुमला तर नक्षलवाद्याच्या आवाजाने तुरुंग दुमदुमे. बरे, वर पुन्हा जिवावर उदार झालेला, फाशीची शिक्षा होऊनही तीन महिन्यांत चार पौंड वजन वाढलेला कैदी. मृत्यूचीही तमा न बाळगणारा मारहाणींना काय भिणार ? उलट त्याच्या अंगावर हात टाकायची आता साहेबालाच मनातून भीती वाटू लागली होती. हाताखालचे सारे जेलर, हवालदार त्याला फितूर असल्याचा साहेबाचा संशय होता. ग्लाडसाहेब वगळता इतर कुणाशीच, अगदी वॉर्डर-वॉचमनशीही नक्षलवाद्याचे वैर नव्हते. उलट चांगली मैत्रीच होती. सीनियर जेलरशी नक्षलवादी तास न् तास गप्पा मारीत असतो अशी कुणकुणही साहेबाच्या कानावर होतीच.

'एकदा तरी साल्याची हाडं खिळखिळी करीनच !' गार्डनचेअरमध्ये झोके घेत साहेब स्वत:शीच पुटपुटला. एवढ्यात फोन खणखणला. सीनियर जेलर बोलत होता, 'सर, कैदी नंबर आठशेबयालिस. वीरभूषण पटनाईक याचे अपील सुप्रीमने फेटाळले नि डेथसेंटेन्स कन्फर्म केली.'

सुप्रीमचा डिसीजन ऐकून ग्लाडसाहेब हरखून गेला आणि ब्रेकफास्टमध्ये स्लाईसला भरपूर बटर फासण्याविषयी त्याने हुकूम दिला !

ग्लाडसाहेबाचा साराच खाक्या और. ग्लाडसाहेबाचा ब्रेकफास्ट देखील अगदी एखाद्या ओल्या डिनरसारखा. तासभर नुसत्या ब्रेकफास्टने घेतला. मग साहेबाने आपली खाकी वर्दी चढवली. अधिकाऱ्याच्या त्या कपड्यात ग्लाडसाहेबासमोर कळीकाळही चळचळा कापला असता; पण तो नक्षलवादी...!'

'बरं झालं डेथसेंटेन्स कायम झाली. त्या नक्षलवाद्याचे चिवट 'मोराल' आता डळमळले असेल. हीच ती वेळ, जेव्हा नक्षलवाद्याला नेहमीच्या थाटात सोल फाटेपर्यंत बुटाने तुडवून काढता येईल.' साहेबाने स्वत:शीच विचार केला अन् तो ताड्ताड् तुरुंगाकडे चालू लागला.

पाखरांची किलबिल एकदम शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. काळचाशार डांबरी रस्त्यावर पावले खाड् खाड् वाजू लागली. गार्ड-ड्यूटीवरले हवालदार अटेन्शनमध्ये उभे राहिले. मेनगेटचे दरवाजे करकरले...

साहेब ऑफिसमध्ये येताच फाशीगेटचा जेलर अदबीने पुढे सरसावला. नक्षलवाद्याला डेथसेंटेन्स सुप्रीमने कन्फर्म केली असल्याचे सांगितले म्हणाला. मग ग्लाडसाहेबाने खणातून चार कागद काढले.

नक्षलवाद्याला राष्ट्रपतींना दयेचा अर्ज करण्याची संधी देणे, हे त्याचे काम होते आणि साहेब स्वतःच फाशीगेटकडे निघाला,

नेहमीच्याच थाटात गजाला टेकून उभ्या असलेल्या नक्षलवाद्याने ग्लाडसाहेबाला पाहिले नि नेहमीचेच मंदस्मित करीत विचारले,

'हॅलो, मिस्टर ग्लाड ! हाऊ आर यू ?'

'हॅलो, कैदी नंबर आठसो बयालीस.'

आपला आसुरी तिरस्कार व्यक्त करीत ग्लाडसाहेब गडगडला. 'कैदी नंबर आठसोबयालीस... तू एकशे बारावा, ज्याला मी हॅंग करणार. हाः हाः हाः तुला हॅंग करायला इतके आवडेल म्हणतोस. तुझा जीव जाता जायचा नाही. फासाच्या दोराला तडफडत तडफडत लोंबकळशील. तुला तडफडताना पाहून मला इतके बरे वाटेल... खुशी होगी खुशी.'

आपल्या घाऱ्या डोळ्यांत रानमांजराचे क्रौर्य आणीत ग्लाडसाहेब आरडतओरडत होता. एखाद्या हिस्टेरिया झालेल्या माणसासारखा.

'यू ट्रेटर नक्सलाईट. फाशीच्या कोठडीत शिरताना कसे काय वाटेल तुला ?'...ग्लाडसाहेबाने विचारले.

चेहऱ्यावर तीच विरागी शांती नि स्मित कायम ठेवीत नक्षलवाद्याने उत्तर दिले...

'उंच शिखर असलेल्या चर्चमध्ये शिरतोय आपण असं वाटेल.'

नक्षलवाद्याच्या या उत्तराने ग्लाडसाहेबाच्या हिरव्या डोळ्यांतले रानमांजराचे क्रौर्य अलगद् ओसरले नि त्याची जागा शेवाळ धरलेल्या सरोवराच्या संथ पाण्याने घेतली. ग्लाडसाहेब क्षणभर निःस्तब्ध झाला नि मग खिशातून कागद काढून नक्षलवाद्याच्या हातात कोंबत खालच्या आवाजात म्हणाला, 'यू कॅन राइट युवर मर्सिपिटीशन टू प्रेसिडेंट ऑफ इंडिया.'

ग्लाडसाहेबाने हातात कोंबलेला कागद नक्षलवाद्याने एकदा खालीवर करून पाहिला. मग शांतपणे त्याची नीट घडी घातली आणि ती घडी ग्लाडसाहेबांच्या खिशात घालून, साहेबाची छाती थोपटत नक्षलवाद्याने साहेबाला सांगितले—

'कीप इट विथ यू मिस्टर ग्लाड. मला हॅंग केल्यानंतर प्रमोशनचा अर्ज करायला उपयोगी पडेल'

वस्तुतः नक्षलवाद्याने केलेल्या या अपमानाने ग्लाडसाहेब चवताळायला पाहिजे होता. पण तो बावचळला. काल रात्री घेतलेली अजून उतरली नाही की काय या भावनेने त्याने स्वतःला चिमटा काढून पाहिला.

फाशी झाल्यावर कैदी कसा आपल्या पायावर कोलमडून पडला पाहिजे. पण हा साला तर स्वतःच्याच मिजाशीत. ग्लाडसाहेबाने एकदा तोंड चोळले नि नक्षलवाद्याला बजावले,

'यू. सी. आठच दिवसांची मुदत आहे. तुझा अहंकार संपेल तेव्हा वेळ टळली नसेल याची काळजी घे.'

आणि बऱ्याच महिन्यांनी नक्षलवाद्याला भेटूनही न संतापता, न चिडता ग्लाडसाहेब फाशीगेटच्या बाहेर पडला.

उन्हाची तिरीप बिनदिक्कत बेडरूममध्ये शिरली आणि ग्लाडसाहेबाच्या चेहऱ्यावर जाऊन पडली. ग्लाडसाहेबाने डोळे घट्ट मिटून


सॅपोटेक्स १००% विशुद्ध सोप पावडर




आतां ३ नवीन सुबक आकारांत उपलब्ध
२½ कि.ग्रॅ. १ कि.ग्रॅ. ½ कि.ग्रॅ.

आपल्या कपड्यांची धुलाई अत्यंत स्वच्छ आणि सफेद होण्यासाठी
सॅपोटेक्स वापरा. त्यात सफेदीसाठी ऑप्टिकल व्हाइटनर मिसळलेले असते.
सॅपोटेक्सने धुलाई केल्याने नाजूक कपडे सुद्धा सुरक्षित राहतात.

सॅपोटेक्स-भारतातील सर्वांत अधिक खपाची सोप पावडर

स्वस्तिक हाऊसहोल्ड ॲण्ड इंडस्ट्रिअल प्रॉडक्ट्स लि.

प्रकाशाला दूर सारायचा प्रयत्न केला. पण वाढते ऊन बेटे ऐकेचना, तेव्हा मग ग्लाडसाहेबाने डोळे किलकिले केले. सूर्य आता कौलांवर चढायचाच तेवढा बाकी राहिला होता. आणि झोपमोड केल्याबद्दल सूर्याला सस्पेंड करणे काही ग्लाडसाहेबाच्या हाती नव्हते. मग चडफडत उठणे ग्लाडसाहेबाला भाग पडले.

ग्लाडसाहेबाने चूळ बाहेर फेकली आणि नाईटगाऊनचा पट्टा आवळीत खानसाम्याला चहा आणण्याविषयी फर्मावले. मग निवांतपणे टाइम्समध्ये तोंड खुपसले. तोंडासमोर टाइम्स धरून चहा घेता घेता, आज जेलमध्ये जाताच कसा काय दरारा निर्माण करावा, आज कोणाच्या पाठीवर दंडा मोडावा, कोणा जेलरला फैलावर घ्यावे याचा विचार करीत बसणे हा साहेबाचा लाडका छंद होता.

ग्लाडसाहेब आपल्याच विचारात दंग होता तोच शिपायाने येऊन डिस्टर्ब केले. कोणा कैद्याची बायको भेट मागायला आलीय म्हणून म्हणाला. साहेबाने तिला तसेच ताटकळत ठेवायला सांगितले आणि ग्लाडसाहेब पुन्हा विचारात दंग झाला....

तसे पाहता फाशी झालेल्या कैद्याला तुडवून काढण्याचा ग्लाडसाहेबाचा प्रघात नव्हता. त्या मागे मोठी माणुसकीची भावना होती असेही नव्हते. फाशी झालेला कैदी मुळातच इतका खचून गेलेला असे की, ग्लाडसाहेबानं नुसता आवाज चढवला तरी साहेबाच्या पायाशी तो लोळण घेई. पण हा नक्षलवादी ?...

'साला भलताच उद्दाम दिसतोय. मर्सिपिटिशन करायलाही रिफ्यूज करतो म्हणजे काय ?'...सवयीने पाने उलटत साहेब स्वतःशीच पुटपुटला. पण खरं तर नक्षलवाद्याने मर्सिपिटिशनला नकार दिल्याने ग्लाडसाहेबाच्या मनात कोठे तरी त्याच्या विषयी किंचित आदराची भावना निर्माण झाली होती. तरी पण एकदा तरी साल्याला सोल फाटेपर्यंत बुटाने तुडवून काढण्याचा स्वतःचा पणही साहेब विसरलेला नव्हता.

नक्षलवाद्याला कसा तुडवावा आणि मुळात म्हणजे तुडवावाच की नाही, यावर साहेब बराच उलटासुलटा विचार करीत असताना शिपायाने पुन्हा येऊन डिस्टर्ब केले. तेव्हा साहेब चडफडत उठला. बाहेर जाऊन, आलेल्या बाईला दम देऊन पिटाळून लावावे या हेतूने साहेब ताडताड करीत व्हरांड्यात आला...

कधी काळी जिचा चेहरा अतिशय गोड असावा अशी एक पंचविशीची तरुणी, नजरेत थिजलेले दुःख आणि चेहऱ्यावर मेलेली उदासीनता घेऊन उभी होती. साहेबाला पाहताच ती कडेवरच्या पोराला सांभाळत पाय ओढीत ग्लाडसाहेबापुढे आली आणि माझ्या नवऱ्याला फाशी झालीय. कैदी नंबर आठसो बयालीस. वीरभूषण पटनाईक, त्याला भेटायला शंभर मैलांवरून पायी चालत आलीय म्हणाली. आज सेकंड सॅटरडेची सुटी असल्याने भेट होणार नाही असे सीनियर जेलरने सांगितल्याचे सांगितले आणि कशीही करून भेट द्या अशी विनंती करू लागली...

कायद्याप्रमाणे कायदा आणि फायद्याप्रमाणे कायदा हे दोनच खाके पाठ असलेल्या ग्लाडसाहेबाने मुद्दाम तिच्यावर मेहेरनजर करायची काहीच गरज नव्हती. पण ग्लाडसाहेबाच्या डोक्यात तेवढ्यात एक असुरी भावना चमकून गेली...आणि दुपारपर्यंत जेलच्या दरवाज्यासमोर वाट बघत बसायला त्याने तिला फर्माविले.

माध्यान्हीचे ऊन रणरणत होते. जेलच्या मेनगेटसमोरील व्हिजिटर रूम बंद होती. अनवाणी पायाने पैशाअभावी चालत आलेली नक्षलवाद्याची बायको पोराला पदराच्या आडोशाखाली घेऊन उन्हापासून वाचवायचा केविलवाणा प्रयत्न करीत होती. सूर्य डोक्यावर आला तेव्हा उभे राहणेही तिला जमेना. पण बसायलाही कोठे जागा नव्हती. अधूनमधून उन्हाची झळ...येताना धुळीचे लोट घेऊन येई. तिच्या घशाला कोरड पडली. त्यात पोटात अन्नाचा कण नाही. मग पाणी मागायला ती मेन गेटपाशी आली आणि मेनगेटच्या जमादाराला तिने पाणी मागितले. पण एव्हाना बंगल्यावरून ग्लाडसाहेबाची, बाई नक्षलवाद्याची बायको असल्याची सूचना मेनगेटच्या जेलरला आली होतीच. तिने पाणी मागताच मेनगेटचा जेलर खेकसला—'ही काय पाणपोई आहे काय ? जेल आहे जेल. हो चालती. साहेब आल्यावर भेट मिळेल. नुसती भुणभुण नकोय.'

बाई अपमानित होऊन मागे फिरली. उन्हाच्या झळा असह्य होऊन तिच्या खांद्यावरले पोर टाहो फोडून रडू लागले. मग बऱ्याच वेळाने रडून रडून ग्लानी येऊन झोपी गले...

चांगले चार वाजायला आले तसा ग्लाडसाहेब सावकाश उठला. त्याने आपली अधिकाराची वर्दी चढवली नि अंगात गुर्मी आणून तो खाड्खाड् चालू लागला.

पाखरांची किलबिल एकदम शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले खाड्खाड् वाजू लागली. गार्डड्यूटीवरल्या शिपायांनी सलामी दिली. मेनगेट करकरत उघडले आणि ग्लाडसाहेबाने तुरुंगात पाऊल टाकले.

मेनगेटचा जेलर अदबीने पुढे येऊन उभा राहिला: गव्हर्नमेन्टच्या खास इन्स्ट्रक्शनप्रमाणे नक्षलवाद्याला जाळीतून नव्हे तर सुपरिंटेंडच्या खोलीत व्हिजिट घ्यायची होती. तो काय बोलतो.. कोणाशी बोलतो याचा रिपोर्ट घ्यायचा होता. ग्लाडसाहेबाने बराच विचार केला... आणि नक्षलवाद्याला दोरखंडानी बांधून घेऊन यायला हुकूम केला. वस्तुतः नक्षलवाद्याच्या हातापायात दंडाबेडी होतीच. वर पुनः दोरखंडाने त्याला बांधायची काही गरज नव्हती. पण नक्षलवाद्याला त्याच्या बायकोसमोर जास्तीत जास्त अपमानित करून मग तुडवून काढायचा ग्लाडसाहेबांचा विचार होता. काही झाले तरी नक्षलवाद्याला तुडवून काढल्याशिवाय ग्लाडसाहेबाला सुखाची झोप ही आलीच नसती...

मेनगेटच्या जमादाराने नक्षलवाद्याच्या बायकोला आत घेतले. ती आली नि उभी राहिली. ग्लाडसाहेबाने तिला बसायला खुर्ची देण्याविषयी हवालदाराला फर्मावले. इतर काहीही असले तरी, गोऱ्या साहेबाचे स्त्रीदाक्षिण्य ग्लाडसाहेबाच्या रोमारोमात पुरते भिनलेले होते हे खरे. मग साहेब विचार करू लागला...काय कुरापत काढावी, कसा त्या नक्षलवाद्याला भडकवावा आणि मग कसा काय तुडवावा. साहेबाने एकवार समाधानाने बेल्टवरून हात फिरवला. नेहमीचा कापडी बेल्ट न चढवता साहेब मुद्दाम लेदरचा बेल्ट चढवून आला होता. कोणाला तुडवायचे असेल तर लेदर बेल्ट जास्त चांगला...

खणण् खण् खणण् खण्.

पायातली दंडाबेडी आवरीत नक्षलवादी ग्लाडसाहेबाच्या ऑफिसात आला. बायकोला पाहताच त्याच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडला. मग बराच वेळ ती दोघे अबोल राहिली. थोडया वेळाने नक्षलवाद्याच्या बायकोलाच परिस्थितीचे भान आले. तिने पाहिले, दंडाबेडीने नक्षलवाद्याच्या नडगीला जखमा झाल्या होत्या. त्यातून रक्त वाहत होते. तिने ग्लाडसाहेबाला विनंती केली....

'मि. ग्लाड, यांना खुर्ची मिळेल का बसायला ?'

ग्लाडसाहेबाच्या मस्तकाची शीर तडकली. ही बाई देखील मिस्टर ग्लाड म्हणते. साहेब म्हणत नाही. ग्लाडसाहेब एकदम ओरडला...

'कैद्याला खुर्ची द्यायचा कायदा नाही. जेल आहे हा. सिनेमा थिएटर नाही.' ग्लाडसाहेबाच्या उत्तराने संतापून नक्षलवाद्याच्या बायकोने ओठ दावले. तोच नक्षलवादी तिला म्हणाला,

'वेडी कुठली. असंस्कृत माणसांकडून शिष्टाचाराची कसली अपेक्षा करतेस ?' नक्षलवाद्याच्या या बोलण्याने ग्लाडसाहेब खवळला नि त्याने ड्रावरमधून रूळ काढला. तोच नक्षलवाद्याने बायकोला विचारले,

'माझ्यासाठी मर्सिपिटीशन करणार आहेस ?'

त्यावर करारी बाण्याने ताडकन् उत्तरली...

'कधीही नाही, जीव गेला तरी हरकत नाही. जुलम्यापुढे गुडघे का म्हणून टेकायचे ?'

ग्लाडसाहेबाच्या गालावर खाडकन् वळ उमटले, साहेबाचे डोके बधीर झाले. पायाखालची जमीन दुभंगली. चार 'गेस्टापो' माराला गॅस चेंबरमध्ये कोंबायला फरपटत नेत होते. ग्लाड त्यांच्या पायावर लोळण घेत होता. नेहमी ग्लाडपुढे अधोमुख उभ्या राहणाऱ्या त्याच्या मरीयमने-माराने चवताळून जाऊन एकदम ग्लाडसाहेबाच्या मुस्काटात मारली आणि विचारले, 'गेला माझा जीव तर हरकत नाही. पुरुष असून षंढासारख्या या अत्याचाऱ्यांच्या पुढ्यात लोळण का घेतोयस ?'

ग्लाडसाहेबाचा घसा आठवणीने कोरडा पडला नि एकाएकी त्याचे सारे अंग भाजून निघू लागले. साहेबाने एकवार स्वतःकडे पाहिले नि कासावीस होत तो एकदम उभा राहिला. त्याच्या अंगावर थर्ड राइशचे कपडे होते. घाबरून जाऊन त्याने बाहेर पाहिले...गॅस चेंबरमध्ये मारा तडफडत होती. ग्लाडसाहेबाला भोवळ येऊ लागली....

ग्लाडसाहेब धडपडत उठला. त्याला स्वतःचा तोल आवरत नव्हता. नक्षलवाद्याची बायको धावत पुढे आली आणि ग्लाडसाहेबाला सावरीत तिने विचारले.

'व्हॉट हॅपन्ड मिस्टर ग्लाड ?'

ग्लाड तिच्या तोंडाकडे वेड्यासारखा पाहतच राहिला. मग एकदम आवेगाने तिचे खांदे गदगदा हालवत ओरडला...

'व्हाय यू हेट मी माय डिअर, व्हाय यू हेट मी. आय ॲम नॉट थर्ड राइश. आय ॲम नॉट थर्डराइश...'

मग ग्लाडसाहेब एकदम शांत झाला. त्याच्या चेहऱ्यावरून घामाच्या धारा वाहत होत्या. त्याच्या पायाला कंप फुटला होता. झाल्या प्रकाराने दिङ्मूढ झालेला मेनगेटचा जेलर बावळटासारखा नुसता उभा होता. ग्लाडसाहेबाने त्याला फर्मावले,

'यांची भेट चालू राहू दे !'

आणि खुरडत खुरडत ग्लाडसाहेब बंगल्याकडे चालू लागला. गेटवरल्या सेंट्रीला वाटले, 'आज दुपारीच साहेबाने भरपूर झोकलेली दिसते'

ग्लाडसाहेबाने बेडरूममध्ये येऊन अंग झोकून दिले. साहेबाचा जीव तडफडत होता. त्याला वाटत होते, केव्हाही रडू फुटेल. पण साहेब रडला नाही...नुसता तळमळत राहिला. तडफडत राहिला,

तासभर गेला नि फोन खणखणला. मेनगेटचा जेलर बोलत होता- 'सर, अजून कैद्याची मुलाखत संपत नाहीय.' ग्लाडसाहेबाने घोगऱ्या आवाजात सूचना दिली...'बंदी पर्यंत मुलाखत चालली तरी हरकत नाही, तुम्ही बाहेरच बसा. दोघांना मोकळेपणी बोलू द्या.'

ग्लाडसाहेबाने रिसीव्हर खाली ठेवला. आणि सेफचा लॉकर उघडला. थरथरत्या हाताने त्याने माराची फोटोफ्रेम बाहेर काढली. एकवार गालावर कुरवाळून तिचे चुंबन घेतले नि ग्लाडसाहेब जिना उतरला...

दिवाणखाण्यातल्या पियानोवरचे धुळीने मेणचट झालेले आवरण काढून फेकले नि पियानोवर माराची फोटोफ्रेम ठेवून नुसता पाहात बसला.

उन्हे उतरली. बंदीचे टोल पडले. साहेबाने बाहेर पाहिले. नक्षलवाद्याची बायको कडेवरच्या पोराला सावरीत परत निघाली होती. साहेबाला तिच्या अनवाणी पायाला पडलेल्या भेगा आठवल्या. आणि साहेबाचा जीव कळवळला. एकदम ओरडून त्याने शिपायाला बोलावले. शिपाई समोर उभा राहताच खिशातून चार पाच नोटा काढून त्याच्या हाती देत साहेबाने हुकूम केला,

'ती बाई चाललीयना तिला नेऊन दे,' शिपायाने पाठ फिरवली तोच साहेब म्हणाला, 'ए...मी दिलेत म्हणून सांगू नको. कैद्याला नव्या नियमाने देण्यात येणारा भत्ताय म्हणून सांग नि तिच्याकडून पावती घे'

शिपाई सलाम ठोकून निघून गेला. आणि साहेबाला जाणवले त्याच्या छातीवरचे ओझे एकदम कमी झाले होते. साहेबाच्या तोंडावरून बऱ्याच वर्षांनी पुण्यकर्म केल्याचे सात्त्विक तेज ओसंडले नि नकळत ग्लाडसाहेबाची बोटे पियानोवर नाचू लागली.

बऱ्याच वर्षांनंतर राजमहेंद्री सेंट्रल जेलच्या सुपरिंटेंडच्या बंगल्याच्या भिंतींना संगीताचे सूर ऐकायला मिळाले !

मेंदी लावून लावून मिशा, केसांना चिरतरुण ठेवू पाहणारा फाशीगेटचा वेंधळा जमादार मनाने सदा जवानच होता. तो वेंधळा होता हा एक भाग सोडला, तर खरे तर तो भारताचा ड्यूस नाही तर हिटलरच व्हायचा. युद्ध आणि प्रेम यांविषयीची आस्थाच त्याची जबर. पण एका ग्लाडसाहेबाने घात केला नि भारताचा तो ड्यूस राजमहेंद्री सेंट्रल जेलच्या फाशीगेटचा वेंधळा जमादार झाला !

खणखण...खणणखण्...

दूरवरून दंडाबेडीचा आवाज येऊ लागला. वेंधळा जमादार पाठीवर हात बांधून कुऱ्यात उभा राहिला. मेनगेटचा हवालदार दोन वॉर्डरांबरोबर नक्षलवाद्याला फाशीगेटमध्ये घेऊन आला नि 'जमादारसाहेबांना' सलाम ठोकून त्यांचे हाती कैदी सोपवून परत फिरला.

— 'क्यों प्यारे, मिले अपने गुलबदनसे ?'

वेंधळ्या जमादाराने थोडासा चवचाल प्रश्न केला. नक्षलवाद्याने थोडेसे दुर्लक्ष करीत होकारार्थी मान हालवली आणि आपल्या कोठडीत पाऊल टाकले. पण जमादाराने दाणकन् दरवाजा आपटून ताला ठोकला नाही. तो स्वतःच दरवाजात येऊन उभा ठाकला आणि स्वतःच्या मेंदाळ मिशीतला एक केस उपटीत विचारपूर्वक नक्षलवाद्याला म्हणाला,

'प्यारे, एक बात बताता हूँ... '

'सो तो कहानी पुरानी है...मगर नुस्खा नया...नुस्खा ये है की, मौतसे कभी शरमाओ मत और अपने गुलबदनसे कुछ छुपाओ मत!'

आपल्या स्टँडर्ड लष्करी हिंदीत वेंधळ्या जमादाराने 'सो तो पुरानी कहानी' सांगायला सुरुवात केली...

'मुझे कहनेमें बडा फिक्र है, तब मैं अपनी डिव्हिजन लेके अँबिसिनीयामें रोमेलसे लड रहा था. ऐसी धुलाई कियी मैंने उसकी, ऐसी पिटाई कियी मैंने उसकी...खैर.

अपने डिव्हिजनके जवानोंके साथ मैं अक्सर प्यारके और दोस्तीके तालूकात रखता था. मेरा बवर्जी थोडा शर्मिला था. एकदम जवान लौंडा था. बहरशल शादी हुई और उसे फ्रंटपे आना पडा. घरको हरदम हरवक्त चिठ्ठियाही भेजा करता था. मगर उसमे कमी ये थी की, खुदके बापको वह बहुत डरता था. खत अक्सर मेरे हाथों लिखा करता था. अनपढ था. गवाँर था. तो बात चली है उसके खतोंकी. मैंने उसे बारबार पूछा, 'भई, नयी नयी शादी हुई है तुम्हारी...बिबीको कुछ लिखोगे, भेजोगे तो सही.'

— 'बस, वो खामोश रहता था. जवाबही देता नहीं था. एक दिन रात मैं भिशीमें उसे खत लिखकर दे रहा था. तो अचानक दुष्मनका हमला हुआ. एक शेल आके बराबर भिशीमें गिरा और शेल के दो टुकडे सिधे उसके सिनेमें गये. मैं तो जान गया की, ये तो अभी वचेगा नहीं. फिरभी मैंने उसको कहा... 'डरो मत,' तो तुरंत उसने जवाब दिया... 'यहाँ कौन डरता है ? बाप होगा तो अपने घरका. तुम लिख दे... 'अंबू, मैं तुझसे बहोत प्यार करता हूँ. मैंने तुम्हारे लिये छुपके छुपाये कंगन बनवाये हैं. बनवारीके पास रखे हैं. मैं बहुत चाहता हूँ तुमको. तुम्हारे सिवा दुनिया विरान लगती है !'

'...और बिचारीकी दुनिया विरान हो गयी !'

सांगता सांगता रोमेलशी टक्कर देणाऱ्या जमादाराची छाती भरून आली, नाक चोंदले, हृदय गदगदले आणि तो चूप बसला.

मग बऱ्याच वेळाने, कैदी-कपड्याचा बनवलेला वारभर लांबीरुंदीचा रुमाल त्याने पाटलोणीच्या खिशातून काढला आणि घसा साफ करीत तो नक्षलवाद्याला म्हणाला,

'तो प्यारे, मैं कहना ये चाहता हूँ...मरनेके पहले अगर तुझे कुछ प्यारबिरके खत लिखनेके हैं तो लिख ले. जवान बिबी है तुम्हारी. बेचारीको उन्ही खतोंका जिंदगीमें आसरा होगा. तुम्हारे खत मैं बाहरसे पोस्ट करवाऊँगा. यहाँ सेन्सॉर नहीं होने दूंगा. आखिर पोलिटिकल आदमी हो तुम. सुना है, तुम लिडर लोग कहाँ स्वित्झरलँडकी बँकोमें पैसा छुपाकर रखते हो. तुमने भी कहाँ रखे होगे तो बीबीको लिख दो. बेचारीको उतनाही आसरा हो जाएगा. डरो मत. मैं तुम्हारे खत पढूंगा नहीं. किसीसे चुगली भी नहीं करूँगा... '

अखेर राष्ट्रभाषेचा आधार घेऊन सेकंडवॉरमध्ये झुंजलेल्या वेंधळ्या जमादाराने आपले मन मोकळे केले.

फाशी जाणाऱ्या त्या तरुण पोरासाठी याशिवाय आणखीन तो काय करू शकत होता ?

सकाळी धड तोंडही धुवायला न मिळाल्याने डोळ्यांची चिपडे चोळीत आणि पाटलोणीच्या गुंड्या लावीत कसाबसा वेंधळा जमादार टाइमावर ड्युटीवर येऊन हजर झाला...

'जमादारसाब,...' नक्षलवाद्याने त्याला हाक मारली.

आल्या आल्या ही काय कटकट असे वाटून जमादार खेकसला, 'क्या है बे ?'

'जमादारसाब, मैंने आपका कहेना मान लिया है !' नक्षलवाद्याने उत्तर दिले.

आपलेही कोणी ऐकते तर, या खुशीत वेंधळा जमादर नक्षलवाद्याच्या पुढ्यात जाऊन उभा राहिला नि म्हणाला,

'बोलो प्यारे !'

'ये लेटर हैं, मेरे बीबी के नाम'— नक्षलवाद्याने त्याच्या हातात पत्र ठेवीत सांगितले. जमादाराने हातातल्या हातात ते तोलले नि कोणी बघत नाही हे पाहून पटकन टोपीच्या आत टाकले नि तो म्हणाला,

'बहुत हल्का है. मैं समझा तुम बहुत बडा लंबा खत लिखोगे. इतने हल्के खत मे पूरा प्यार कैसा लिखा ?'—जमादाराने विचारले.

'उसका ऐसा है जमादारसाब, प्यारका कभी बोझ नही होता !' —नक्षलवाद्याने चोरट्या आवाजात हळूच उत्तर दिले.

वेंधळा जमादार ख्याँ ऽऽ ख्याँ ऽऽ करून हसला नि त्याने नक्षलवाद्याच्या पाठीवर थाप मारली. जमादाराचे हसणे थांबलेले पाहून बोलायला नक्षलवाद्याने तोंड उघडले तो पुन्हा वेंधळा जमादार हसू लागला. पुनःपुन्हा हसू लागला. बराच वेळ वेंधळा जमादार नक्षलवाद्याच्या विनोदावर नुसता हसतच राहिला. पोट धरधरून हसतच राहिला.

बऱ्याच वेळाने एकदाच त्याचे हसणे थांबले नि नक्षलवाद्याने बोलायला सुरुवात केली.

'देखिये जमादारसाब, ये तो हुआ लव लेटर. आपके हाथ सौंप दिया. अभी मुझे मेरी वसियत लिखनेकी है.'

'वसियत याने क्या बच्चे ?'—जमादाराने अजागळ प्रश्न केला.

'वसियत याने, मैं मेरी जायदाद लिख कर देना चाहता हूँ !' नक्षलवाद्याने उत्तर दिले.

'मालदार हो ?'—जमादाराचा आणखी एक मूर्ख प्रश्न.

'बहुत ! ये इतना माल है अपने पास.'—स्वतःकडे बोट दाखवीत नक्षलवाद्याने उत्तर दिले.

'तो किसी वकील को बुलवाना पडेगा.'—जमादार चिंतेत पडला.

'जी नही, सिर्फ बडे साबको बुलवाना पडेगा.'—नक्षलवाद्याने उत्तर दिले.

'तो रिपोट करने पडेगी...' जमादार स्वतःशीच पुटपुटला नि मेनगेटकडे चालू लागला.

सीनियर जेलरच्या लेखी वेंधळा जमादार म्हणजे नुस्ता एक न्यूसन्स. होता त्याला समोर पाहूनच सीनियर साहेबाची शिर तडकली.

'क्या है ?'– सीनियरने त्रासिकपणे प्रश्न केला.

'साब, वो नक्षलवादी वसियत लिखके देना मांगता है !'–जमादारने उत्तर दिले.

सीनियर जेलरने वेंधळ्या जमादाराला आपादमस्तक न्याहाळले नि पुनःपुन्हा खोचून खोचून विचारले; पण या वेळी आपण निश्चित योग्य ते नि बरोबर बोलतो आहे या ठामपणे वेंधळ्या जमादाराने पुनःपुन्हा ठासून सांगितले.

'बडे साबके सामने नक्षलवादी जायदाद लिखना के देना मांगता है !'

सीनियरला ऐकून मोठे नवल वाटले. ज्याच्या नावे फक्त एक रुपया अठ्ठावीस पैसे इतकी किरकोळ रक्कम जमा होती नि ज्याला सेशनमध्ये सरकारी वकिलावर अवलंबून राहावे लागले, ज्याची बायको अनवाणी चालत आली तो नक्षलवादी मृत्युपत्र करू म्हणत होता. सीनियरने आश्चर्याने खांदे उडवले नि डोक्यावर कॅप चढवून तो ग्लाडसाहेबाच्या ऑफिसात दाखल झाला.

'सर...'

सीनियरची चाहूल लागून ग्लाडसाहेबाने डोके वर उचलले.

'सर, कैदी नंबर आठसो बयालिस. वीरभूषण पट्नाईक फाशी जाण्यापूर्वी मृत्युपत्र लिहून देऊ मागतो !'

–सीनियरने साहेबाला इन्फॉर्म केले.

'जा...त्या दळभद्र्याला विचारा, म्हणावं तुला विलची काय गरज ? तुला टांगल्यावर तुझा थॉलिपॉट भट्टीखान्यातच जमा होणार आहे. घरी नाही पाठवता येणार म्हणावं.'

–ग्लाडसाहेबाने तिरसटत तुच्छतेने उत्तर दिले.

सीनियर सॅल्यूट ठोकून माघारी वळला आणि नक्षलवाद्याकडे अधिक चौकशी करायला फाशीगेटकडे चालू लागला....

सीनियर निघून गेला नि ग्लाडसाहेबाचे मन त्याचे त्यालाच खाऊ लागले. साहेबाला नक्षलवाद्याच्या बायकोच्या पायाच्या भेगा आठवल्या आणि मग स्वतःचे वाईट दिवस आठवले. आपण नक्षलवाद्याच्या दारिद्र्यावर बोट ठेवायला नको होते असे साहेबाला मनोमन वाटले; पण अविचारीपणे साहेबाच्या तोंडून शब्द निघून गेले होते. आता तेच शब्द वाहणे साहेबाला भाग होते. आपल्याच शब्दांचे ते ओझे साहेबाला फार जड वाटू लागले. साहेब मनोमन अस्वस्थ झाला. त्याचे कामावरचे लक्षच उडाले.

तासभर लोटला नि सीनियर माघारी परतला. एक चिंतातूर सॅल्यूट ठोकून साहेबाला म्हणाला,

'सर, नक्षलवादी प्रेसिडेंटला उद्देशून मृत्युपत्र लिहीन म्हणतो !'

–'क्काय ?'–खुर्चीवरून ताडकन उठीत ग्लाडसाहेबाने विचारले.

'येस सर.' सीनियरने पुन्हा माहिती दिली. 'नक्षलवादी म्हणतोय त्याला फासावर चढवून मारू नये. त्याच्या शरीराचे एकेक अवयव काढून घेऊन गोरगरीब रुग्णांना गरजेप्रमाणे द्यावेत. त्यासाठी राष्ट्रपतीला उद्देशून त्याने विलचा मसुदा करून ठेवला आहे !'

ग्लाडसाहेब स्तंभित झाला. मग बराच वेळ उलटसुलट विचार करून त्याने हुकूम केला, 'ऑफिस टाइमिंग संपताच टायपिस्टला घेऊन फाशी गेटमध्ये चला. माझ्या समोरच डिक्टेट कर म्हणावं विल. साला काही उलटेसुलटे लिहील तर चामडी सोलून काढीन त्याची.'

सीनियरने मान वाकवून हुकमाचे जू उचलले नि तो चालू पडला.

ऑफिस टाइमिंग संपले. बत्तीखान्यात चार–सहा डझन कंदील पुसून स्वच्छ होऊन पेटू लागले. यार्डायार्डांत बंदीची धावपळ चालू झाली नि मेनगेटमधून दोन वॉर्डर डोक्यावर टेबल, खुर्ची, स्टूल टाकून फाशीगेटकडे चालू लागले. एका हवालदाराने खांद्यावर टाइपरायटर टाकीत त्यांची पाठ धरली.

बंदीचे टोल पडले नि फाशीगेटचा जेलर, सीनियर जेलर, दोन हवालदार, चार वॉर्डर, एक टायपिस्ट अशी फलटण घेऊन ग्लाडसाहेब फाशीगेटकडे चालू लागला. साहेबाने फाशीगेटमध्ये पाऊल टाकले नि वेंधळा जमादार त्याची काहीही चुकी नसताना घाबरून गेला. कधी न घडणारा कसला तरी अघोर प्रसंग फाशीगेटमध्ये घडतोय असे त्याला वाटू लागले.

साहेब नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर येऊन उभा राहताच त्याने गडबडीने ताला खोलला. फाशीगेटच्या जेलरने हुकूम केला नि वॉर्डरांनी टेबल, स्टूल, खुर्ची कोठडीत नेऊन ठेवली. टायपिस्टने चार लेजरपेपर टाइपरायटरमध्ये घातले नि बोटे रेडी करीत स्टुलावर बैठक मारली.

'हॅव ए सीट मि. ग्लाड,' नक्षलवाद्याने साहेबाला खुर्चीत बसण्याची विनंती केली. पण साहेबाने मानेनेच नकार दिला नि तो दरवाजासमोरच उभा राहिला......

'कॅन आय डिक्टेट नाऊ ?'–नक्षलवाद्याने प्रश्न केला.

'याऽ !'–साहेब तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

मग नक्षलवादी गुडघे जवळ घेऊन भिंतीला टेकून बसला आणि छताच्या पिवळ्या प्रकाश प्रकाशणाऱ्या दिव्याकडे नजर लावून सांगू लागला......

टायपिस्टची बोटे चालू लागली......

'भारताच्या आजच्या भांडवलदारी सरकाराच्या नामधारी राष्ट्रप्रमुखास, राष्ट्रपतीस देण्यासाठी,

महोदय,

राजमहेंद्री मध्यवर्ती कारागृहात तुमच्या शासनाने दिलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेची वाट पाहात असलेला मी कैदी नंबर आठसो-



बयालिस वीरभूषण पटनाईक पुन्हा एकवार अभिमानाने जाहीर करतो की,

मी कम्युनिस्ट आहे. मार्क्सवाद, लेनिनवाद आणि चेअरमन माओच्या शिकवणुकीवर माझी दृढ निष्ठा आहे आणि माझ्या जनतेची, तुमच्या अन्याय्य आणि शोषित शासनाच्या जुवाखालून, केवळ सशस्त्र क्रांती करून, तुमचे सरकार उलथून पाडण्यानेच मुक्तता होईल याची मला खात्री आहे आणि याचकरिता श्रीकाक्लमच्या आदिवासी विभागात मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी जो क्रांतिकारक संघर्षाचा अयशस्वी प्रयत्न केला, त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

तुमच्या शस्त्रसज्ज सेनादलांनी आमच्या लाल क्रांतिकारकांच्या छोट्या गनिमी तुकड्यांचा केलेला पराजय हा नव्या इतिहासाला जन्म घालीत आहे. झालेल्या पराभवाने मी किंवा माझे कॉम्रेडस् यांचे नीतिधैर्य बिलकुल खचलेले नाही. कारण माणसांचा इतिहास केवळ उद्दाम विजयांनी नव्हे, तर समर्पित पराजयानेही सुरू झाला आहे...घडला आहे, हे आम्हास ठाऊक आहे.

या क्रांतीच्या दशकाच्या अखेर माझ्या देशातील तुमची शासनसत्ता उलथून पडून कामगारवर्गाच्या अधिनायकत्वाखाली कष्टकरी जनतेची नवी लोकशाही प्रस्थापित होईल याचा मला दृढ विश्वास आहे आणि म्हणूनच जनतेच्या विजयी लढाऊ विभागाचा एक घटक असलेला मी, तुमच्याकडे प्राणांची याचना करीत नाही, करणार नाही. तसे करणे म्हणजे कष्टकरी जनतेच्या लढाऊ सामर्थ्याचा अपमान आणि तुमच्या शोषित, जुलमी शासनसत्तेचा सन्मान केल्यासारखा होईल. तरी पण, तुमच्याच न्यायालयाने दिलेली शिक्षाच तेवढी तुम्ही अंमलात आणावी...त्यापेक्षा अधिक म्हणजे माझी संपत्ती तुम्ही हिरावून घेऊ नये अशी मी तुमच्याकडे मागणी करतो...'

जेलचा टायपिस्ट टकाटका बोलला मजकूर टाइप करीत होता. आपण काही वेगळा मजकूर टाइप करीत आहोत याची त्याला जाणीवही नव्हती. पण ग्लाडसाहेब मात्र कोठडीत गेला आणि खुर्चीत रेलून बसला. नक्षलवाद्याचे ते मृत्युपत्र त्याला सारखे खुणावत होते. हाका मारीत होते. बघ, बघ, क्रांतिकारक असा असतो, असा असतो.

फाशीगेटच्या कोठडीतील मंद पिवळ्या प्रकाशात नक्षलवादी मात्र स्थितप्रज्ञपणे आपले मृत्युपत्र डिक्टेट करीत होता.

'मी कम्युनिस्ट आहे आणि कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाप्रमाणे फक्त श्रमातूनच संपत्ती निर्माण होते यावर माझा विश्वास आहे आणि म्हणूनच, श्रम करण्याचे साधन जे शरीर...तेही माणसाच्या व्यक्तिगत संपत्तीचा भाग आहे असे मी मानतो आणि म्हणूनच शरीरसंपदा ही माणसाची संपत्ती आहे व तिचा वारसा आपल्या वारसदारांना देणे हा तुमच्या कायद्याप्रमाणेही प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे याकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो आणि तेवढाच अधिकार तुम्ही मला द्यावा अशी मी मागणी करतो–'

टायपिस्ट निर्विकारपणे टकाटका टायपिंग करीत होता. पण ग्लाडसाहेब मात्र नक्षलवाद्याच्या त्या जगावेगळ्या मृत्युपत्रात हरवून गेला होता.

'तुमच्या शासनसत्तेला केवळ माझे प्राण हवे आहेत. माझ्या जीवनाचे अस्तित्व तुम्हाला पुसायचे आहे. माझी संपत्ती हिरावून घ्यायची नाहीय. मग मला फासावर टांगून आणि वर पुन्हा पोस्टमार्टेम करून माझ्या शरीराची नासाडी तुमचे सरकार का व कशासाठी करते? अशा रीतीने माझ्या शरीराचा नाश झाल्यास मी माझी शरीरसंपदा कोणाच्याही उपयोगासाठी देऊ करू शकत नाही आणि मी तर या समाजाचे, माझ्या कष्टकरी देशबांधवांचे काही देणे लागतो व त्या देण्यातून मुक्त होण्यासाठी माझ्या शरीराचा प्रत्येक भाग त्यांच्या कामी यावा अशी इच्छा धरतो आणि म्हणून तुमच्या शासनाला मी विनंती करतो की...'

ग्लाडसाहेबाची वैरभावना मृत्युपत्रातील प्रत्येक अक्षरागणिक नष्ट होऊ लागली होती. नक्षलवादी सांगतच होता...

'मला फाशी देऊन व नंतर माझ्या मृतदेहाचे पोस्टमार्टेम करून माझे शरीर निकामी करू नये. मी जिवंत असतानाच वैद्यकीय सल्लागारांच्या सल्ल्याप्रमाणे माझ्या शरीरातून जास्तीत जास्त रक्त काढून घ्यावे, नंतर डोळे काढून घ्यावेत व मग असा प्रत्येक अवयव काढून घ्यावा, जो माझ्या जिवंत शरीरातून काढला असतानाच कामी येऊ शकेल. त्यानंतर आवश्यक व शक्य ते सर्व अवयव, आतडी, फुप्फुसे, जठर, हृदय आदी भाग काढून घेतले जावेत आणि या प्रक्रियेत जेव्हा माझा प्राण जाईल तेव्हा मी मेलो असे जाहीर करावे.'

ग्लाडसाहेबाने खिशातून व्हिस्कीचा पाईंट काढला व स्वतःच्या नकळत नक्षलवाद्याच्या समोर धरला. नक्षलवाद्याने मानेनेच नकार दिला तेव्हा साहेबाने व्हिस्की ओठांना लावली आणि नक्षलवाद्याच्या मृत्युपत्राकडे पुन्हा लक्ष एकाग्र केले.

'माणसांच्या कामी येऊ शकतील असे माझ्या शरीराचे सर्व भाग काढून झाल्यावर माझ्या उरलेल्या निकामी शरीराचा कोणाला काही त्रास होणार नाही अशा कोणत्याही मार्गाने विल्हेवाट लावावी. पण त्यावर कसलाही धार्मिक विधी अथवा उपचार होऊ नयेत.

'माझ्या शरीरातून काढून घेतलेले अवयव जिथे ते माणसांच्या उपयोगात आणले जाऊ शकतील अशा या देशातील कोणत्याही प्रांतातील–शहरातील हॉस्पिटलात पाठवले जावेत व ते कोणाही गरजू व्यक्तीला विनामूल्य देण्यात यावेत. परंतु जर माझ्या शरीराच्या एखाद्याच भागाची अनेकांना किंवा एकापेक्षा अधिकांना एकाच वेळी गरज भासली तर खालील अग्रक्रमाच्या यादीप्रमाणे वर्गवारी करून क्रम लावावा...

'माझ्या शरीरावर सर्वांत प्रथम अधिकार भूमिहीन शेतमजूर, आदिवासी किंवा अकुशल कामगाराचा असेल. त्यानंतर कुशल कामगार किंवा छोटा शेतकरी किंवा स्वतंत्र कारागीर किंवा छोटे उद्योगधंदेवाले यांचा असेल. वरीलपैकी दोघांनाही माझ्या शरीराच्या भागाची गरज न लागल्यास प्राध्यापक, डॉक्टर, कलावंत किंवा कोणीही मध्यमवर्गीय बुद्धिजीवी यांच्या उपयोगात माझे अवयव आणावेत. त्यांनाही गरज नसल्यास या देशातील कोणाही गरीब माणसांच्या कामी माझे अवयव द्यावेत. मात्र कोणत्याही कारणाखातर बडे भांडवलदार, जमीनदार, नोकरशहा किंवा सत्तापदस्थ मंत्री यांच्यासाठी माझ्या शरीराचा कोणताही अवयव उपयोगात आणला जाऊ नये.'

' तुमचे सरकार माझ्या या इच्छेचा आणि मागणीचा गांभीर्याने विचार करेल आणि मला फासावर टांगून व पोस्टमार्टेम करून माझ्या शरीरसंपत्तीचा नाश न करवा तो मला माझ्या देशबांधवांच्या उपयोगासाठी आणू देईल याची मी अपेक्षा करतो.

' कृपया, राष्ट्रपतिमहोदयांनी स्वत: जातीने लक्ष घालून योग्य ती सर्व कारवाई करावी... आवश्यक असल्यास कायद्यात दुरुस्ती करावी. परंतु माझा रास्त अधिकार मला बजावू द्यावा अशी मी मागणी करतो. माझ्या या मागणीवरील निर्णयाची वाट पाहत आहे...'

टायपिस्ट थांबला तसा सीनियर जेलर पुढे आला. त्याने सर्व कागद नीट जुळवले. टाचण्या लावल्या आणि चारी प्रती नक्षलवाद्याच्या हातात दिल्या. नक्षलवाद्याने काळजीपूर्वक सर्व मजकूर वाचला नि सही केली. मग सीनियर जेलरने कागद ग्लाडसाहेबासमोर ठेवले. ग्लाडसाहेबाने शेरा मारला...

' कैद्याने माझ्या समक्ष कोणाच्याही दडपणाशिवाय दिहून दिले.' आणि लफ्फेबाज सही ठोकून साहेब जायला उठला. फाशीगेटचा वेंधळा जमादार तेवढ्यात पुढे धावला आणि त्याने खुर्ची काढून नेली. जाता जाता एकवार कोठडीच्या दरवाजाशी थबकून ग्लाडसाहेबाने नक्षलवाद्याला आपादमस्तक न्याहाळले आणि हातातला कॅप्सटनचा टीन नक्षलवाद्यापुढे केला.

' डू यू लाइक इट ?' ग्लाडसाहेबाने विचारले.

' या, ' नक्षलवादी पुटपुटला आणि त्याने एक सिगरेट काढली. तेव्हा अख्खा टीनच नक्षलवाद्याच्या हाती कोंबीत ग्लाडसाहेब पुटपुटला, ' कीप इट वुइथ यू. '

आणि ग्लाडसाहेब फाशीगेटच्या बाहेर पडला. मग थेट जेलच्या बाहेर. मेनगेटसमोरील वडा-पिंपळाची झाडे सळसळत होती. पहिला पाऊस नुकताच पडून गेला होता. मातीचा मंद सुवास दरवळला होता. दिवेलागण झाली होती.

त्या कातरवेळी ग्लाडसाहेबाचे मन उदास झाले, पण दु:खी नाही. आणि खालच्या मानेने ग्लाडसाहेब बंगल्याकडे चालू लागला.

सकाळी चहाचा पहिला घोट घेताच, नक्षलवाद्याला चवीतला बदल एकदम जाणवला. त्याने चहा नीट न्हाहाळला. आज सर्व काही पुरेसे असलेला घरच्यासारखा चांगला चहा कसा काय आला याचा तो विचारच करीत होता. तोच भट्टीखान्याचा वार्डर आला. त्याने नक्षलवाद्याच्या कोठडीतल्या महिनोन् महिने न धुतलेल्या, कुबट वास मारणाऱ्या, उवा पडलेल्या रजया, कांबळी काढून घेऊन एकदम नव्या परीटघडीच्या रजया, कांबळ्या नक्षलवाद्याला दिल्या. त्याच्या अंगावरले तूस निघालेले, जीर्ण कैदी कपडे मागून घेऊन नव्या कोऱ्या कैदी कपड्याचा सेट त्याच्या हातात दिला नि काही न बोलता तो चालू पडला.

भट्टीखान्याचा वॉर्डर जातोय न जातोय तोच जेल हॉस्पिटलचा डॉक्टर आला. त्याने नक्षलवाद्याला तपासले, त्याच्या नडगीवरल्या जखमांना पट्टी बांधली आणि व्हिटॅमिनच्या गोळ्या देऊन तो निघून गेला.

थोड्याच वेळाने लोहारखान्याचा वार्डर लोहाराला घेऊन आला. त्याने नक्षलवाद्याच्या गंजलेल्या जड दंडाबेडी काढून टाकून तेथे न गंजलेल्या हलक्या व लहान दंडाबेड्या ठोकल्या व सलाम मारून निघून गेला.

आज हे काय चाललेय ते फाशीगेटच्या वेंधळ्या जमादाराला धड उमगलेच नव्हते तोच भंगी आला. त्याने फिनेल मारून नक्षलवाद्याची कोठडी धुऊनपुसून लख्ख केली ! आणि नक्षलवाद्याकडून सिगरेटची बक्षिसी चोरून घेत खटारा, बादली उचलून नेली.

बऱ्याच वेळाने फाशीगेटच्या वेंधळ्या जमादाराच्या डोक्यात काही तरी प्रकाश पडला. तो नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर आला आणि अजागळासारखा त्याने नक्षलवाद्याला प्रश्न केला...

' क्यो रे ? तेरे बीबीने ग्लाडसाबको कितना पैसा दिया ?'

जमादाराच्या मूर्खपणाला नक्षलवादी नुसता हसला आणि त्याने खुशीने आळस दिला.

सीनियर जेलरने मेनगेटमध्ये पाऊल टाकले आणि तो चरकलाच. एकवार त्याने घड्याळाकडे नजर टाकली. तसा दहा मिनिटे तो आधीच आला होता....तरी पण, मेनगेटमध्ये एक दबलेली शिस्तशीर, आखीव शांतता त्याने पाहिली.

ग्लाडसाहेबाच्या खोलीत पंखा गरगरा फिरत होता.

मेनगेटचा जमादार पुढे आला आणि सीनियरसाहेबाच्या कानात कुजबुजला.

' बडा साहेब पहाटेच येऊन बसला आहे !'

सीनियर जेलरने बेल्ट ठाकठीक केला आणि आल्याची वर्दी द्यायला ग्लाडसाहेबाच्या ऑफिसात पाऊल टाकले. ग्लाडसाहेब त्याचीच वाट पाहत होता. सीनियर जेलरला पाहताच हातातले कागद त्याने त्याच्या पुढ्यात टाकले. सीनियर जेलरने एकदा कागदावरून नजर टाकली आणि प्रश्नार्थक चेहऱ्याने तो साहेबाकडे पाहू लागला. ग्लाडसाहेबाने नक्षलवाद्यासाठी एक मर्सिपिटिशन टाइप केला होता...आणि त्याला स्वत:चे लांबलचक कव्हरिंग लेटर जोडले होते. त्या लेटरमध्ये नक्षलवाद्याचा स्वभाव, विचार करण्याची पद्धत, तुरुंगातील वर्तणूक याविषयी बरेच काही लिहिले होते आणि नक्षलवाद्याची फाशी रद्द व्हावी अशी तोंड भरून शिफारस केली होती.

साहेबांचे ते लेटर पाहून सीनियर जेलरला थोडासा धक्काच बसला. अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये कोणाही कैद्याविषयी कधीही चार ओळी देखील चांगल्या ग्लाडसाहेबाने लिहिल्या नव्हत्या. तसा रिवाजच होता त्याचा तो; पण हा नक्षलवादी...

' यू सी, ' ग्लाडसाहेब सीनियर जेलरला म्हणाला, ' पोरगा थोडा वाह्यात आहे; पण सीन्सियर आहे. मर्सिपिटिशन केला तर सुटेल कदाचित; पण वाकायला तयार नाही. तरुण रक्त आहे...हकनाक वाया जायला नको. यू ट्राय टू कन्व्हिन्स हिम. दोनच दिवस बाकी आहेत. काय तक्रार-बिक्रार असेल त्याची तर दखल घ्या. गिव्ह हिम सम फॅसिलिटीज आणि त्याने सही केली की तातडीने जाऊ दे. '

साहेबाच्या इतक्या मऊ बोलण्याने सीनियर जेलरची मतीच गुंग झाली. साहेबाच्या ऑर्डरला मान हलवण्याचे भानही त्याला उरले नाही; पण सीनियर जेलरच्या प्रतिसादाची वाटही न पाहता ग्लाडसाहेब उठला आणि टिफिनला गेला,

अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये प्रथमच कोणाच्या पाठीवर दंडा न मोडता ग्लाडसाहेबाने टिफिनला हात लावला.

पहाटेच आलेला बडा साहेब दिवेलागण झाली तरी बंगल्यावर जात नाहीय हे पाहून मेनगेटमध्ये थोडी चुळबूळ सुरू झाली. दिवसभर साहेब अबोल होता. मेनगेटमधल्या ऑफिसातून जेलच्या आवारात त्याने पाऊलही टाकले नव्हते.

सहाचे टोल पडले आणि कोरट येऊ लागते. दोन जाळीदार पोलीस व्हॅन मेनगेटसमोर येऊन उभ्या राहिल्या. व्हॅनमधल्या खावखुजावच्या कलकलाटाने आणि मेनगेटमधल्या धांदलीने मेनगेट कसे एकदम भरल्या घरासारखे दिसू लागले...

दोन फाटक्या अंगाचे चॅप्टर गळ्याचे हिरवे रुमाल उडवीत कोरसमध्ये गाऊ लागले...

'ये दो दीवाने दिलके, चले है देखो मिलके, चले है ऽ चले है ऽ चले है ससुराल...'

मेनगेटमधल्या जमादारांनाही क्षणभर त्यांच्या विनोदाने हसू फुटले; पण हसू मध्येच तुटले. बडा साहेब अजून ऑफिसातच आहे या जाणिवेने ते हादरले. मग एकदम ते त्या दोघांवर खेकसले आणि कैद्यांना रांगेत बसवून गिनती घेऊ लागले...

पण त्या दोघा चॅप्टरांच्या गाण्याने ग्लाडसाहेबांची तंद्री भंग पावली आणि चिडून डरकाळत साहेब बाहेर आला.

'कोणाच्या घशाला खाज आलीय एवढी ?' साहेब ओरडला. जमादारांनी दोघा चॅप्टरांकडे बोटं दाखवली.

ग्लाडसाहेब तडातडा त्यांच्यासमोर गेला आणि आपल्या लठ्ठ बुटाचे टोक त्यातल्या एकाच्या बरगडीत लायेसरशी मारता झाला. तो चॅप्टर एकदम कळवळला. मग दोघे उद्दाम, बेफिकीर लाचारीने उभे राहिले...

'काय रे फोदरीच्यांनो, इथं कशाला झक मारायला आलात ? कोणाचं घर फोडलंत ? खिसा कापलात ?'

पोलीस हवालदार अदबीने पुढे सरसावला आणि त्याने माहिती दिली.

'दोघं चॅप्टरमध्ये आणलेत साहेब.'

मग साहेब अधिकच खवळला. त्याने दुसऱ्याच्याही बरगडीत लाथ हाणली आणि गरजला.

'भांचोद, जेल म्हणजे काय बापाचं घर समजता. काही कुठे गू न खाता जेलची हग्यारी खराब करायला येता ? जेलमध्ये यायचं तर सुरा चालवून, ताळे तोडून तरी येत चला. तेवढीही मस्ती नाही भडव्यो तुमच्यात. गांडू साले !'

मग एक चॅप्टर थरथरत अजीजीने सांगू लागला...'क्या करे साब, बारिश के दिन आये है. रहने को जगा नही. बूट पॉलिश का धंदा भी चलता नही. यहाँ आने के सिवा चाराही क्या है ?'

साहेब क्षणभर निरुत्तर झाला. मग आपली बाजू पडती खायला नको म्हणून खाडकन एकाच्या तोंडावर त्याने वळ उठवले आणि साहेब मेनगेटमधून बाहेर पडला.

तेवढ्यात जाळीदार व्हॅनच्या पुढल्या कप्प्यात सावळीशी, रेखीव आणि भरल्या अंगाची एक चुणचुणीत पोरगी बसलेली साहेबाला दिसली. साहेब पुढे गेला आणि खाडकन त्याने दरवाजा उघडला. पोरगी खरेच चुणचुणीत होती. क्षणभर साहेबाला वाटले, 'घ्यावी रांडेला अंगाखाली,' आणि त्याने गपकन तिचा हात पकडला. भयभीत नजरेने ती साहेबाकडे पाहू लागली.

'काय ग रांडे, कुठं शेण खाल्लंस ?' साहेबाने विचारले.

पोलीस हवालदाराने लगेच पुढे येऊन माहिती पुरवली...

'ही रांड कसला गुन्हा करते साहेब ! बाळंतपणासाठी तुरुंगात आलीय !'

विजेचा झटका बसल्यासारखा साहेबाने तिचा हात सोडला. मग तिला आपादमस्तक न्याहाळले. फुलू घातलेल्या मोगऱ्याच्या टपोऱ्या कळीप्रमाणे तिचे पोट तरारलेले होते.

साहेबाला एकदम आपल्या पोरीची आठवण आली. जीनचेही दिवस आता भरत आले होते. बाळंतपणासाठी तीही इंडियाला येणार होती. मग साहेबाने त्या पोरीचा ढळलेला पदर हातातल्या स्टिकने तिच्या खांद्यावर सरकवला आणि मेनगेटच्या जमादाराला सूचना दिली...'पोरीची काळजी घ्या.' आणि साहेब बंगल्याकडे चालू लागला.

तटाआड कोणी कैदी भक्तिभावाने अभंग आळवीत होता...'हो रामरस ऐसा होय मोरे भाई.'

चालता चालता साहेब क्षणभर थबकला. आपले काळीज मेणाहून मऊ झाल्यासारखे त्याला वाटले. मग साहेब घाबरला. मऊ मुलायम माणसाचे मन नको होते त्याला. दुःखाने...ताटातुटीने हालते ते. तडफडते ते. फार वेदना होतात.

साहेबाने खिशातून व्हिस्कीचा पाईंट काढला नि तोंडाला लावला!

...या नक्षलवाद्यापायी साहेब नसत्या फंदात पडला आणि त्याने चार ग्रंथ वाचले. समजले त्याला त्यातले काहीच नाही; पण जाणवू मात्र लागले. अगदी प्रखरतेने.

पावसाळ्यात डोक्यावर छप्पर नसलेले, अन्नाला मोताद होणारे चॅप्टर, कोरटी तुरुंगाच्या आश्रयाला येतात हे त्याला नवे नव्हते. आणि बाळंतपणासाठी तुरुंगात यायचा दळिद्री आणि लाचार बायांचा रिवाजच होता. खरे तर अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये या साऱ्या गोष्टी ग्लाडसाहेबाच्या अंगवळणी पडल्या होत्या; पण ते चार ग्रंथ आणि नक्षलवाद्याच्या केसपेपरमधील लेख, पत्रे, जबान्या वाचून त्यात काही भीषण अन्याय आहे, अत्याचार आहे हे साहेबाला समजले होते.

तरी पण हा गधडा क्रांती कशी करणार ?

ग्लाडसाहेबाला मोठा प्रश्नच पडला होता.

चोरापेक्षा या चॅप्टर चिलटांचा राग साहेबाला अधिक होता. चोर साला जगाशी लढतो तरी. जगायचा प्रयत्न करतो. ,पण या लाचार अवलादी ?

'कुत्रेत साले कुत्रे !' साहेब स्वतःशीच पुटपुटला.

तेवढ्यात त्याच्या डोक्यात विचार चमकला......

'जेनी जर अशीच रस्त्यावर जन्माला आली असती; मोलमजुरीने पोट जाळत असती तर ?...तर तीही मग अशीच बाळंतपणासाठी तुरुंगात आली असती. कुठला तरी गुन्हा मुद्दाम करून, नाही तर पोलीसला पैसे चारून.'

नुसत्या विचारानेच साहेब मुळापासून हादरला. असा अभद्र विचार

डोक्यात राहणेही ग्लाडसाहेबाला असह्य झाले नि त्याने व्हिस्कीचा पाईंट पुन्हा तोंडाला लावला......

बंगल्यातला मंद प्रकाश दिसू लागला तशी साहेबाची गती वाढली. काळयाशार डांबरी रस्त्यावर पावले खाड खाड वाजू लागली... रस्ता निर्मनुष्य झाला. आसपासच्या झाडांवरील पाखरांची किलबिलही शांत झाली...

'कॉवर्डस्...कॉवर्डस् आहेत साले कॉवर्डस्!'

नेटिव्हांना उद्देशून साहेब पुटपुटला. हे भडवे गुलामच राहण्याच्या लायकीचे. अन्यायाचा प्रतिकार करायची हिंमत नाही. गटस् नाहीत.

विचार करता करता एकाएकी साहेबाची कंबर खचली. साहेब एकदम लुळापांगळा झाला. त्याला माराची याद आली...

माराला गेस्टापो फरफटत गॅस चेंबरकडे नेत होते नि उंचापुरा जवान तगडा ग्लाड त्यांच्या पुढे लाचारीने, अजीजीने भिकाऱ्यासारखा तिच्या प्राणांची भीक मागत होता. माराने एक मुस्कटात मारून साहेबाला विचारले '...पुरुषासारखा पुरुष असून या अत्याचाऱ्यांच्या पायाशी लोळण घेतोस?'

–पण ग्लाड लाचार होता. अगतिक होता. दुबळा होता. तेव्हा आणि आताही, अंगावर अधिकाराची वर्दी असूनही साहेबाने व्हिस्कीचा पुरा पाईंट घशात ओतला. तरी पण आपण षंढ आहोत; ही भावना त्याच्या मनातून जाईना...

साहेबाची खाड खाड वाजणारी पावले खुरडू लागली. गेटवरल्या सेंट्रीने सलाम ठोकला. साहेब आपल्या बंगल्यात आला. साहेबाला पाहताच त्याचा लाडका बुलडॉग धावत आला आणि साहेबाच्या अंगावर उड्या मारू लागला. मग साहेबाने स्वतःची सारी दुर्बलता चंपवर लादली. हातातल्या स्टिकने बेभान होऊन विनाकारण तो चंपला बडवत सुटला. बिचारा चंप केकाटत केकाटत आणि तरीही लाचारीने शेपटी हलवत साहेबाच्या पायात शिरू लागला. साहेबाला वाटले, चंपचा ग्लाड झालाय...गेस्टापोंच्या समोरच्या सारखा. मग साहेबाने चंपचा पट्टा धरून त्याला फरफटत, ओढत बंगल्यात नेले आणि दिवाणखान्यात एकदम त्याला गळयाला लावून गळा काढला...

'चंप, माणसांचे कुत्रे झालेत रे कुत्रे. अन्नासाठी, पोटासाठी माणसे कुत्रे झाले. जगण्यासाठी माणसे कुत्रे झाले. लाचार झाले. माणसांचे कुत्रे झाले रे चंप. माणसांचे कुत्रे झाले!'

गेटवरल्या सेंट्रीला वाटले, साहेबाला आज फार चढलीय!

ग्लाडसाहेबाच्या तालमीत वाढलेला जेलर दहाच्या म्हणजे नेमक्या दहाच्याच टोलला मेनगेटमध्ये पाऊल टाकणार होता. थोडा आधीच; पण उशिरा मात्र निश्चितच नाही. तरी पण ग्लाडसाहेब अस्वस्थ होता आणि बसल्या जागीच चुळबुळत होता.

दोन दिवस उलटले होते, तरी पण नक्षलवाद्याचा मर्सिपिटिशन आला नव्हता आणि आता केवळ उद्याचाच काय तो शेवटचा दिवस बाकी होता. साहेब पुन्हा अस्वस्थ झाला. 'हे वाह्यात पोरगं हकनाक फासावर चढणार,' असे त्याला वाटू लागले. तरी पण आपणाकडून आपण प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे असेही त्याचे अंतर्मन त्याला सांगू लागले. नव्हते हे मात्र खरे!

मेनगेटचे हवालदार अटेन्शनमध्ये उभे राहिले. दरवाजा करकरला आणि दहाचे टोल अंगावर घेत सीनियरसाहेब ड्यूटीवर हजर झाला...

'त्या नक्षलवाद्याच्या मर्सिपिटिशनचं-काय झालं?'

सीनियर जेलरने सॅल्यूट ठोकायच्या आधीच ग्लाडसाहेबाने प्रश्न केला. सीनियर जेलर थोडा वरमला आणि बचावाच्या सुरात बोलला...

'सर, आय ट्रायड माय लेव्हल बेस्ट. बट ही इज टू मच फॅनेटिकल. ही रिफ्यूज्ड टू साइन मर्सिपिटिशन.'

ग्लाडसाहेबाच्या कपाळाच्या तिन्ही शिरा ताडकन् उभ्या राहिल्या. साहेब संतापला, भडकला आणि एकदम कडाडला...

'फुकट फुकट गेली तुमची बावीस वर्षांची सर्व्हिस. कैद्याला गोडीत कसं घ्यावं, विश्वासात कसं घ्यावं याची थोडी देखील अक्कल तुम्हाला नाही. आणा तो मर्सिपिटिशन इकडे. मलाच सही आणावी लागेल त्याची.'

सीनियरने पुढे केलेले कागद ताडकन् ओढून घेत साहेब जागचा उभा राहिला. साहेब चालू लागताच चार वॉर्डर आणि चार शिपाई साहेबाच्या पुढे–मागे चालू लागले. आणि कैद्याला गोडीत, विश्वासात कसे घ्यावयाचे याचे ग्लाडसाहेबाकडून पाठ घ्यायला फाशीगेटच्या जेलरने व सीनियरने साहेबाची पाठ धरली. ग्लाडसाहेब फाशीगेटकडे चालू लागला.

ग्लाडसाहेबाला पाहताच तुरुंगातली वडापिंपळाची झाडे चोरून उभी राहिली आणि फाशीगेटला कापरे भरले...

साहेब फाशीगेटच्या दरवाजाशी क्षणभर थबकला आणि बऱ्याच विचाराअंती आपल्या रुंद जबड्यांवर त्याने उसने हास्य आणले. नवख्या नटाने स्टेजवर यावे तसे कावरेबावरे होत हसून साहेबाच्या गालावर बिचकत थबकत येऊन उभं ठाकलं. मग साहेबानं आपल्या जाडजूड भुवया इकडे तिकडे उडवत घसा खाकरून आवाजात थोडा मार्दव आणायचा प्रयत्न केला नि साहेब नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर येऊन ठाकला.

'हॅलो यंग बॉय, हाऊ आर यू?'

साहेबाने विचारपूर्वक ठरवलेला पहिला प्रश्न दिमाखात फेकला. नक्षलवाद्याला ग्लाडसाहेबाचा कावा कळला नि साहेबाला झटकन नक्षलवादी म्हणाला,

'आय ॲम कैदी नंबर आठसो बयालीस, ट्रेटर, नक्षलाईट ॲंड नॉट ए यंग बॉय, मिस्टर ग्लाड!'

नक्षलवाद्याच्या या तोडून टाकणाऱ्या उत्तराने सीनियर जेलरच्या उरात धडकी भरली. फाशीगेटच्या जेलरला कापरे भरले. ग्लाडसाहेब पिसाळणार असे त्यांना वाटले. पण ग्लाडसाहेब भडकला नाही, चिडला नाही. त्याने फक्त जमादाराला दरवाजा खोलण्याची खूण केली. वेंधळ्या जमादाराने धांदरटपणे पुढे येत जुडग्यातल्या किल्ल्या चार वेळा आलटतपालटत, दरवाजा उघडला. मग साहेबाने जमादाराचे स्टूल स्वतःच उचलले नि नक्षलवाद्याच्या पुढ्यात फेंगड्या पायाने स्टुलावर बैठक मारली.

कोठडीत एक संशयी शांतता भरून राहिली. मग शिरस्त्याप्रमाणे साहेबानेच तिचा भंग केला. साहेबाने आधी आपला डावा डोळा

जरा बारीक केला. उजव्या हातातली छडी डाव्या तळव्यावर आपटली आणि साहेब गडगडला...मोकळेपणाने गडगडला, मनापासून गडगडला आणि खर्जात बोलला.

'बच्चा फौलाद का है फौलाद का !'

मग साहेब क्षणभर थांबला आणि नक्षलवाद्याच्या नजरेत नजर घालून डावा डोळा अधिकच बारीक करीत विचारता झाला...

'क्यों बे कैदी नंबर आठसोबयालीस, माझं वय काय असेल, अंदाज कर जरा !'

नक्षलवाद्याने एकवार ग्लाडसाहेबाला आपादमस्तक न्याहाळले नि पांढऱ्या होत चाललेल्या त्याच्या झुपकेदार मिशांना पाहात सांगितले...

'असेल बावन्न-त्रेपन्न !'

नक्षलवाद्याच्या या उत्तरावर साहेब एकदम कडाडला...

'बेवकूफ, गद्धा आहेस. माझं वय तुझ्या बापाएवढं आहे, समजलास !'

स्वतःच्या वयाचा फायदा घेऊन वडिलकीचा अधिकार गाजवायचा प्रयत्न ग्लाडसाहेबाने केला खरा; पण त्याने नक्षलवाद्याच्या चेहऱ्यावरील सुरकुतीही हालली नाही. मग साहेब एकदम अजीजीने बोलू लागला.

'हे बघ पोरा, ज्याची मस्ती आमच्या अंगात आहे ती ही खाकी झूलदेखील माणसाच्याच अंगावर चढवलीय बरं. आणि एक वडीलधारा माणूस म्हणून तुला सांगतो, मर्सिपिटिशनवर सही कर !'

साहेबाने हातातला पेन नि कागद नक्षलवाद्यासमोर केले. पण नक्षलवाद्याने त्याकडे ढुंकूनसुद्धा पाहिले नाही आणि साहेबाने पण आपला प्रयत्न सोडला नाही.

'यू सी बॉय. तू एकदम सही करणार नाहीस. मला माहितीय. तुला त्यात अपमान वाटतो. वाटणं साहजिक आहे; पण मूर्खपणाचं आहे, चुकीचं आहे.'

'असं ? कसं काय बुवा ?' –तोंडाचा थोडासा चंबू करीत टवाळीच्या सुरात नक्षलवाद्याने ग्लाडसाहेबाला विचारले.

साहेबाने त्या टवाळीकडे सरळ डोळेझाक केली आणि युक्तिवाद चालूच ठेवला.

'यू सी...क्लासवॉर...वर्गयुद्धावर तुझा विश्वास आहे, नाही का ?' साहेबाने विचारले.

'ऑफ कोर्स आहे.' नक्षलवाद्याने उत्तर दिले.

'मग लढाईत चार वार चार जखमा व्हायच्याच आणि होणारा वार नेहमी शारीरिकच असतो असं नाही. तो मानसिकही असतो. खरा योद्धा हेही वार झेलतो आणि अंतिम विजयासाठी माघारी फिरतो. तसा तूही आता माघारी फिर. माघार...अगदी तात्पुरती माघार. जीव वाचवण्यापुरती माघार. तुझा जीव लाखमोलाचा आहे हे विसरू नकोस. तुझ्यासारखी माणसंच क्रांती करतात.'

'हे कोणी सांगितलं तुम्हाला ?' साहेबाचे बोलणे मध्येच तोडत नक्षलवादी म्हणाला. 'माझ्या फाशी जाण्याने काही क्रांती दूर लोटली जाणार नाही.'

'हो, पण तुझ्या फाशी जाण्यानं काही ती जवळही येणार नाही. मग इतका हटवादी कशाला होतोस ? मर्सिपिटिशनमध्ये स्वतःचा अपमान कशाला समजतोस ?' ग्लाडसाहेबाने प्रतिप्रश्न केला.

'स्वतःचे सारे मान-अपमान गुंडाळून मी घराबाहेर पडलोय, मिस्टर ग्लाड. मर्सिपिटिशनमध्ये मी माझा अपमान समजत नाही, क्रांतिकारी चळवळीचा अपमान समजतो. या जुलमी सत्तेकडे स्वतःच्या प्राणांसाठी याचना करणे म्हणजे जनतेच्या क्रांतिकारी शक्तीवर अविश्वास दाखवणे आहे. एक क्रांतिकारक असून क्रांतिकारक चळवळीला कमीपणा आणणे आहे !' नक्षलवाद्याने उत्तर दिले.

नक्षलवाद्याच्या उत्तराने ग्लाडसाहेब निरुत्तर झाला. राजकारण हा काही आपला प्रांत नाही हे ग्लाडसाहेबाला पुन्हा एकदा जाणवले आणि मग त्याने सरळ त्याच्या भावनेलाच हात घालायचा प्रयत्न केला.

'तुझी क्रांतिबिंती राहू दे बाजूला. त्यातलं मला काही समजत नाही. मला फक्त एवढंच समजतं की तुझी बायको-मुलं निराधार आहेत, एकटी आहेत. तुला भेटायला लहानग्या पोराला कडेवर घेऊन शंभर मैल उन्हातान्हाची अनवाणी चालत आली होती ती !' ग्लाडसाहेब बोलला.

'मला माहितीय मिस्टर ग्लाड. माझ्याशी लग्न केलं तेव्हापासूनच ती निखाऱ्यावरून चालतीय; शंभर मैलांची अनवाणी चाल तिला जड नाही.' नक्षलवाद्याने थंडपणे उत्तर दिले !

पण नक्षलवाद्याच्या भावनेला हात घालता घालता खुद्द ग्लाडसाहेबच भावनेच्या आहारी गेला होता.

'शब्दाचं सामर्थ्य फक्त स्पष्टीकरणापुरतं मोठं असतं पोरा, वस्तुस्थिती त्यानं बदलत नाही. तू मेलास तर तुझ्या बायकोचं आयुष्य वैराण होईल...उद्ध्वस्त होईल. ही वैराणता काय असते ती तुला काय माहीत ? मला विचार. मला माहितीय आयुष्य वैराण होणं म्हणजे काय, उद्ध्वस्त होणं म्हणजे काय ?'

बोलता बोलता ग्लाडसाहेब हालला......गलबलला. आपल्या बोलण्याचा नक्षलवाद्यावर काहीच परिणाम होत नाहीय हे पाहून कातावला...चिडला आणि एकदम नक्षलवाद्याचे खांदे गदागदा हालवीत ओरडला,

'माणूस आहेस का जनावर ? तू खोटारडा, लुच्च्या, ढोंगी आहेस. रस्त्यावरच्या उपाशी पोराला पाहून तुझ्या आतडीला पीळ पडतो; पण स्वतःच्या बायकापोरांची तुला कणवही येत नाही, होय रे ? स्वतःच्या अहंकारासाठी त्यांचा बळी देतोयस तू ?'...ग्लाडसाहेबाने विचारले.

'माझ्या बायकापोरांची तुम्हाला का एवढी कणव येतीय ? नक्षलवाद्याने चिडून विचारले.

'साध्या माणुसकीच्या नात्यानं.' ग्लाडसाहेबाने उत्तर दिले. तशी नक्षलवादी ताडकन म्हणाला,

'तुमचा नि माणुसकीचा काय संबंध मिस्टर ग्लाड. माणुसकीशी नातं सांगायला छाताडात माणसाचं काळीज असावं लागतं. तुमच्यासारख्या नरपशूचा माणूसकीशी काय संबंध ?'

ग्लाडसाहेबांचा हा अपमान वेंधळ्या जमादारालाही सहन झाल नाही आणि दंडा उगारत तो नक्षलवाद्यावर धावला. पण ग्लाडसाहेबाने त्याला हातानेच मागे लोटले. नक्षलवादी मात्र कडवट

शब्दात ग्लाडसाहेबाला सुनावत होता—

'आय नो. मला माहितीय. मी मर्सिपिटिशन केला नाही हे सरकारच्या नाकाला झोंबलंय. मी सरकारची दखलही घेत नाही हे पाहून होम डिपार्टमेंटला अपमान वाटतोय आणि म्हणून तुम्हाला सांगितलं गेलंय...माझी मर्सिपिटिशनवर सही घ्यायला. तरीच परवापासून एवढी बडदास्त ठेवताय तुम्ही. गोडीगुलाबीने वागताय...'

नक्षलवाद्याच्या या आरोपांनी ग्लाडसाहेब नुसता सुन्न झाला आणि बसून राहिला. अर्ध्या तासाने साहेब जायला उठला. क्षणभर कोठडीच्या दरवाजाशी थांबला आणि नक्षलवाद्याला म्हणाला,

'पोरा, अजून रांगतं पोर आहेस तू, रांगतं पोर ! तुला राजकारणही कळत नाही नि माणूसही कळत नाही. तुला कळणार नाही, मी तुझ्या दाराशी का येतो ते. कारण अजून तुझं आयुष्य कधी उद्ध्वस्त झालं नाही, वैराण झालं नाही. माणसाला ओळखणं इतकं सोपं नसतं पोरा. आणि राजकारण ?......ते तुला समजत असतं तर सरकार तुझ्या मर्सिपिटिशनची वाट पाहतंय असं तुला वाटलंच नसतं. ओ के ! मी पुन्हा पुन्हा येईन. अखेरच्या क्षणापर्यंत येईन. तुला हकनाक फासावर मी चढू देणार नाही. बाय !'

साहेब फाशीगेटमधून चालता झाला तो तडक बंगल्यावर आला. मग त्याने क्षितिजाकडे नजर टाकली...सूर्य अस्ताला चालला होता. नक्षलवाद्याला कन्व्हिन्स करण्यात अख्खा दिवस गेला होता.

रात्र जसजशी गर्द होऊ लागली तसतसा साहेब अधिकाधिक तर्रर्र होऊ लागला. रोजचा रिवाजच होता त्याचा तो. साहेबाला खूप चढली की वैराण, उद्ध्वस्त माळावरही शेतभात डोलताना... फळंफुलं फुलताना दिसत...पण आजची साहेबाची सारी नशाच वांझोटी होत होती. पेगच्या पेग घशाखाली उतरूनही साहेब स्वतःला हरवून जाऊ शकत नव्हता. नक्षलवाद्याचे डसलेले शब्द तो काटयासारखे काढून फेकून देऊ शकत नव्हता...

साहेब झुकांड्या खात डोलत उठला. अंधारातच बागेत आला. त्याने रातराणीचा मंदमत्त सुवास दीर्घश्वासाबरोबर छाताडात घेतला. त्याने तो मोहरून गेला. तरी आपल्या छाताडात माणसाचे काळीज आहे याची त्याला पुन्हा बालंबाल खात्री पटली...मग लाडाने त्याने रातराणीला कुरवाळले.

ग्लाडसाहेबाचे रातराणीवर फार फार प्रेम होते. त्याला सूर्यप्रकाशात नखरे करणारी लडिवाळ फुलझाडे आवडीत नसत. क्षुद्र माणसाप्रमाणे त्याला ती वाटत, फक्त सुखात वाटेकरी होणारी. पण 'रातराणी ?'

...ग्लाडसाहेबाने रातराणीला पुन्हा एकदा कुरवाळले.

जेव्हा सूर्य अस्ताला जातो नि निबिड रात्र साऱ्यांना घेरून टाकते तेव्हा नाजूक रातराणीच ताठ्यात उभी राहते. अंधाराला, नाक मुरडीत आपल्या मंद सुवासाने वातावरण दरवळून टाकते.

साहेबाने डोळे फाडफाडून अंधाराकडे पाहिले. ठणा-ठणा पडणाऱ्या बाराच्या ठोक्यांबरोबर तो काळरात्रीचा निबिड अंधार सारी सृष्टी बकाबका खात चालला होता. आधी मोठमोठ्या झाडांना...नंतर तुरुंगाच्या दगडी भिंतींना आणि आता ग्लाडसाहेबाच्या बंगल्यालाही साहेब घाबरून रातराणीच्या कुशीत शिरला.

इवलीशी नाजूक रातराणी मात्र टेचात उभी होती. निबिड अंधाराळा वाकुल्या दाखवीत प्रसन्न हसत होती. गेस्टापोच्या तावडीतल्या माराप्रमाणे. माराच्या आठवणीने साहेब पंख तुटलेल्या पाखराप्रमाणे तडफडू लागला. रातराणीला छातीशी आवळून गदागदा हालवू लागला नि साहेबाने आतल्या आत टाहो फोडला...

माराऽऽ माराऽऽ

रातराणीने साहेबाला छातीशी लावून पाठीवरून मायेचा हात फिरवीत समजूत काढली. मग थोडया वेळाने साहेब भानावर आला आणि पुन्हा त्याला नक्षलवाद्याचे शब्द डसले. मग साहेब संतापला, चिडला आणि दातओठ खात पुटपुटला,

'भांचोद, चार पुस्तकं वाचली म्हणून स्वतःला फार विद्वान समजतो काय ? मला माणसाचं काळीज नाही म्हणतो ? भडवासाला.'

साहेब रागाच्या सपाट्यातच रातराणीच्या कुशीतून उठला आणि दिवाणखान्यात गेला. नाइटगाऊन फेकून कशीबशी अधिकाराची वर्दी त्याने अंगावर चढवली. कमरेला लेदर बेल्ट अडकवून खिशात मर्सिपिटिशन त्याने कोंबला आणि तुरुंगाकडे तो चालू लागला...

काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले खाडखाड वाजू लागली. रस्ता निर्मनुष्य झाला. आसपासच्या झाडांवरल्या रातकिड्यांची किरकिरही शांत झाली...

गार्डड्यूटीवरल्या हवालदारांनी सलामी दिली. मेनगेटच्या पहारेकऱ्यांनी गडबडीने मेनगेटचे दरवाजे उघडले. ग्लाडसाहेबाने तुरुंगात पाऊल टाकले. ग्लाडसाहेबाचे पाऊल तुरुंगात पडले नि साखरझोपेत असलेले कैदी घाबरून बिस्तऱ्यात उठून बसले. मध्यरात्रीचा साहेब आलेला पाहून नाईटड्यूटीच्या वॉचमन-वार्डरांची, शिपाई-जेलरांची एकच धावपळ उडाली.

ग्लाडसाहेबाने फाशीगेटमध्ये शिरता शिरताच डरकाळी फोडली—

'ए कैदी नंबर आठसो बयालिस— '

साहेबाच्या डरकाळीने वेडा कैदीही उठून जागा झाला !

ताडताड पावले फेकीत ग्लाडसाहेब नक्षलवाद्याच्या कोठडीसमोर येऊन उभा ठाकला. त्याला पाहताच नक्षलवाद्याने नेहमीचे मंदस्मित करीत विचारले.

'हॅलो, मिस्टर ग्लाड, हाऊ आर यू ? '

पण नक्षलवाद्याच्या त्या मोहिनी हास्याचा आज ग्लाडसाहेबावर काहीच परिणाम झाला नाही. तो फाशीगेटच्या वेंधळ्या जमादारावर खेकसला.

'बुबुळांच्या खाचा झाल्या काय तुझ्या ? दरवाजा खोल.'


नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
काजळ, नेत्रांजन, बाळगोळी

उत्पादक
काकडे अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०

वेंधळ्या जमादाराची त्रेधातिरपीट उडाली. कसेबसे कुलूप उघडून त्याने सुटकेचा श्वास सोडला.

वेंधळ्या जमादाराने कुलूप उघडताच साहेबाने एक कचकचीत लाथ दरवाजावर घातली. कोठडीचा लोखंडी दरवाजा थाडकन दगडी भिंतीवर आपटला आणि त्या आवाजाने सारा तुरुंग दुमदुमला.

साहेब कोठडीत शिरला आणि दुसऱ्या लाथेसरशी त्याने सर्व कवितांची पुस्तके कोठडीभर विखरून टाकली. मग दोन-चार पुस्तकांवर थयाथया नाचत तो नक्षलवाद्यावर ओरडला,

'कविता वाचतोस होय रे भडव्या, कविता वाचतोस ?'

मग कवितांची पुस्तके पुरेशी पायदळी तुडवल्यावर त्याने नक्षलवाद्याची गचांडी धरली अन् त्याला गदागदा हलवीत विचारले,

'बोल, मर्सिपिटिशनवर सही करतोस की नाही ?'

नक्षलवाद्याने नकारार्थी मान हलवली. त्याच्या ठाम नकाराने साहेब अधिकच खवळला आणि दोन्ही हातांनी त्याने नक्षलवाद्याला हवेतल्या हवेतच उचलले नि एकदा या, एकदा त्या अशा चारी भिंतींवर दणादणा आपटायला सुरुवात केली. रिटायर्ड व्हायला आलेल्या ग्लाडसाहेबाच्या अंगातली ती मस्ती, ती रग आणि अचाट ताकद पाहून फाशीगेटचा वेंधळा जमादार नुसत्या भीतीनेच थरथर कापू लागला.

भिंतीवर आपटून आपटून नक्षलवाद्याची हाडे खिळखिळी करून झाल्यावर ग्लाडसाहेबाने त्याला दाणकन फरशीवर पटकले. इतका मार बसूनही नक्षलवादी धडपडत उठला आणि ताठ मानेने छाती काढून ग्लाडसाहेबासमोर उभा राहिला.

आपल्या राठ पंज्यात नक्षलवाद्याचे तोंड पकडून ग्लाडसाहेब ओरडला,

'कुत्रा समजतोस काय मला ? सरकारच्या हुकमानं तुला मर्सिपिटिशन मागतो असं वाटतंय काय तुला ? हरामखोर, मला काय काळीज नाही ?... भडव्या, तुला काळीज नाही. तुला मन नाही. हलकट, लुच्चा, ढोंगी आहेस तू...'

ग्लाडसाहेबाने एकवार एक कचकचीत थोबाडात भडकावल्यावर सरबत्ती चालू केली...

'साला, कविता वाचतो कविता. त्या बिचारीला विधवा करणार. इवल्याश्या लेकराला तू अनाथ करणार आणि भडव्या, कविता वाचतोस काय ?'

ग्लाडसाहेबाने रेड्याच्या ताकदीने दोन ठोसे नक्षलवाद्याच्या छाताडावर लगावले. इतका बळकट आणि जवान नक्षलवादी; पण तोही कोकरासारखा हेलपाटला, खाली पडला. मग साहेबाने त्याच्या छातीवर आपले गुडघे रोवले नि झिंज्या पकडून त्याचे डोके उचलीत विचारले,

'हरामखोर, त्या बिचारीच्या पायाला भेगा पडल्या अनवाणी चालून तुझ्यासाठी. गूखाऊ, आता स्वतःला फासावर चढवून घेऊन तिच्या काळजाला चिरा पाडणार काय तू ? माझ्यासारखं तिचंही आयुष्य तू वैराण करणार...उद्ध्वस्त करणार ?'

एका झटक्यात ग्लाडसाहेबाने नक्षलवाद्याला उभे केले आणि उरल्यासुरल्या चार थोबाडात पुन्हा भडकावीत ओरडला...'नीच, हलकट. तू क्रांतिकारक नाहीस. गेस्टापो आहेस गेस्टापो. हिटलर... नाही...फॅसिस्ट आहेस तू !'

बसलेल्या असह्य मारामुळे नक्षलवादी जमिनीवर कोसळला. ग्लाडसाहेबही आता थकला होता, दमला होता. त्याचे सारे अंग घामाने थबथबले होते...अत्याचाराच्या आणि दारूच्या धुंद नशेतही त्याला नक्षलवाद्याच्या बायकोच्या पायाला पडलेल्या भेगा आठवल्या... गॅसचेंबरमध्ये जळणारी मारा आठवली आणि डोळे घट्ट मिटून घेत ग्लाडसाहेबाने आतल्या आत टाहो फोडला...

'माराऽऽ, माराऽऽ'

जेलच्या भिंतीवर एकचा टोल आदळला. साहेब भानावर आला. त्याने पाहिले, नक्षलवादी जमिनीवर पडला होता. त्याच्या नाकातोंडातून भळभळा रक्त वाहत होते. इतका मार खाताना त्याने एक शब्द तोंडातून काढला नव्हता. थोडा देखील प्रतिकार केला नव्हता.

ग्लाडसाहेब थोडा खाली वाकला. खिशातल्या रुमालाने त्याने तोंड पुसले आणि हातातला मर्सिपिटिशन दूर लोटला. नक्षलवादी साहेबाला म्हणाला,

'आर यू सॅटिसफाईड मिस्टर ग्लाड ? बरेच दिवस मला मारण्याची तुमची इच्छा बाकी होती. आज तुम्हाला शांत झोप लागेल !'

आणि नक्षलवाद्याची शुद्ध हरपली. साहेबाने फाशीगेटच्या जेलरला खूण केली आणि थोड्याच वेळात जेल हॉस्पिटलचे वॉर्डर स्ट्रेचर घेऊन धावत आले. त्यांनी नक्षलवाद्याला स्ट्रेचरवर टाकले नि ते चालते झाले. मग साहेब कोठडीबाहेर आला. वेंधळ्या जमादाराने कोठडीला टाळा ठोकला.

ग्लाडसाहेबाने मोकळ्या कोठडीकडे पाहिले नि त्याला वाटले, नक्षलवाद्याला फाशी देऊन झाले आहे. नुसत्या विचाराने साहेबाच्या छातीत कळ आली. साहेबाने एका हाताने छाती घट्ट दाबली अन् खुरडत खुरडत तो बंगल्याकडे चालू लागला.

त्या रात्री, नक्षलवाद्याला सोल फाटेपर्यंत बुटाने तुडवूनही ग्लाडसाहेबाला सुखाची झोप आली नाही ! □

## पूर्वार्ध समाप्त

कादंबरीचा उत्तरार्ध 'माणूस' पुढील अंकी प्रसिद्ध होईल. संपूर्ण कादंबरी मुंबईच्या 'पॉप्युलर प्रकाशन'तर्फे लवकरच प्रकाशित होत आहे.

तीन चित्रपट



# निशान्त

## अस्वस्थ करणारा विदारक अनुभव

कोणत्याही चित्रपटाचा दिग्दर्शक हाच खरा त्या चित्रपटाचा प्राण होय–त्यात काम करणारे अभिनेता अगर अभिनेत्री नव्हेत. माझ्या चित्रपटात ज्या व्यक्तिरेखा साकार होतात. त्यांना योग्य न्याय देण्याचे काम मीच म्हणजे माझ्यातला एक दिग्दर्शक करतो, त्या भूमिका साकार करणाऱ्या व्यक्ती नव्हेत, असे एका मुलाखतीत श्याम बेनेगलनी जे प्रतिपादन केले त्याची प्रचीती ' निशान्त ' मध्ये येते.

एका लहानशा गावातील जमीनदार आणि त्याची त्या गावावर चालणारी जुलमी सत्ता ह्या विषयाला धरून श्याम बेनेगलनी काढलेले ' अंकूर ' आणि ' निशान्त ' हे चित्रपट बरेचसे वास्तववादी वाटतात.

जमीनदार आणि त्याची जुलमी सत्ता हा विषय हिंदी चित्रपटसृष्टीला तसा नवीन नाही. बिमल रॉय यांचा ' दो बिघा जमीन ' हा सुद्धा याच विषयावर आधारित होता. परंतु बेनेगलनी ह्या दोन्ही चित्रपटांत हा विषय एका वेगळ्या दृष्टिकोणातून मांडला आणि तो बराचसा यशस्वी झाला आहे.

' निशान्त 'मध्ये असेच एक खेडेगाव आहे की जेथे फक्त जमीनदाराचीच सत्ता चालते. या जुलमी सत्तेला कसलाही प्रतिकार न करता त्या गावची जनता क्षुद्र जीवन जगत असते. जुलूम, जबरदस्ती, अत्याचार याबद्दल त्यांच्या मनात कसलीच चीड निर्माण होत नाही; कारण त्यांची मने ही मेलेलीच असतात. अशा या गावी एक साधा-भोळा शाळा-मास्तर आपली बायको व मुलाला घेऊन येतो. जमीनदाराच्या वागणुकीला तो नवीनच असतो. परंतु थोड्याच दिवसांत त्याला प्रत्यय येतो. त्याची बायको एका रात्री पळवून नेली जाते. त्याच्या मनात आत्यंतिक चीड निर्माण होते. हतबल झालेला मास्तर या परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतो तो देवळातल्या पंडितजींच्या साहाय्याने. दोघे मिळून गावातील जनतेला जागृत करतात. गावातील जनता ह्या पाशवी सत्तेमुळे पेटून उठते आणि साहजिकच त्याचा शेवट जमीनदारबंधूंना ठार मारण्यात होतो. एका जुलमी सत्तेचा अंत होतो. एका अंधकारमय रात्रीचा शेवट होतो.

कुठेही भडकपणा येऊ न देता हा विषय वास्तवाला स्पर्श करून जातो. यातील व्यक्तिरेखा वास्तव परिस्थितीशी नाते सांगणाऱ्या आहेत. कथा आंध्र प्रदेशातील एका गावात घडते. तेथील लोकसंगीताचा वापर खुबीने केला आहे. खेडेगावातच सर्व चित्रीकरण केल्यामुळे कथेला उठाव आला आहे. रामलीला, रेड्यांची झुंज, देवी अंगात येणे इ. गोष्टींचा वापर कुशलतेने केला आहे.

गिरीश कर्नाड यांनी सरळमार्गी मास्तर योग्य रीतीने उभा केला आहे. अमरीश पुरी यांनी कोणताही आक्रस्ताळेपणा न करता मोठ्या संयमाने जमीनदाराची भूमिका केली आहे. अनंत नाग, मोहन आगाशे यांनी त्याला योग्य साथ दिली आहे. जमीनदार घराण्यातील एकमेव स्त्री-रुक्मिणी-हिची त्या घरामध्ये जी कोंडी होते, तिच्या मनात जो संघर्ष निर्माण होतो तो स्मिता पाटीलने यशस्वीपणे दर्शविला आहे. ' अंकूर ' मध्ये चमकणारा साधू मेहेर येथे एका नगण्य भूमिकेत दिसतो. शेवटी शबाना आझमीबद्दल शबाना ही Talented अभिनेत्री आहे याचा प्रत्यय ' अंकूर ' मध्ये येतोच. बलात्काराच्या एका दृश्याच्या वेळी तिने आपली सर्व expressions अतिशय संयमाने प्रकट केली आहेत. आपली सोडवणूक करण्यात नवरा जेव्हा अयशस्वी होतो तेव्हा ती आत्यंतिक संतापाने पेटून उठते. ह्या प्रसंगात तिचा अभिनय प्रभावित करणारा आहे. वास्तववाद दाखवण्यासाठी काही गोष्टी ज्या दाखवल्या आहेत त्या मात्र खटकल्याशिवाय राहत नाहीत. लहान मुलांचे ढुंगण धुणे अगर काखेतील केस काढणे ह्या गोष्टी दाखवणे आवश्यक होते काय ?

पटकथा प्रभावी व आवश्यक ती गती सांभाळणारी असली तरी ' निशान्त ' हे दिग्दर्शकाचं चित्र आहे. वातावरणनिर्मिती, रेखाटन व चित्राचा एकत्रित परिणाम यासाठी दिग्दर्शकाने घेतलेले परिश्रम जागोजागी दिसून येतात.

हिंदी चित्रपटात अधूनमधून डोकावणारा हा विषय येथे कोणताही अतिरंजितपणा अगर उथळपणा, भडक व्यक्तिचित्रण इ. च्या अभावामुळे विशेष लक्षात राहतो. एक अस्वस्थ करणारा अनुभव ठरतो. याचे श्रेय निःसंशय बेनेगलनाच द्यायला पाहिजे.

–लता किणीकर

# जीमसाहेब

अमेरिकन निग्रो. आठवतात दक्षिणेकडची संस्थानं. करड्या कातडीची ही माणसं. उगाचच आपल्या आपुलकीत घुटमळत राहातात. ह्या उग्र चेहऱ्याच्या बोजड माणसांची आपण नेमकी दखल घेतो. लिंकन आठवतो. शतकापूर्वीचा त्याचा मारेकरी आठवतो. केनेडी आठवतात. त्यांचा पडद्यावरचा उमदा हसरा चेहरा आठवतो. हॉटेलच्या सज्ज्यात अखेरच्या क्षणी उभे राहिलेले मार्टिन ल्यूथर आठवतात. मग आठवतात बंदुका, संघर्ष आणि जीवनाच्या काचांवर ओघळणारं रक्त. ह्या गर्दीत न्यूयॉर्कच्या हॉटेलात सत्याग्रह करणारे लोहिया सुद्धा आठवतात. आपली आपुलकी मोठी असते. निदान ह्या दलित जमातीबद्दल.

कोलुसा हा ह्याच अमेरिकेतील एक परगणा. दक्षिणेकडच्याच एका संस्थानातला. एकदा वेगळंच काही तरी घडतं. गोऱ्या लोकांच्या ह्या प्रदेशात एक निग्रो माणूस सरळ सरळ निवडणूक लढवतो आणि चक्क शेरीफ म्हणून निवडून येतो. ह्याच उंचपुऱ्या माणसाचं नाव जीम प्राइस. वंशवादावर पोसलेल्या गोऱ्यांना हा धक्का मोठा असतो. त्यांची प्रतिक्रियाही तितकीच उघड असते. आपल्या ऑफिसमध्ये हा माणूस येऊन पोहोचतो. चार्ज घ्यायला, त्याच्या कामाचा. आपणही मनातून चरकताच एक तीव्र प्रतिक्रियांची मालिकाच सुरू होते.

अमेरिकेतला शेरीफ हा मोठा माणूस.

आपल्यासारखा मोहरमचा वाघ नसतो. कायदा आणि सुव्यवस्था ही त्याचीच जिम्मेदारी. त्याचा वट मोठा. एखाद्या रहस्यकथेतल्या कमिशनरसाहेबासारखाच त्याचा दरारा मोठा. जीम प्राइस नावाचा हुशार माणूस संमिश्र वस्तीच्या शहराचा सर्वाधिकारी बनतो. डिवचलेल्या गोऱ्या जमातीला येवढं कारण पुरेसं असतं.

जीमसाहेब शेरिफाच्या ऑफिसात जाऊन पोहोचतो. खूप वर्षं तिथं चिकटून असलेल्या जॉन लिटल ह्या माजी शेरिफाकडून तो अधिकार घेतो. पदावनतीनं चिडलेला जॉन त्याला सहकार्य नाकारतो. संघर्षाची पहिली ओळ आपणच लिहून टाकतो. जीमसाहेबाला आणखी एक बॉस असतो. शहराचा वृद्ध परंपरागत मेयन पार्कस. दक्षिणी संस्कृतीत वाढलेला हा माणूस मनातून भित्रा असतो. कोणत्याही बारीक दंगलीत देशाचं सैन्य आणायला त्याचा सक्त विरोध असतो. स्थानिक संघर्ष तडजोडीनं मिटवू पाहणं हीच त्याची भूमिका असते.

जीमसाहेबाची कारकीर्द सुरू होते. पहिलाच मासा गळाला लागतो जॉन ब्रॅडॉक. शेजारच्या प्रांतातला हा धनाढ्य जमीनदाराचा मुलगा. एका हत्येच्या प्रकरणात जीमसाहेब त्याला अडकवितात आणि सरळ ऑफिसामागे असलेल्या कोठडीत बंद करतात. ह्या प्रकरणात त्याला बरीच बाँडगिरी करावी लागते. परिणाम उघडच असतो. आपल्या मुलाला अटक म्हणजे काय ? तीही एका काळ्या शेरिफाकडून ? जॉनचे वडील थोरले जमीनदार भडकतात. ते ऑफिसात येतात. शिवीगाळ करतात. दम देऊ पाहतात; पण जीमसाहेब दाद देत नाही. काळे विरुद्ध गोरे संघर्षाला उघड तोंड फुटते.

दुसरा मामला घरचाच असतो. जीमसाहेब त्याच्यातपण लक्ष घालतात. एका उनाड तरुणाला बलात्काराच्या गुन्ह्याखाली ते पकडतात. ह्या प्रकरणाची झळ त्यांना चांगलीच लागते. जीमसाहेबांना छोटीशी मारामारीही करावी लागते. शिवाय हाताला जखम होते ती वेगळीच. प्रकरण जरा जडच गेलं. सारा निग्रो समाज जीमसाहेबांवर खवळून उठतो.

आपल्याला कुठे तरी समाधान वाटत राहतं. हा करडा काळा माणूस न्यायामागे उभा राहिलेला पाहून. मग रागावून गेलेला जॉन लिटल जीमचा साहाय्यक म्हणून नव्यानं रुजू होतो. जीमसाहेबाच्या अजात व्यक्तिमत्त्वाचा हा विजय असतो. त्याच्या धडाडीनं प्रभावित झालेला जॉन जीमसाहेबाच्या मागे उभा राहतो. तेव्हा त्या बुटक्या, गोऱ्या, जाड्या माणसावर आपणसुद्धा प्रेम करू लागतो.

थोरले जॉन बॅडॉकसाहेब चांगलेच खवळतात. संघर्षाची धमकी देतात. वांशिक संघर्षाचा धोका दृष्टिक्षेपात येतो. प्रांताचं स्वास्थ्य ढवळलं जातं. पण मेयर प्राइस आपल्याच जुन्या धोरणाला चिकटून असतात. सैन्य मागवायला ते उघड नकार देतात. दरम्यान जीमसाहेबसुद्धा खवळतात. जॉन लिटल सरळसरळ एका गोऱ्यांच्या अड्ड्यावर जाऊन थडकतात. हा बार म्हणजे संघर्षदाद्या गोऱ्यांचा केंद्रबिंदू. जीमसाहेब तिथे दारू ढोसणाऱ्या जमावाला सहकार्याचं आवाहन करतात; पण त्यांचं स्वागत एकंदरीत थंडच होतं. तो गोरा जमाव त्यांच्याकडे ढुंकूनही बघत नाही. बॅडॉकविरुद्ध लढायला गोरी जमात तयार नसते.

चवताळलेले जीम आणि त्यांचा खंदा सहकारी जॉन लिटल आपल्या मोजक्या निग्रो सहकाऱ्यांना गोळा करतात. बंदुका आणि पिस्तुलं सरसावून ते गावाबाहेरच्या पुलाजवळ दबा धरून बसतात. ब्रॅडॉक आपली गँग आणि शस्त्रं घेऊन असंख्य मोटारींतून चालून येतो. गर्द रात्र झालेली असते. ब्रॅडॉक आपल्या उघड्या मोटारीतून पहातो. तेव्हा गोऱ्या लोकांचा एक सशस्त्र जमाव काळ्या जीमसाहेबांच्या मागे उभा राहिलेला दिसतो. ब्रॅडॉकला हा धक्का अनपेक्षित असतो. त्याचं सामर्थ्य अपुरं ठरतं. एक शब्दही न उच्चारता तो सरळ माघार घेतो.

जीम ब्राउन नावाच्या उमद्या माणसाचा आपण जयजयकार करतो. आपल्या निधड्या व्यक्तिमत्त्वानं हा माणूस गोऱ्यांना जिंकून घेतो तसंच आपल्याही वंशवादाच्या जळत्या समस्येचं उत्तर ह्या माणसात आपल्याला सापडल्यासारखं वाटतं.

माणूस नावाचा प्राणी वेगळाच आहे. त्याला एक हृदय आहे. संस्कृती आहे. भले त्याच्या कातडीचा रंग कोणताही असो. तिच्याखाली एकच संस्कृती वस्ती करून असते आणि ह्या संस्कृतीचा सच्चा प्रतीक असलेल्या जीम ब्राउन नावाच्या माणसाबद्दल आदर आणि अभिमानच वाटतो. अगदी सगळ्यासगळ्यांना. ☐

# एका वंशाची गोष्ट

एक माणूस जन्माला येतो. वाढावा तसाच वाढतो. वयात येतो. आपले संस्कार रक्तात बाळगून राहतो. आपली वीण वाढवतो. नवी पिढी जन्माला येते. तिचा चेहरामोहरा वेगळाच असू शकतो; पण नसात वाहणारे संस्कार मात्र तेच. अभिव्यक्ती मात्र काळाच्या संदर्भात बदललेल्या. मग वाढलेल्या ह्या पिढ्या एकमेकाला धडकतात. हाच establishment चा झगडा; पण ह्यातूनही प्रत्येकजण आपले व्यक्तिमत्त्व जपून ठेवतो आणि ह्या साऱ्यातून वंशाची मांडणी मांडली जाते.

हे एक कौलारू घर. त्याला एक लख्ख सारवलेले अंगण. दारातून रस्त्याकडे पाहणारी आणखी एकटी तरुणी. ती काळी आहे का गोरी, काळ्या-पांढऱ्या पडद्यावर स्पष्ट होत नाही; पण ती बोलत आहे आपल्या विलक्षण भावमय डोळ्यांतून. प्रथम तिला दिसते रस्त्यावरची वर्दळ. कदाचित बंगलोरच्या उपनगरातील असेल. जुनाट धाटणीची घरं. मग कॉलेजात जाणाऱ्या उडत्या चालीच्या काही पोरी; पण तिची ती विलक्षण थंडच. आपल्या आविर्भावात. शून्य नजरेनं पाहत. त्यांच्याकडे, त्यांच्या कोवळ्या हसऱ्या चेहऱ्यांकडे. कदाचित त्याही पलीकडे.

ह्या तरुणीचंच नाव कात्यायनी. तिनं एक छोटा मुलगा पण जन्माला घातलाय; पण तिचं कपाळ उजाड आहे. अर्थ स्पष्टच होतो. ती कात्यायनी नावाची एक विधवा स्त्री आहे. अगदी पूर्ण वयातली. क्षोत्रिय नावाच्या दशग्रंथी ब्राह्मणाचं हे घर. क्षोत्रिय हे नाव तितकसं बरं वाटत नाहीयेय. पोट सुटलेला किंवा तासलेल्या डोक्याचा हा माणूस. आपला मुलगा अकाली गमावून बसला आहे. स्वाभाविकच त्याचे केस करडे झालेले किंवा पांढरेही. पडद्यावर स्पष्टपणे दिसतात.

बोअर झालेली कात्यायनी कॉलेजात जाऊ इच्छिते. कदाचित आपल्या आयुष्याची कोंडी फोडू पाहत असेल. कदाचित दारावरून रोज कॉलेजात जाणाऱ्या पोरी पाहूनही असेल. बराच खल केल्यावर हा कर्मठ ब्राह्मण आपल्या सुनेला संमती देताना दिसतो. मग आपल्याला हेही कळून जातं की शेंडी राखणारा हा माणूस मनानं तितका कर्मठ नाही. कळमट तर नाहीच नाही आणि ह्या कथेतला हा पुरुष आपल्यालाही प्रभावित करू लागला आहे.

कॉलेज म्हणजे प्राध्यापक आलेच. माणूस म्हणजे तरुण-वृद्धांच्या मर्यादेत बसणारा कोणीही. ह्या कर्नाटकी कॉलेजचा प्राचार्य वृद्ध आहे तर त्याच्याच कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम करणारा त्याचा भाऊ बराच तरुण आणि देखणा पण आहे. कात्यायनीची गाठ आता प्राध्यापक राजाराव याच्याशी पडते. उमद्या स्वभावाचा हा तरुण. स्वभावानं मोकळा, स्वच्छ आकाशासारखा. कात्यायनी प्रभावित होते. त्याच्या घरी म्हणजेच प्राचार्य सदाशिवराव ह्यांच्या बंगल्यावर वरचेवर जाऊ लागते. मग कात्यायनी नावाची ही तरुण विधवा त्या कुटुंबात कधीच रमून गेलेली दिसते.

काळाची पावलं पुढेच असतात. मनांचे भोग अटळ ठरतात. कात्यायनी राजारावाच्या सरळ प्रेमात पडते. कॉलेज सोडून उरलेला शहरातला वेळ त्याच्या सान्निध्यातच घालवते. इतकंच काय, ते रानारानात घुमतात. हलकेफुलके रंग रंगवतात. परिणाम सरळ असतो. प्राध्यापक राजाराव कात्यायनी नावाच्या देखण्या, तरुण स्त्रीला सरळ लग्नाची मागणी घालतो. प्रश्न सरळ असतो. उत्तर मात्र नसतं. कारण उघडच आहे. कात्यायनी ही एका कुलीन घराण्याची सून असते आणि तीही विधवा. कात्यायनी सासऱ्याची पुन्हा एकदा संमती मागते. शांत डोक्याचा हा माणूस चारी अंगांनी विचार करतो. शेवटी जड मनानं काळाशी तडजोड करतो. ह्या विवाहाला त्याचा विरोध नसतो; पण अट एकच. कात्यायनीनं तिचा मुलगा चिनू आणि कुटुंबाबरोबरचे संबंध दोन्हीवर पाणी सोडावं. कात्यायनी गोंधळते. विचाराच्या भोवऱ्यात पडते; पण काळ अटळ असतो. शरीर त्याहून अटळ. उभ्या आयुष्याचा डोंगर तिच्या पुढे उभा राहतो. कात्यायनी आपला कौल शरीराला देते. घर व मूल यांचा त्याग करते व प्राध्यापक राजाराव याच्याशी विवाहबद्ध होते.

सुख हा शब्द कात्यायनीच्या आयुष्यात पुन्हा एकदा नव्यानं लिहिला जातो. शरीर आणि भोग चालत येतात. आयुष्य नव्यानं गुलमोहरतं; पण काळ अडखळत चाललेला. पूर्वायुष्याची बांधिलकी कात्यायनीला सोडायला तयार नसते. घर आणि मूल मागे सोडून आलेली कात्यायनी उपभोगांच्या वावटळीत सुद्धा त्यांना विसरू शकत नाही. विशेषतः आपल्या मुलाच्या आठवणी. ती उद्ध्वस्त होत रहाते. आतल्या आत रडते, ढासळते. अखेर माघारीचा निर्णय घेते आणि एके दिवशी भरमध्यान्ही परत घरी येऊन पोहोचलेली दिसते. नेमका घरात श्राद्धविधी चालू असतो. कललेला सासरा जड मनानं आपल्या मुलाचा श्राद्धविधी पार पाडताना तिला दिसतो.

कात्यायनी मुलाची मागणी करते. क्षोत्रियाचा दृष्टिकोन सरळ असतो. उघड व्यवहारी. तो कात्यायनीला सुनावतो. तुला आता दुसरा मुलगा होऊ शकेल. मला मात्र दुसरा नातू मिळू शकणार नाही. आपला वंशवृक्ष वाढवायला बांधील असलेला हा कुलीन माणूस आपल्या भूमिकेवर ठाम उभा राहिलेला दिसतो. हा युक्तिवाद सडेतोड असतो. कात्यायनी रिक्त हस्तांनी परत जाते. तिला दुसरा पर्यायच उरत नाही.

काळ पडद्यावर पुढे सरकतो, आणखी बारा वर्षांनी. कात्यायनीला ह्या काळात तीनदा गर्भ राहतो. दुर्दैव मोठं असतं. तीन्ही वेळा तिचा अकाली गर्भपात होतो. आता पुन्हा गर्भ रहाणं तिला धोकादायक ठरते. राजाराव डॉक्टरी सल्ला मान्य करतो आणि स्वतःवर ऑपरेशन करून घेतो. कात्यायनी नावाची स्त्री हतबल ठरते. परिस्थिती फरफटत नेते. काळाच्या ह्या संदर्भातच ती त्याच कॉलेजात प्राध्यापिका होते. करड्या केसांची ही स्त्री एकदा शिकवायला उभी रहाते तेव्हा आपला मुलगा चिनू आपल्या समोर विद्यार्थी म्हणून बसल्याचं ती पहाते.

कात्यायनी सरळ चिनूशी संपर्क साधते. त्याच्याशी स्नेह संपादन करू पहाते. त्याला घरी नेऊन खाऊपिऊ घालू पहाते. जुनाट वळणात वाढलेल्या त्या मुलाला तिची जवळीक मानवत नाही. रक्ताच्या मार्गानं चालण्यास तो सरळ नकार देतो व कात्यायनी ह्या आपल्या आईकडे सहज पाठ फिरवतो.

हा पराभव मोठा असतो. कात्यायनी ढासळून पडते. आयुष्यच उजाड होतं. स्त्रीत्व पराभूत होतं. आशा वांझ ठरतात. परिणाम अटळ असतो. कात्यायनी अंथरूण धरते. ह्या गोष्टीला येवढ्यातच आणखी एक फांदी फुटते, क्षोत्रिय नावाचा वृद्ध ब्राह्मण आपल्या माळ्यावर वावरत असतो. अडगळीत काही तुळसीमाळा त्याला दिसतात आणि अडगळीचा हा शोधच त्याला जाणता धक्का देऊन जातो. त्याला आपल्या वृद्ध नोकराणीकडून समजतं आपला बाप षंढ होता. आपला जन्मच मुळी आपल्या आईच्या विवाहबाह्य संबंधातून घडविला गेला. त्याचा बाप एक भुरटा हरिदास होता आणि त्या




VP-735

तुळशीमाळा, त्याच्या जन्मदात्याच्याच असतात.

वंश नावाची चीज जपणाऱ्या, तो स्वाभिमानानं वाढवू पहाणाऱ्या एका ब्राह्मणाच्या आयुष्याचा पायाच ढासळतो. परंपरांचे पिंड वाहून नेणारा हा माणूस आयुष्यात प्रथमच भांबावलेला दिसतो. आपली सून कात्यायनीशी घडलेला त्याचा व्यवहार खोटा ठरतो. पापक्षालनासाठी तो यात्रेला निघतो. वाटेवरच त्याची भेट कात्यायनीशी होते. जीवनाच्या अखेरच्या पायरीवर किंवा तिच्या मुलाशीही तिची भेट घडविली जाते; पण आपल्या पराभूत सासऱ्याला क्षमा करण्याआधीच कात्यायनीची अकाली अखेर होते.

एका भीषण कथेच्या मार्गावरून आपण चालत असतो तेव्हा आणखीही एक गोष्ट आपल्याला भेटते. ती असते प्राचार्य सदाशिवराव आणि त्यांची इतिहासाची विद्यार्थिनी करुणा रत्ने. करुणा रत्ने वंशानं सिलोनी. त्यांचं प्रेम अंकुरताना दिसतं आणि आपली सोज्ज्वळ पत्नी नागू आणि मुलगा पृथ्वी ह्यांचा त्याग प्राचार्य सदाशिवराव करतात. उतरत्या वयात ते सरळ करुणा रत्नेशी विवाहीत होतात; पण काळ पुढे सरकत असतो. मनं सांधली तरी शरीरं सांधली जात नाहीत. आपला वंश वाढवण्यात करुणा रत्ने असफल ठरते. परिणाम भीषण होतो. पृथ्वी मात्र एक उनाड पोरगा म्हणून वाढला जातो.

गिरीश कर्नाड नावाच्या माणसानं घडवलेली ही गोष्ट आयुष्याला नवी मिती देणारी. ह्या चित्रपटकथेत खूप माणसं भेटत जातात. आपल्या मुलाचा वंश कठोर होऊन जपणारा क्षोत्रिय. मग आपल्या अनौरस जन्माकडे उद्ध्वस्त होऊन चालत जाणारा क्षोत्रिय. आपला औरस वंश रुजवू पहाणारी कात्यायनी. त्यात फसल्यावर आपल्या रक्ताशी जवळीक साधू पाहणारी कात्यायनी. आपला वंश वाढवू पहाणारी सिलोनी करुणा रत्ने. आणि आपल्या रक्ताचा पोरगा उजाडून टाकणारे सदाशिवराव हे सारे एकाच परंपरेचे बांधील वाटसरू ठरतात. कर्नाडांची कथा आपल्याच विसंगतींना हसते आणि आपल्या मनाच्या करड्या भिंती सुद्धा सहज हलवून सोडते.

—अशोक प्रभाकर डांगे

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### धक्कादायक – खळबळजनक घटना घडणार आहे

मंगळ शनीच्या जवळ आला आहे. शनिमंगळ जेव्हा एक होऊन उभे ठाकतात तेव्हा काही तरी भयंकर विचित्र असे घडू लागणार आहे असे समजायला हरकत नाही. या आठवड्यात यापुढील घटनांची नांदी म्हटली गेली तर आश्चर्य वाटू नये. भारताच्या शत्रुराष्ट्रांकडून बरेच डावपेच लढवले जातील. प्रचार व प्रत्यक्ष कृती या दोन्ही आघाड्यांवर आपली मानखंडणा होईल अशी कृती विशेषतः चीन, पाकिस्तान या राष्ट्रांकडून घडण्याची शक्यता आहे; पण भारताचे नेतृत्व असामान्य तेजानेच तळपेल. बांगला देशात जे घडले त्याची दखल भारताला घ्यावी लागणार आहे व पंतप्रधान इंदिरा गांधी आपल्या राजकीय कौशल्याने जगातल्या राजकीय निरीक्षकांना थक्क करतील. अंतर्गत कारभारात आज काँग्रेस पक्ष व विरोधी पक्ष जवळ येण्याची गरज आहे. काँग्रेसमध्ये अंतर्गत दुफळीची चाहूल लागणार आहे.

### मेष : राजमान्यता मिळेल

मेषराशीची माणसे मोठी कर्तृत्ववान व काहीशी हट्टी असतात. त्यांच्यावर सोपवलेली केवढीही अवघड जबाबदारी ती कौशल्याने पार पाडतात. हा आठवडा तुम्हाला असाच काही तरी योग आणणार आहे. तुम्ही सरकारी नोकरीत महत्त्वाच्या प्रशासकीय जागेवर असाल तर तुमच्या कामाची कसोटीच लागणार आहे; पण त्यात तुम्ही यशस्वी व्हाल. या वेळी तुमच्यापैकी कुणीही बेकार राहणार नाही. नोकरीतच जास्त प्रयत्न करावेत. स्वतंत्र उद्योग, शेती वा लघुउद्योगाच्या स्वरूपाचा करावा. त्यात मोठे यश तुमच्या पदरात पडणार आहे. मंगळवार तुमच्यासाठी शुभवार आहे. या दिवशी कोणतेही काम करा. रविवार ते बुधवार महत्त्वाच्या व्यक्ती भेटतील. महिलांना मानाचा योग आहे. नोकरीतदेखील प्रमोशन मिळेल. विद्यार्थ्यांना उद्योगविषयक शिक्षणाची संधी मिळणार आहे.

### वृषभ : विवंचना मिटतील

गेले काही महिने तुम्ही अनेक प्रकारच्या अडचणींतून जात आहात. आपली प्रतिष्ठा ढासळते की काय अशी शंकादेखील तुमच्या मनात अनेकदा येऊन गेली असेल; पण मित्रहो, तसे काही घडणार नाही. कारण शनीच्या हातीच तुमच्या प्रगतीची, प्रतिष्ठेची सारी सूत्रे आहेत आणि तो ती प्रगती घडवून आणल्याखेरीज राहणार नाही. या आठवड्यात तुमची एखादी फार मोठी समस्या एखाद्या प्रतिष्ठित, धनिक व राजकीय दर्जात श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीच्या सहाय्याने सुटणार आहे. त्यामुळे तुम्हाला हायसे वाटेल. मंगळवार ते शुक्रवार एखादी ठरवलेली नवी योजना प्रत्यक्षात आणू शकाल. नोकरदारांना शुभवार्ता नसली तरी कामाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. महिलांना भरतकाम व शिवणकाम करून चार पैसे मिळवता येतील. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू शकेल.

### मिथुन : शब्दाला महत्त्व येईल

या आठवड्यात तुम्ही कोणत्याही कामाच्याबाबतीत बोलणी करू शकाल व ती बोलणी तुमच्या हिताची ठरतील. नोकरीच्या क्षेत्रात तुम्ही कदाचित काहीसे भीतिग्रस्त असाल तर ती भीती व्यर्थ आहे, हे तुम्हाला या वेळी पटेल. नियम व कायदा जरी तुमच्या बाजूचा नसला तरी तुमचे व्यक्तिमत्त्वच नोकरीत प्रभावी ठरेल. बेकारांना तात्पुरते काम मिळेल. गुंतवलेली रक्कम सत्कारणी लागेल. लेखक, प्रकाशक यांना सरकार–दरबारी मोठे स्थान मिळणार आहे. सत्तेवरील एखाद्या व्यक्तीबरोबर घनिष्ठ संबंध जुळून येऊन ते आशाआकांक्षांना पूरक ठरतील. सोमवार ते बुधवार करार-मदार करू नका. महिलांना नोकरी मिळू शकेल. कायद्याचा त्यांना फायदा मिळू शकेल. विद्यार्थ्यांनी साहित्यक्षेत्रात मुद्दाम भाग घ्यावा.

### कर्क : मागे राहू नका.

शनी राशीत असताना खरे म्हणजे तुम्ही प्रत्येक क्षेत्र काबीज करायला हवे. पण तुम्ही मागे राहाल. कारण स्वभाव चंचल व न्यूनगंडाने पछाडलेला. या आठवड्यात तुम्हाला नोकरीच्या बाबतीत अशी एखादी संधी मिळणार आहे की, त्यामुळे तुमच्या भावी आकांक्षांना स्फूर्ती मिळणार आहे. तुमच्यावर कुणाचेही दडपण आले तरी तुम्ही प्रामाणिक राहा. वरिष्ठांच्या एखाद्या लफड्याची जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागली तर मात्र ते नाकारा. जमीनजुमला, घर, फ्लॅट वगैरेचे खरेदीविक्रीचे व्यवहार या आठवड्यात करू नका. नुकसान होईल. जुने येणे वसूल होण्यास विलंब लागेल. अपेक्षित व्यक्ती भेटणार नाही. महिलांनी घरगुती लहान उद्योग पैसे मिळवण्याच्या दृष्टीनेच करावा. आरोग्य सुधारेल. विद्यार्थ्यांनी वासनेच्या आहारी जाऊ नये. रोज देवदर्शन घ्यावे.

### सिंह : नाव गाजेल.

तुम्ही रविप्रधान व्यक्ती असून देखील शनी बारावा आल्यापासून तुमचे सारेच काम रेंगाळत आहे. पण यावेळी रवी तुम्हाला अनुकूल असल्यामुळे तुमचे नाव चांगल्या क्षेत्रात गाजल्याखेरीज राहणार नाही. उपेक्षा संपून तुमच्या शब्दाला फार महत्त्व येणार आहे. तुम्ही ज्यांच्यासाठी काही प्रयत्न केले असतील त्यांच्या बाबतीत ते यशस्वी होतील. नोकरीत वरिष्ठांची-तुमची जरी खडाजंगी झाली तरी ते तुमचे काही वाईट करू शकणार नाहीत. शक्यतो मात्र तुम्ही भांडण करू नका. स्वतःचे काम जरा काळजीपूर्वक करा. पैशाच्या व्यवहारात लक्ष द्या. कुणाचे देणे असेल तर त्याला चुचकारून घ्या. महिलांनी भांडण टाळणे आवश्यक आहे. स्त्री-लेखिका प्रसिद्धीच्या प्रकाशात येतील. विद्यार्थ्यांनी स्मरणशक्तीचा भलताच अभिमान न धरता अभ्यास करावा.

### कन्या : नोकरीत आशादायक.

तिसरा रवी व दहावा मंगळ तुमच्या साऱ्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या करणार आहे. विशेषतः नोकरीतील तुमचे स्थान बळकट होऊन तुमचे वरिष्ठांवर परिणामकारक वजन पडणार आहे. वरिष्ठांचे अगर मालकांचे व तुमचे चांगले संबंध जुळून येतील. सरकारी नोकरीत ज्यांना काही भीती वाटत असेल अगर अस्वस्थता वाटत असेल त्यांनी ती मनातून काढून टाकावी. या आठवड्यात बेकारांच्या मनातील निराशा दूर होईल व निश्चित ध्येय गाठण्यासाठी त्यांना मार्ग सापडेल. चालू व्यवसायात नवीन भांडवल-गुंतवणूक करू शकाल. प्रकाशकांचा व्यवसाय अंग धरील. सोमवार, गुरुवार व शुक्रवार महत्त्वाचे निर्णय लागतील. महिलांना लहान प्रमाणात जर उद्योग सुरू करावयाचा असेल तर त्यांना साहाय्य मिळेल. नोकरीत शुभदायक. विद्यार्थ्यांची मनःस्थिती उत्तम राहील. लेखन होईल.

### तूळ : कलेला प्रोत्साहन.

मध्यंतरीच्या अनेक त्रासदायक गोष्टींनंतर आता तूळ राशीच्या व्यक्तींना प्रभातचा अरुणोदय दिसू लागणार आहे. संगीत, चित्र, नाट्य इत्यादी कलाक्षेत्रांत ज्यांना प्रवेश हवा असेल त्यांना हा आठवडा प्रोत्साहक असा आहे. प्रसिद्धी मिळेल. गुणांना वाव मिळेल. आकाशवाणीवरून नाव गाजेल. सर्वसामान्य नोकरीच्या दृष्टीने आठवडा अनुकूल आहे. नोकऱ्या कायम होतील. वरिष्ठांच्या बरोबर चर्चा-वाटाघाटी होऊन तुमच्या बुद्धीचे चीज होईल. बरेच दिवस रेंगाळत पडलेला बढतीचा प्रश्न मार्गी लागेल. मर्जी बसेल. सरकारी नोकरीत अनेक महत्त्वाचे अधिकार मिळतील. रविवार ते गुरुवार अनपेक्षित अर्थप्राप्ती. महिलांनी धाडस करून नोकरीत महत्त्वाच्या जागेसाठी प्रयत्न करावा. खरेदी-विक्री करून चार पैसे नफा त्यांना मिळू शकेल. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी श्रमदान करून पैसे मिळवता येतील. आर्थिक मदत होईल.

### वृश्चिक : बदली—बढतीचा योग

तुमचा राजकारणी पिंड नाही, तरी पण या आठवड्यात एखाद्या राजकीय नेत्याबरोबर अचानक तुमचे चांगले संबंध जुळून येऊन ते नोकरीतील फायद्याच्या दृष्टीने तुम्हाला उपकारक ठरतील. बेकारीची समस्या सुटेल. शेतीचा व्यवसाय करा: शेतीत तुमचे यश द्विगुणीत होईल. एखादे घर, फ्लॅट अगर प्लॉट असे काही तुम्हाला विकत घ्यायचे असेल तर ते या वेळी अवश्य घ्या. पैसा अपुरा पडणार नाही. सोय होईल. आर्थिक परिस्थिती मात्र अशी आटोक्यात राहणे कठीण आहे. कारण अनपेक्षित खर्चाच्या नव्या नव्या समस्या उभ्या राहण्याची शक्यता आहे. कर्ज करू नका व जामीन राहू नका. सोमवार व शुक्रवार महत्त्वाची कामे होतील. महिलांनी आपल्या ठरवलेल्या योजना साकार करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांनी चैनीसाठी पैसा उडवू नये. त्यांना अडचणी निर्माण होतील.

### धनु : सुरळीतपणा येईल

त्रास, भीती, शंकाकुशंका यांचे वादळ आता तुमच्या बाबतीत शमले आहे. तुमचे मालक व वरिष्ठ यांच्यात नव्या योजनांच्या बाबतीत विश्वासाचे वातावरण निर्माण होईल व तुमचे म्हणणे त्यांना पटेल. ज्यांचे नव्या नोकरीचे प्रयत्न चालू असतील त्यांना य


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

आठवड्यात यश येईल. प्रत्यक्ष ऑर्डर ताब्यात मिळेल. रवी बारावा आहे. त्यामुळे भाषा संयमाची व गोड ठेवा. राजकारणात प्रवेश मिळणे थोडे लांबणीवर पडेल. सहकारी व मित्र यांच्यात गैरसमजाचे वातावरण राहील. पण ते तात्पुरतेच. आर्थिक परिस्थिती एकदम जरी सुधारली नाही तरी पैसा हाती येईल. आजार व आळस दूर होऊन उत्साहाचे वातावरण राहील. गुरुवार व शुक्रवार महत्त्वाची बोलणी करा. महिलांना खूपच अनुकूलता आहे. सार्वजनिक कार्यात पुढाकार व मान मिळेल. नोकरीत अधिकारप्राप्ती. विद्यार्थ्यांना चळवळीला वाव मिळणे जरा कठीण आहे. वाङ्मयात भाग घ्यावा.

**मकर** : मैत्रीने वागा

सध्या तुम्हाला विरोध होत नाही, स्पर्धेत तुमच्याविरुद्ध कुणी टिकत नाही, याचे कारण मंगळ तुमच्या दिमतीस आहे. ग्रहांचे सामर्थ्य जेव्हा प्राप्त होते तेव्हा कर्तुमकर्तुम शक्ती तुमच्या पाठीशी खडी होते. अशा तऱ्हेचे हे सामर्थ्य तुमच्या साऱ्या आशाआकांक्षा सफल करणार आहे. जे घडावे असे तुम्हाला वाटत होते ते या वेळी घडणार आहे. राजकारणात तुमची सर्वत्र चलती राहील, गाजत राहील. नोकरीत अनेक दिवसांची महत्त्वाकांक्षा अकस्मात पुरी होईल. असामान्य असे तुमचे व्यक्तिमत्त्व बनेल व उद्योगधंद्यात तुम्ही एक जबरदस्त अशी स्वतःची शक्ती निर्माण कराल. व्यापारात तुमच्या सल्ल्यावाचून कुणाचे काही चालणार नाही. शनिवार व शुक्रवार विशेष असे काही तरी आर्थिक बाबतीत घडेल. महिलांना नोकरीत अति महत्त्वाची जबाबदारी असलेले स्थान मिळेल. तरुणांचे विवाह जमतील. विद्यार्थ्यांनी लॉटरीचा व्यवसाय करावा. यश येईल.

**कुंभ** : अनेक लाभ होतील

हा आठवडा तुमच्याकडून मोठी कामगिरी घडवणार आहे. तुम्ही ज्या क्षेत्रात असाल त्या क्षेत्रात तुमचे वजन एवढे वाढेल की, जे पूर्वी तुमच्याशी बोलूही शकत नव्हते ते आता तुमचे उंबरठे झिजवू लागतील. राजकारणात तुम्हाला मोठेच महत्त्व प्राप्त होईल. सरकारी खर्चाने परदेशची यात्रादेखील घडू शकेल. नोकरीत तुम्ही घाबरण्याचे कारण नाही. सेवानिवृत्तांना पुन्हा बोलावणे येईल व जे सेवानिवृत्त होऊ घातले आहेत त्यांची मुदत वाढेल. या आठवड्यात बेकारांची स्वप्ने साकार होतील. उद्योग अगर नोकरी, काहीही मिळू शकेल. स्थावराचा प्रश्न तातडीने मिटेल. खरेदी-विक्रीचे व्यवहार या वेळी नफ्यात व यशस्वी होतील. निराशा व उदासपणा शिल्लक राहणार नाही. तब्येत इतकी ठणठणीत राहील की, गगनाला गवसणी घालावी असे तुम्हाला वाटेल. महिलांना स्वतंत्र उद्योगात आपली बुद्धी चालवता येईल. उद्योग सुरू करावा. विद्यार्थ्यांना संशोधनात यश मिळेल.

**मीन** : समाधान मिळेल

पाचवा शनी व पहिला गुरू ही गुरुशनीची असामान्य शक्ती हीच मीनराशीची आज शक्ती आहे. मंगळाने मानसिक ताण वाटत असला तरी या वेळी तुमच्या हातून उद्योग, नोकरी, उपासना, कला, क्रीडा वगैरे ज्या क्षेत्रात जे असतील त्या क्षेत्रात असामान्य कामगिरी पार पडेल. इतिहास घडवू शकाल. तुम्ही पत्रकार असाल तर तुमच्या लेखणीला भलतेच तेज चढेल. तुमचे लेखन गाजेल. काही भाग्यवंतांना परदेशी शिक्षण अगर सांस्कृतिक स्वरूपाचे कार्यक्रम या निमित्ताने परदेशयात्रा घडेल. तुम्ही जर साहित्यिक असाल तर तुमचे रेंगाळलेले लेखन पुरे होईल. नोकरीव्यवसायात नवे पर्व सुरू होईल. तुमच्याबद्दल मोठ्या अपेक्षा निर्माण होतील. नोकरीतील अडचणी दूर होतील. बेकारांना आशादायक वातावरण राहील. सोमवार ते गुरुवार व्यक्तिगत जीवनात महत्त्वाच्या घटना घडतील. महिलांच्या कलाकौशल्याला प्रसिद्धी व कीर्ती मिळेल. नोकरी मिळू शकेल. विद्यार्थ्यांना चार पैसे मिळण्याचा उद्योग मिळेल.

□ □

---

# पॅपिलॉन पुस्तक योजना

पॅपिलॉन पुस्तक योजनेतील दुसरे पुस्तक 'हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा' हे तयार झाले असून सभासदांनी १० डिसेंबर १९७५ पूर्वी ते कार्यालयातून घेऊन जावे. ज्यांनी पुस्तक व्ही. पी. ने मागवले आहे त्यांना पुढील आठवड्यात व्ही. पी. केली जाईल.

दहा रुपये मनीऑर्डरने वा चेकने पाठवून सभासद होणाऱ्या काही सभासदांनी पुस्तके समक्ष नेणार किंवा व्ही. पी.ने पाठवावी हा खुलासा केला नसल्याने त्यांची पुस्तके पाठवता आली नाहीत. या सभासदांनी पत्र पाठवून कृपया वरील खुलासा करावा. पत्रात संपूर्ण नाव, पत्ता, पैसे केव्हा, कसे पाठवले याचा उल्लेख असावा.

## गुजरात.... पृष्ठ ८ वरून

करणार नसाल तर आघाडीच्या सरकारला असलेला पाठिंबा आम्ही काढून घेऊ हे धमकीचे टांगते शस्त्र किमलोपपाशी आहे. किमलोपला जनता आघाडीने जवळ केले नाही तर काँग्रेस जवळ करील व राज्याची सत्ता मिळवील ही शक्यताही डावलता येणार नाही. काँग्रेसला हे साधता येऊ नये या उद्देशानेच आघाडीने किमलोपशी युती केली आहे.

जनता आघाडी मुख्यतः उजव्या पक्षांची आहे. भारतीय लोकदलात समाविष्ट असलेला संयुक्त समाजवादी पक्ष सोडला तर आघाडीत एकही डावा गट नाही. गुजरातेत या पक्षाचा काही प्रभाव नाही. तेव्हा समाजवादी कार्यक्रम ही आघाडी हाती घेण्याची शक्यता नाही. कांग्रेसचा समाजवाद हा घोषणांचा समाजवाद आहे. प्रत्यक्षात बडे उद्योगपती, बडे शेतकरी यांच्या हितसंबंधास बाध येईल असे कांग्रेस काही करीत नाही. काँग्रेसच्या ऐवजी पर्यायी पक्ष म्हणून जनता आघाडीला पाठिंबा द्यावा असा कोणता कार्यक्रम आघाडी-जवळ आहे? जनतेला स्वच्छ व कार्यक्षम कारभार देणे एवढी किमान एक गोष्ट आघाडीच्या सरकारने केली तरी जनता त्याचे स्वागत करील. पण एवढ्या कार्यक्रमाने जनतेचे समाधान होणार नाही. जनतेचा पाठिंबा टिकविण्यासाठी समाजवादी कार्यक्रम कृतीत आणणे हाच मार्ग आहे; पण आघाडीतील पक्षांचे स्वरूप लक्षात घेता त्यांच्याकडून ही अपेक्षा करता येणार नाही. आघाडीतील पक्षांना परिस्थितीनेच एकत्र यायला भाग पाडले म्हणून ते टिकून आहेत. आघाडीचा फायदा घेऊन आपल्या पक्षाचे बळ वाढवायचे असे धोरण घटक पक्षांनी स्वीकारल्याने पूर्वीच्या आघाड्या मोडल्या. जनता आघाडीतही असे संघर्ष, ताण व दबाव आहेत. यांना तोंड देत व त्यातून मार्ग काढीतच आघाडीला कार्य करावे लागणार आहे. □

## महाभारत....

श्री. बाबुराव बागुलांच्या 'सूर्याचे सांगाती' ह्या कथेतील एका पात्राच्या तोंडी शब्द आहेत– 'कोणती संस्कृती? शंबूकाचा शिरच्छेद करणारी, गरोदर सीतेला घराबाहेर काढून देणारी, स्त्री-शूद्राला शिक्षण, शास्त्र, संपत्तीला स्पर्श न करू देणारी, आम्हाला मान्य नाही. तत्त्वज्ञान? महत्तम मानवी भावनेने मोहित झालेल्या अर्जुनाची निर्भर्त्सना करून त्याला कापाकापीला प्रवृत्त करणारे तत्त्वज्ञान...कुलस्त्रिया बिघडतील, खालचे वर येतील, वर्णसंकर होईल, ही भीती घालून महान कत्तलीस अर्जुनाला उद्युक्त करणारे तत्त्वज्ञान... हे अर्जुना, तू फक्त कारण आहेस, करताकरविता मी आहे, असे सांगून माणसाचे माणूसपण मारून त्याला घाण्याचे बैल करणारे तत्त्वज्ञान...पिळवणुकीचा पुरस्कार करणारा तुमचा आत्मवाद, दैववाद, कर्मवाद, पुनर्जन्माची भाकडकथा सांगून दीनदलितांची प्रतिकारक्षमता कायमची खच्ची करणारे हे भयंकर मानवद्रोही तत्त्वज्ञान मला मान्य नाही.' बाबुराव बागुल म्हणतात ते आम्हालाही मान्य आहे. आजतागायत रामायण-महाभारत अन् भगवद्गीता ह्या ग्रंथांसंबंधी खूपच वादंग माजलेत, विवाद झालेत.

काही दिवसापूर्वी वृत्तपत्रात डॉ. डी. सी. सरकार, इतिहास-संशोधक ह्यांनी महाभारत ही एक काल्पनिक कथा होती असा निर्वाळा दिला. म्हणजे एखाद्या कादंबरीकाराने त्या काळी लिहिलेली शुद्ध काल्पनिक कथा? अन् त्या कथेचे किती यश? शतकानुशतके धर्मग्रंथात त्याचा समावेश होतो आहे. बकअप मिस्टर व्यास (म्हणजे आपले वेदव्यास हो...महर्षी वगैरे; पण त्यांना आता महर्षी म्हणायचीही भीती वाटते.)

डॉ. सरकारांचे बोलणे संपायच्या आधीच कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या एका प्रोफेसरने (श्री. दत्ता) आणि एका डॉक्टरांनी (श्री. फडके) चंदीगडहून डॉ. सरकारांकडे तोफ डागली.

आता हे वादंग बरेच दिवस वाजणार आणि गाजणार.

ते काहीही असो तूर्त आम्हाला काय म्हणायचे आहे? आम्हाला नाही आमच्या रशियन मित्रांना ह्या ग्रंथासंबंधी काय म्हणायचे ते सांगतो. डेविड कुगुल्टीनॉव्ह एक कवी आहेत. त्यांनी एका लेखात म्हटले आहे–

'रशियात महाभारताच्या काही भागांचा रशियन भाषेत अनुवाद सेम्योन् लिपकिन् ह्यांनी आणि रामायणाचा वेरा पोटापोवा ह्यांनी केलाय्. काल्मिक म्हणून ह्या पुस्तकांचे महत्त्व मला जास्त वाटते. (आता काल्मिकचा वाल्मिकशी मुळीच संबंध नाही. काल्मिक भूभाग असावा.) ही जवळीक, समान सांस्कृतिक आणि धार्मिक विश्वास आणि पर्यायाने भारतीय महाकाव्ये आणि काल्मिक (ग्रंथ) दृजानगारिआडा ह्यांच्या कथेतील साम्य ह्यामुळेही स्पष्ट होते...

दोन्ही देशांतील लोक ह्या ग्रंथांना महत्त्व देतात आणि आजही त्यांना जिवंत आध्यात्मिक धन मानतात. जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या डिस्कव्हरी ऑफ इंडियात लिहून ठेवलंय् की महाभारत वाचल्याशिवाय भारताला समजणे कठीण आहे आणि महात्मा गांधींनी भगवद्गीतेसंबंधी भारतीय तत्त्वज्ञानाच्या विचारपद्धतीचे रूप आहे; तर महाभारत सत्य आणि ज्ञानप्राप्तीचे मुख्य मूळ आहे–असे नमूद केलेय्.'

भगवद्गीतेचे रशियन भाषेत भाषांतर १७८८ साली झाले. अन् इथे आम्हाला भीती वाटत्येय् हे ग्रंथ येणाऱ्या पिढ्यांसाठी उपलब्ध राहतील का?

□

# फ्रॉम रशिया विथ लव्ह

एखाद्या माणसानं आत्महत्या केल्यानंतर त्याच्या खिशात सापडलेला कागदाचा चिटोराही लाखमोलाचा होतो. तशात तो माणूस प्रसिद्धीच्या झोतात सतत राहिलेला, लोकांच्या पुढं त्याची प्रतिमा तयार झालेली असल्यास आणखी त्या चिटोऱ्यास विशेष महत्त्व येतं. तो माणूस कवी असला तर...

तर स्पष्ट केलेलंच बरं. मायकोव्हस्की हा रशियाचा लोकमान्य कवी, राजमान्य कवी. पक्षमान्य कवी. आज जेव्हा सोविएट-साहित्यासंबंधी बोललं किंवा लिहिलं जातं तेव्हा गॉर्कीचं नाव गद्यलेखकात शीर्षस्थ ठेवलं जातं. कवितेच्या प्रांतात ही जागा मायकोव्हस्कीसाठी ठेवली जाते. अर्थात हे क्रांतीनंतरच्या साहित्याबद्दल खरं मानावं. गॉर्की 'मदर' कादंबरीमुळे, तर मायकोव्हस्की 'पँट घातलेल्या ढगा'मुळे अमर झाले आहेत.

मायकोव्हस्की क्रांतीनं भारून गेला होता. चार्जड् झाला होता. इतका की त्याचा आवाज, त्याचे शब्द समीक्षकांना प्रचार (प्रोपगांडा) वाटावेत. वाटूही का नये ?

Power to the Soviets !
Bread to the hungry !
Land to the peasants !
Peace to the nation !
Bread to the hungry !

ह्यात कविता कुठं आहे ? काहींना वाटणार नाही; पण आतला आवाज जेव्हा तळमळीनं बाहेर येतो तेव्हा तो आत्म्याचाच स्वर असतो अन् हा स्वर आणि कविता ह्यात अंतर तरी कुठं आहे ?

१९२४ मधे लेनिनच्या मृत्यूनंतर तो आतून इतका गद्‌गद् झाला होता, भरून आला होता, की त्यानं स्वतःला एका खोलीत कोंडून घेतलं. त्याचे अश्रू, त्याचं हृदय त्यानं शब्दांत ओतलं अन् जवळजवळ दोनशे पानी दीर्घ कविता लिहून काढली. त्या कवितेसंबंधी बोलताना तो म्हणाला होता, 'ह्या एका कवितेमुळं मी समजला जावा ही माझी आंतरिक इच्छा आहे. माझ्या सगळ्या कवितांतील गंभीर कविता ही आहे.'

त्याच्या काव्यवाचनाचे आणि काव्यगायनाचे कार्यक्रम हजारो, लाखो कामगारांच्या मेळाव्यापुढे व्हायचे. हा क्रांतीनं देशाला दिलेला अतिशय लोकप्रिय कवी होता.

मायकोव्हस्कीने दोन नाटकं पण लिहिलीत. बेडबग आणि बाथहाउस; पण सत्तेचा अंकुश सांस्कृतिक क्षेत्रात धुडगूस घालू लागला आणि मायकोव्हस्कीसारख्यांच्या शब्दावर पहारे बसवले गेले. त्याच्या नाटकावर बंदी टाकली गेली. मायकोव्हस्कीनं रॅपच्या पुढे येऊन स्वतःच्या बचावाकरिता बोलावं म्हणून त्याला सांगण्यात आलं. (रॅप म्हणजे RAPP. ही कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात पक्षाकडून निर्धारित केलेली संघटना. सबंध नाव असं–रशियन असोशिएशन ऑफ प्रोलेटेरियन रायटर्स.) फेब्रुवारी १९३० मधे पहिल्यांदा तो त्यांच्या सभेत गेला आणि म्हणाला, 'आपली मतं भिन्न आहेत. तुम्ही मला जाणताहात अन् मीही तुम्हाला चांगला ओळखतोय्. मला तुमच्याशी संबंध ठेवलेच पाहिजेत. कारण तुम्हाला माहीत आहे, ह्यापुढे संघटनेबाहेर राहून मला काम करताच येणार नाही.'

ज्या मायकोव्हस्कीच्या मुखातून क्रांतीचा आवाज आला होता त्याच्यावर दूषणं लावली गेलीत, -- 'समष्टीशी बांधिलकी आणि नातं अपुरं आहे.'

शेवटचंच गळा भरून, कदाचित तेव्हा त्याच्या डोळ्यांत अश्रूही असतील, खुल्या मैदानात विशाल जनसमुदायासमोर २५ मार्च १९३० रोजी त्यानं त्याच्या कवितांचं वाचन केलं...But I

mastered myself
and crushed under foot
the throat
of my very own songs !

आणि १४ एप्रिल १९३० रोजी त्यानं आत्महत्या केली. त्याला आत्महत्येला विवश करणाऱ्या शक्ती आणि प्रवृत्ती कोणत्या होत्या हा आता विशेष महत्त्वाचा विषय राहिला नाही; कारण काही काळ त्याच्यासंबंधानं मूग गिळून आज पुन्हा त्याला त्याच्या लोकांनी तेच स्थान दिलंय्, जे त्याचंच होतं. आज मायकोव्हस्की सर्वमान्य झाला आहे.

पण...पण...त्याच्या आत्महत्येनंतर त्याच्या खिशात सापडलेल्या कागदाच्या चिटोऱ्यावर एक कविता होती. कवी मागे आणखी दुसरं सोडणार तरी काय ? त्याचे शब्द हीच त्याची दौलत. तो जिवंत होता तोवर त्यानं ती पक्षासाठी, क्रांतीसाठी, देशासाठी, लोकांसाठी उधळली. मरताना त्याची दृष्टी सर्वदूर भिरभिरली. एकदा त्यानं आकाशाकडे पाहिलं. काळ्या रात्रीही आकाश किती सुंदर होतं. तारे चमचमत होते अन् त्याचे शब्द काळाला संबोधित होते. रात्रीचा एक वाजला होता...

Past one O' clock. You must have gone to bed.
Night's Milky way flows like a silver stream
No rush. I will not wake you, bothering your head
With lightning telegrams to crush your dreams.
As they say, that's the end of the story,
The boat of love has smashed against life's reefs
We are quits and we dont need an inventory
Of our mutual hurtings, msults and griefs
And see how the world lies in quietness
The sky pays Night with a rash of stars from its purse
In hours like these, one gets up to address
All Time and History and Univers !

–झिरो-झिरो-सेव्हन्